सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | मंगळवार, ९ जून २०२६ | युगाब्द ५१२८ | वर्ष ४२ वे अंक १९१ | पाने १२ | किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



राष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ वैभवाचा व आपल्यासमोर असलेल्या उत्तुंग ध्येयाचा विचार करताना, ध्येय जरी उत्तुंग असले आणि विचार उदात्त असला तरी, आपले पाय जमिनीवरच असले पाहिजेत! श्रेष्ठ ध्येयचिंतनातही वास्तवाचे भान मात्र विसरता उपयोगाचे नाही.

**- स्व. एकनाथ रानडे**
रा. स्व. संघाचे पूर्व सरकार्यवाह, संस्थापक विवेकानंद शिला स्मारक व विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी

# तृणमूल काँग्रेसला दिल्लीतही धक्का

- १४ खासदारांनी लोकसभेत केला वेगळा गट स्थापन
- राज्यसभा सदस्य सुवेंदू शेखर यांचाही राजीनामा

**नवी दिल्ली, ८ जून**

पश्चिम बंगालमध्ये मोठा पराभव स्वीकारल्यानंतर तृणमूल काँग्रेसला दिल्लीतही मोठा धक्का बसला आहे. तृणमूलच्या विधिमंडळ पक्षात फूट पडल्यानंतर आता तृणमूल काँग्रेस सांसदीय पक्षातही फूट पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. १४ खासदारांनी वेगळा गट बनवत लोकसभेत आपली बसण्याची वेगळी व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी एका पत्रातून लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे केली आहे. रालोआला पाठिंबा देण्याची घोषणाही तृणमूल काँग्रेसच्या बंडखोर गटाने केली आहे.

तृणमूल काँग्रेसच्या लोकसभेत तृणमूल काँग्रेसचे २८ खासदार असून यातील १४ खासदारांनी या पत्रावर स्वाक्षरी केली आहे.आमच्या गटाच्या नेत्या म्हणून काकोली घोष दस्तीदार यांना मान्यता द्यावी, अशी मागणी या पत्रातून करण्यात आली आहे. या पत्रावर पार्थ भौमिक, जून मालिया, असित मल, शताब्दी घोष, प्रसुन बॅनर्जी, अरुप चक्रवर्ती, वापी हलदर, जगदीश वसुनिया, कालिपदा सोरेन, शर्मिला सरकार, सुवेंदू शेखर राय आणि काकोली घोष दस्तीदार यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. अभिषेक बॅनर्जी सध्या लोकसभेत तृणमूल काँग्रेसचे नेते आहेत.



केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांचे निवासस्थानी बैठकीसाठी आलेले तृणमूल काँग्रेसचे खासदार

इंडिया आघाडीची दिल्लीत बैठक सुरू असताना आणि त्या बैठकीसाठी तृणमूल काँग्रेसच्या नेत्या तसेच पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी दिल्लीत आल्या असताना ही महत्वपूर्ण राजकीय घडामोड घडली आहे.

तृणमूल काँग्रेसच्या बडखोर खासदारांनी अधिकारी यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर लोकसभेत वेगळा गट स्थापन करण्याचा तसेच लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांना पत्र पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला. लोकसभेत वेगळा गट म्हणून आम्हाला मान्यता द्यावी, तसेच आमची बसण्याची वेगळी व्यवस्था करावी, अशी मागणी बिर्ला यांना पाठवलेल्या पत्रातून करण्यात आली.

**भडकलेल्या महुआ मोइत्रांचे आव्हान**

तृणमूल काँग्रेसमधील बंडखोरीची धग दिल्लीत पोहोचल्यानंतर या पक्षाच्या खासदार आणि ममता बॅनर्जी यांच्या अत्यंत विश्वासू सहकारी महुआ मोइत्रा प्रचंड भडकल्या. त्यांनी बंडखोरांवर जोरदार हल्ला चढवला. आहे. तुमच्यात हिंमत असेल, तर राजीनामा द्या आणि पुन्हा निवडणूक लढवून दाखवा, असे आव्हान महुआ मोइत्रा यांनी 'एक्स' समाजमाध्यमावरील पोस्टमध्ये बंडखोरांना दिले. (तभा वृत्तसेवा)

### सुवेंदू शेखर राय यांचा राजीनामा

**विशेष म्हणजे या बैठकीला तृणमूल काँग्रेसचे राज्यसभा सदस्य सुखेंदू शेखर रॉय उपस्थित होते. रॉय यांनी राज्यसभा सदस्य म्हणून आपला राजीनामा राज्यसभेचे सभापती सी.पी. राधाकृष्णन यांची भेट घेऊन त्यांना सादर केला, तसेच पक्ष सोडण्याची घोषणा केली. मी तृणमूल काँग्रेसचाही राजीनामा दिला असून त्याची सूचना व्हाटसअप आणि ईमेलवरुन पक्षाच्या नेत्या ममता बॅनर्जी यांना दिली आहे, असे राय यांनी सांगितले. तत्पूर्वी सकाळी तृणमूल काँग्रेसच्या ५ खासदारांनी राय यांची भेट घेतली होती. तृणमूल काँग्रेसचे लोकसभेत २८ तर राज्यसभेत १३ खासदार आहेत.**

### भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी बैठक

**सोमवारी तृणमूल काँग्रेसमधील या बंडखोर खासदारांची केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्या निवासस्थानी बैठक झाली. यादव पश्चिम बंगाल भाजपाचे प्रभारी आहेत. या बैठकीला पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारीही उपस्थित होते. भाजपाचे पश्चिम बंगालचे सहप्रभारी बिप्लकुमार देवही या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीसाठी अधिकारी सोमवारी सकाळी दिल्लीत दाखल झाले.**

# शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा




नवी दिल्ली येथील बैठकीनंतर पत्रकार परिषदेत सहभागी झालेले इंडिया आघाडीचे नेते

### इंडिया आघाडीच्या बैठकीत मागणी

**नवी दिल्ली, ८ जून**

इंडिया आघाडीच्या बैठकीत पाच मुद्यावर सहमती झाल्याचे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी सोमवारी सांगितले.

इंडिया आघाडीची बैठक सोमवारी राजधानी दिल्लीतील कॉन्स्टिट्युशन क्लबमध्ये झाली, त्यानंतर तेथेच आयोजित पत्रपरिषदेत बैठकीतील निर्णयाची माहिती देतांना खडगे म्हणाले की, बैठकीत पाच मुद्यावर सर्व पक्षांची सहमती झाली. सर्व पक्षांनी सरकारविरोधात आपल्या भावना व्यक्त केल्या. शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी या बैठकीत करण्यात आली.

नीट पेपरफुट आणि सीबीएसई परीक्षेतील पुनर्मुल्यांकनातील गैरव्यवहाराच्या मुद्यावर शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी या बैठकीत करण्यात आली, याकडे लक्ष वेधत खडगे म्हणाले की, या देशातील विद्यार्थी आणि युवकांसोबत हा धोका आहे, त्यामुळे प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी आमची मागणी आहे.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्यावर सरन्यायाधींना पत्र पाठवण्यावर बैठकीत सहमती झाली, लवकरच असे पत्र पाठवले जाईल, असे खडगे म्हणाले. देशाची ढासळती अर्थव्यवस्था, वाढती महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न आदी मुद्यांवर लवकरात लवकर सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलवावी, अशी मागणीही या बैठकीत करण्यात आल्याचे खडगे यांनी सांगितले. इंडिया आघाडीची दर दोन महिन्यांनी बैठक घेण्यावर या बैठकीत सहमती झाली असून आघाडीची पुढील बैठक ८ ऑगस्टला हैदराबाद येथे होईल, असे खडगे म्हणाले. (तभा वृत्तसेवा)

### पत्रकारांचे प्रश्न न घेता गुंडाळली पत्रकार परिषद

**संसदेच्या पावसाळी अधिवेशनात इंडिया आघाडीतील घटक पक्षातील समन्वय वाढवण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला, असे स्पष्ट करत खडगे म्हणाले की, अधिवेशनकाळात संसदेचे कामकाज सुरु होण्याआधी दररोज सकाळी संसदभवनातील विरोधी पक्षनेत्यांच्या दालनात बैठक आयोजित करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला. बैठकीतील पाच मुद्यांची माहिती दिल्यांवर पत्रकारांना प्रश्न विचारण्याची संधी न देता पत्रपरिषद गुंडाळण्यात आली. पत्रपरिषदेला राहुल गांधी, ममता बॅनर्जी, अखिलेश यादव, तेजस्वी यादव, उमर अब्दुल्ला, मेहबुबा मुफ्ती आणि अन्य नेते उपस्थित होते.**

## महत्त्वाचे

### चालू खात्यात ७.१ अब्ज डॉलर्स अतिरिक्त

**मुंबई** : सेवा क्षेत्रातील निर्यात आणि मोठ्या प्रमाणात पाठविण्यात आलेल्या विदेशी चलनामुळे २०२५-२६ च्या जानेवारी-मार्च तिमाहीत ७.१ अब्ज अमेरिकी डॉलर्स किंवा जीडीपीच्या ०.७ टक्के इतकी चालू खात्यावरील अतिरिक्त स्थिती नोंदविण्यात आली, असे भारतीय रिझर्व्ह बँकेने सोमवारी जारी केलेल्या आकडेवारीत म्हटले आहे. २०२४-२५ च्या चौथ्या तिमाहीत अधिशेष १३.७ अब्ज किंवा जीडीपीच्या १.४ टक्के होता. मात्र, संपूर्ण २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी चालू खात्यातील तूट २५.२ अब्ज अमेरिकी डॉलर्स किंवा जीडीपीच्या ०.६ टक्के होती. याउलट २०२४-२५ मध्ये ती २२.९ अब्ज डॉलर्स किंवा जीडीपीच्या ०.६ टक्के होती.

### इंडिया आघाडी गलितगात्र : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नवी दिल्ली** : इंडिया आघाडीवर जोरदार हल्लाबोल करीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांच्या नेतृत्वावर आणि एकजुटीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विरोधकांचे मनोबल पूर्णपणे खच्ची झाले असून इंडिया आघाडी गलितगात्र अवस्थेत पोहोचली आहे, असा घणाघात करीत त्यांनी राहुल गांधी, उद्धव ठाकरे आणि काँग्रेसवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. विरोधकांकडे विकासाचा अजेंडा नसून केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका करण्याचे राजकारण सुरू असल्याचा दावा करीत शिंदे यांनी आगामी काळात मोदींचे नेतृत्व अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला. दिल्लीमध्ये देशातील २० राज्यांतील शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक सोमवारी पार पडली. या बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना बोलत होते. देशभरात शिवसेना संघटन वाढविण्याबाबत राज्य प्रमुखांशी सविस्तर चर्चा झाली असून पक्ष विस्तारासाठी सकारात्मक वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीमुळे शिवसेनेला नवी ताकद मिळेल आणि कार्यकर्त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### आजपासून सोलापूर शहरात मनाई आदेश लागू

**सोलापूर** : सोलापूर शहर सार्वजनिक शांतता आणि सार्वजनिक सुरक्षितता राखण्यासाठी शहर पोलिस उपआयुक्त डॉ.अश्विनी पाटील यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१चे कलम ३७चे उप कलम (१) आणि (२) याद्वारे दि.९ जून रोजी ००. ०१ वाजलेपासून ते दि.२३ जून २०२६ रोजीचे मध्यरात्री २४.०० वाजेपर्यंत या कालावधीत पोलिस आयुक्तालय सोलापूर शहर हद्दीत मनाई आदेश लागू करण्यात येत आहे. या कालावधीत शस्त्रे, अग्निशस्त्रे, बॅटन, तलवारी, भाले, दंडुके, सोटे, विना परवाना बंदुका, चाकू, काठ्या किंवा लाठ्या किंवा इत्तर कोणतीही वस्तू, पदार्थ किंवा स्फोटके वाहून नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा उपकरणे किवा क्षेपणास्त्रे टाकण्याची किंवा प्रक्षेपित करण्याची स्वधने, वाहून नेणे, गोळा करणे आणि तयार करणे, व्यक्ती किंवा प्रेत किंवा आकृती किंवा पुतळे यांचे प्रदर्शन, सार्वजनिक टिकाकरण उध्दार गाणी गाणे संगीत वाजवणे यांसारख्या गोष्टी करता येणार नाही, असेही त्यांनी सांगितले.

# निर्मिती विहार येथे वृध्द इसमाचा गळा दाबून खून

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

जुळे सोलापुरातील निर्मिती विहार येथे एका ७४ वर्षीय वृध्दाचा गळा दाबून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. वीरेश संगय्या वस्त्रद (रा. निर्मिती विहार, विजापूर रोड, सोलापूर) असे मृत वृध्दाचे नाव आहे. याप्रकरणी अज्ञात मारेकऱ्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मयताची मुलगी अन्नपूर्णा वीरेश वस्त्रद उर्फ प्रगती सोम नाथ कडगंची (वय-४५, रा.स्वामी विवेकानंद नगर, होटगी रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मृत वीरेश वस्त्रद हे पंचांग पाहत होते. त्यांच्या ओळखीतील व्यक्ती त्यांना संपर्क साधून त्यांच्याकडे पंचांग पाहण्यासाठी येत होते.

शनिवार, ६ जून रोजी सकाळी दुधवाला हा दूध ठेवून गेला. पण बराचवेळ होऊनही ते दूध बाहेरच होते. यामुळे शेजाऱ्यांनी पाहिले असता, त्यावेळी ही घटना उघडकीस आली. वीरेश वस्त्रद हे त्यांच्या बेडरुममध्ये जमिनीवर उताण्या स्थितीत बेशुद्धावस्थेत आढळून आले. त्यांच्या गळ्यावर संशयास्पद लाल-काळ्या रंगाचे व्रण दिसून आले.

विजापूर नाका पोलिसांना ही माहिती समजताच घटनास्थळी धाव घेऊन वीरेश वस्त्रद यांना उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. सुरुवातीला या मृत्यूबाबत गूढ निर्माण झाले होते. परंतु शवविच्छेदन झाल्यानंतर डॉक्टरांनी दिलेल्या प्राथमिक अहवालात वीरेश वस्त्रद यांचा मृत्यू गळा दाबल्यामुळे झाल्याचे स्पष्ट केले. पोलिस निरीक्षक सुशांत वराळे हे पुढील तपास करत आहेत.




सोमवारी मुल्लानपूर येथे अफगाणिस्तानविरुद्धचा एकमेव कसोटी क्रिकेट सामना विक्रमी एक डाव व ३०० धावांनी जिंकल्यानंतर सामन्याच्या चषकासह जल्लोष करताना भारतीय संघातील खेळाडू. कसोटी पदार्पणात विक्रमी कामगिरी करणारा मानव सुथार सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.
(सविस्तर वृत्त पान २ वर...)

### आता वर्षभरात चारच अनुदानित सिलेंडर

**नवी दिल्ली, ८ जून**

केंद्र सरकारने प्रधानमंत्री उज्वला योजनेच्या लाभार्थ्यांना दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या अनुदानित गॅस सिलेंडरची संख्या कमी केली आहे. सरासरी घरगुती वापराची पातळी लक्षात घेऊन हा बदल करण्यात आला आहे. आता वर्षभरात नऊ सिलेंडर ऐवजी केवळ चार गॅस सिलेंडर सवलतीच्या दरात मिळेल, अशी घोषणा वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने सोमवारी केली.

प्रधानमंत्री उज्वला योजना मे २०१६ मध्ये सुरू करण्यात आली होती. या योजनेअंतर्गत, लाभार्थ्यांना सुरुवातीला दरवर्षी १२ अनुदानित एलपीजी सिलेंडर मिळत होते. गतवर्षी हा कोटा नऊ सिलेंडरपर्यंत कमी करण्यात आला होता. (वृत्तसंस्था)

# शेअर बाजारात मोठी घसरण

**मुंबई, ८ जून**

मध्य-पूर्व आशियातील वाढता तणाव आणि त्यामुळे वाढलेले कच्च्या तेलाचे दर, जागतिक स्तरावरील कमकुवत संकेत तसेच तंत्रज्ञान क्षेत्रातील घसरण यामुळे शेअर बाजारात मोठी पडझड झाली. सोमवारच्या सत्रात चौफेर विक्रीमुळे मुख्य निर्देशांकांमध्ये १ टक्क्याहून अधिक घसरण झाली.

डॉलरचा वाढता निर्देशांक आणि धातूंच्या किमतीतील घसरणीमुळे मेटल समभागांवर मोठा दबाव आला. दिवसअखेर निफ्टी १.०५ टक्क्यांनी घसरून २३,१२४ वर बंद झाला, तर बीएसई सेन्सेक्स ०.९५ टक्क्यांच्या घसरणीसह ७३,५३५ वर स्थिरावला. बँकिंग आणि इतर क्षेत्रांसह मिडकॅप आणि स्मॉलकॅप निर्देशांकांनाही या घसरणीचा मोठा फटका बसला. निफ्टी मिडकॅप १०० मध्ये १.४० टक्के आणि निफ्टी स्मॉलकॅप १०० मध्ये तब्बल २ टक्क्यांची घसरण झाली. (वृत्तसंस्था)

# अपघातात शेतकरी जागीच ठार; ग्रामस्थांनी पेटवला डंपर

### डंपरची दुचाकीला धडक; अन्य एकजण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

विटा वाहून नेणाऱ्या एका भरधाव डंपरने शेतकऱ्यांच्या दुचाकीला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात एक शेतकरी जागीच ठार तर दुसरा जखमी झाल्याची घटना सोलापूर-बार्शी रस्त्यावरील कारंबा गावाजवळ आज सोमवार, दि.८ जून २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास घडली. अपघातानंतर संतप्त झालेल्या नागरिकांनी संबंधित डंपर पेटवून दिल्यामुळे महामार्गावर काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.



धोंडाप्पा गुराप्पा जोडमोटे (वय-८०, रा.कारंबा, ता.उत्तर सोलापूर) असे जागीच ठार झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. मल्लिनाथ हिप्परगी (वय-६०) असे गंभीर जखमी शेतकऱ्याचे नाव आहे. धोंडाप्पा जोडमोटे आणि मल्लिनाथ हिप्परगी हे दोघे सोमवारी सकाळी नेहमीप्रमाणे दुचाकीवरुन शेताकडे निघाले होते. कारंबा गावाच्या शिवारात असलेल्या मुनाळे शाळेसमोर पाठीमागून येणाऱ्या विटांनी भरलेल्या अनियंत्रित डंपरने (क्रमांक MH 20 BE 4266) त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की धोंडाप्पा जोडमोटे यांचा जागीच मृत्यू झाला. तर मल्लिनाथ हिप्परगी हे गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती समजताच कारंबा येथील शेकडो ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी झालेल्या मल्लिनाथ हिप्परगी यांना उपस्थित नागरिकांनी तातडीने रुग्णवाहिकेतून उपचारासाठी रुग्णालयात हलवले. यादरम्यान अपघातानंतर संतप्त झालेल्या काही ग्रामस्थांनी संबंधित डंपर पेटवून दिले होते. दरम्यान, अग्निशामक दलाने घटनास्थळी धाव घेत डंपरची आग विझवली. या अपघाताची नोंद सोलापूर तालुका पोलिस ठाण्यात झाली आहे.

# येतोय् शतकातील सर्वांत भयंकर 'सुपर अल-निनो'

### सोबतच वातावरण बदलाचा बॉम्ब

**नवी दिल्ली, ८ जून**

प्रशांत महासागरातील विक्रमी उष्णतेमुळे या शतकातील सर्वांत भयंकर सुपर अल-निनोचा इशारा जारी करण्यात आला. हा सक्रिय झाल्यास भारतात अतिशय भीषण दुष्काळ, तीव्र उष्णता आणि पिकांची हानी होऊ शकते, अशी भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

'युरोपियन सेंटर फॉर मीडियम-रेंज वेदर फोरकास्ट्स'ने जून २०२६ मध्ये जारी केलेल्या या अंदाजामुळे संपूर्ण जग दहशतीत आले आहे. प्रशांत महासागरात एक महाविनाशकारी सुपर अल-निनो तयार होत असल्याचे या आंतरराष्ट्रीय मॉडेलमध्ये दिसून आहे. हा आधुनिक काळाच्या इतिहासातील सर्वांत भीषण आणि शक्तिशाली अल-निनो होऊ शकतो.

या अनुमानित अल-निनोचा आलेख इतक्या झपाट्याने वर जात आहे की, मागील सर्व रेकॉर्ड तोडू शकतो. २०२६ मधील शेवटच्या महिन्यांत प्रशांत महासागराचे तापमान सामान्यापेक्षे तीन ते चार डिग्री सेल्सिअस वाढू शकतो. ही एक अत्यंत गंभीर स्थिती असून, त्याची कल्पनाही आतापर्यंत करण्यात आली नव्हती. हा अंदाज येत्या काही महिन्यांत खरा ठरला, तर केवळ ही एक हवामानाशी संबंधित घटना राहणार नाही. उलट पृथ्वीवरील पर्यावरण, जागतिक कृषी क्षेत्र, अन्नसुरक्षा आणि विशेषतः भारतीय मान्सूनसाठी हा एक 'क्लायमेट बॉम्ब' ठरू शकतो. येऊ घातलेल्या या धोक्याचे गांभीर्य समजण्यासाठी इतिहासाची काही पाने उलटावी लागतील. यापूर्वी सुपर अल-निनो आला असताना जगात काय उलथापालथ झाली, हे पाहावे लागेल. (वृत्तसंस्था)

### नैसर्गिक घटना

**अल-निनो ही एक नैसर्गिक वातावरणीय घटना आहे. ही परिस्थिती विषुववृत्तीय प्रशांत महासागरातील पृष्ठभागावरील पाणी असामान्यपणे गरम झाल्याने निर्माण होते. सामान्य दिवसांत प्रशांत महासागराच्या पूर्वेपासून पश्चिमेकडे वाहणारी उष्ण हवा गरम पाण्याला आशिया आणि ऑस्ट्रेलियाकडे लोटते. यामुळे या परिसरात चांगला पाऊस पडतो. मात्र, अल-निनोच्या काळात हे व्यापारी वारे कमकुवत होतात किंवा कधी-कधी उलट्या दिशेने वाहतात. असे झाल्यास पेरू आणि दक्षिण अमेरिकेच्या तटवर्ती भागातील थंड पाणी गायब होते आणि तिथे गरम पाणी मोठ्या प्रमाणावर जमा होते.**

### मागील काही काळातील फटका

- **१९८२-८३ मधील अल-निनो** : या कालावधीत प्रशांत महासागराचे तापमान २.१ डिग्री सेल्सिअसने वाढले होते. यामुळे जागतिक पातळीवर दुष्काळ आणि पूरस्थिती निर्माण झाली.
- **१९९७-९८ मधील सुपर अल-निनो** : हा या शतकातील सर्वांत मोठा बदल मानला जात होता. या कालावधीत प्रशांत महासागराचे तापमान २.४ डिग्री सेल्सिअसने वाढले होते.
- **२०१५-१६ मधील सुपर अल-निनो** : अलिकडच्या काळातील हा सर्वांत तीव्र अल-निनो होता. यात जागतिक तापमात विक्रमी २.६ डिग्री सेल्सिअसने वाढले होते.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### पुण्याच्या वैष्णवी अडकरला 'टॅग' योजनेचा लाभ

**नवी दिल्ली** : पुण्याची वैष्णवी अडकर आणि मानस धामणे भारत सरकारच्या टार्गेट आशियाई गेम्स ग्रुप (टॅग) योजनेत यांचा समावेश करण्यात आला आहे.



अखिल भारतीय टेनिस संघटनेने या निर्णयाचे स्वागत केले असून, यामुळे देशातील उच्च-स्तरीय कामगिरीच्या प्रक्रियेला मोठी चालना मिळेल, असे म्हटले आहे. या योजनेत समाविष्ट झालेले इतर दोन खेळाडू म्हणजे पुरुष एकेरीतील खेळाडू दक्षिणेश्वर सुरेश आणि दुहेरीतील तज्ज्ञ खेळाडू अनिरुद्ध चंद्रशेखर हे आहेत. हे चार नवीन खेळाडू योजनेअंतर्गत आधीच सहाय्य मिळवत असलेल्या ११ भारतीय टेनिसपटूंच्या गटात सहभागी झाले आहेत. या आधीच्या खेळाडूंमध्ये सुमित नागल, युकी भाम्बरी, ऋतुजा भोसले, अर्जुन कढे, ऋत्विक चौधरी बोलिपल्ली, वैदेही चौधरी, माया राजेश्वरन, एन. श्रीराम बालाजी, साकेत मायनेनी, सहजा यमलपल्ली आणि श्रीवल्ली भामिडिपती यांचा समावेश आहे. योजनेअंतर्गत मिळणाऱ्या संधींचा खेळाडूंनी पुरेपूर लाभ घ्यावा आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताच्या यशात योगदान द्यावे, असे संघटनेचे सरचिटणीस सुंदर अय्यर म्हणाले. ■

# भारताचा अफगाणिस्तानवर १ डाव व ३०० धावांनी विजय

## कसोटी पदार्पणात सामनावीर मानव सुथारचे ७ बळी

◆ **मुल्लानपूर, ८ जून**

येथील महाराजा यादविंद्र सिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या एकमेव कसोटी क्रिकेट सामन्यात भारताने अफगाणिस्तानवर एक डाव व ३०० धावांनी विजय मिळविला. शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाचा हा कसोटी क्रिकेटमधील सर्वात मोठा विजय ठरला. भारतासाठी पहिल्या डावात २८ धावा करणारा तसेच ३३ धावांत ६ बळी व दुसऱ्या डावात २९ धावांत एक बळी असे पदार्पणात एकूण ७ बळी टिपणारा मानव सुथार सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.



सामनावीर मानव सुथार

भारताने ८ बाद ५६४ धावांवर आपला पहिला डाव घोषित केल्यानंतर अफगाणिस्तानला पहिल्या डावांत १५२ धावांत गुंडाळले व फॉलोऑनची नामुष्की पत्करल्यानंतर अफगाणिस्तानचा दुसरा डाव अवघ्या ११२ धावांतच आटोपला.

भारताविरुद्धचा हा अफगाणिस्तानचा दुसराच कसोटी क्रिकेट सामना होता. या एकमेव कसोटी सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सकाळीच अफगाणिस्तानची अवस्था बिकट झाली होती. अफगाणिस्तानच्या फलंदाजांनी आक्रमक पवित्रा घेतच खेळ केला. त्यांच्या तळाच्या फळीतील फलंदाजांनी वारंवार आक्रमक फटके मारण्याचा प्रयत्न केला, परंतु मुल्लानपूरमधील प्रचंड उकाड्यात त्यांचा संयम सुटला आणि भारताने या एकमेव कसोटी क्रिकेट सामन्यात अफगाणिस्तानवर डावाने विजय नोंदविला.

पदार्पण करणारा गोलंदाज मानव सुथार याने आदल्या दिवशीच्या ३ बळींच्या कामगिरीनंतर पुन्हा गोलंदाजी सुरू केली. ज्या खेळपट्टीवर इतर गोलंदाजांना फारशी मदत मिळत नव्हती, तिथे सुथारने चेंडूला वळण देत चातुर्याने गोलंदाजी केली. देशाचा हा नवा फिरकी गोलंदाज जेव्हा एका दुर्मिळ टप्प्यावर पोहोचला पदार्पणाच्या सामन्यात पाच बळी घेणारा १० वा भारतीय ठरला. तसेच, आपल्या पहिल्याच कसोटीत हा टप्पा गाठणारा तो सातवा फिरकी गोलंदाज ठरला. त्याने ३३ धावांत ६ बळी घेत आपली खेळी संपविली. कसोटी पदार्पणात भारतीय गोलंदाजाची ही तिसरी सर्वोत्तम कामगिरी ठरली.

भारताने अफगाणिस्तानचा पहिला डाव ५८.४ षटकांत १५२ धावांत गुंडाळला. अफगाणिस्तानकडून चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करणाऱ्या रहमत शाहने तेवढी १३५ चेंडूंत ९ चौकार व एका षट्कारसह सर्वाधिक ६० धावांची खेळी केली. त्याला मानव सुथारने बाद केले. अफगाणिस्तानचा डाव झटपट गुंडाळताना सुथारने ३३ धावांत ६ बळी, प्रसिध कृष्णाने ३ बळी व वॉशिंग्टन सुंदरने १ बळी टिपला.



एकमेव कसोटी विजयाच्या चषकासह कर्णधार शुभमन गिल

### अफगाणिस्तानवर फॉलो-ऑन लादला

भारताने पहिल्या डावांत ४१२ धावांची भक्कम आघाडी मिळविली व अफगाणिस्तानवर फॉलो-ऑन लादला. भारतीय गोलंदाजांनी अफगाणिस्तानच्या अननुभवी फलंदाजांवर जबरदस्त दबाव टाकला होता. भारतीय गोलंदाजीचा सामना करताना किंवा बचाव करताना एकही अफगाण फलंदाज सहज खेळताना दिसला नाही.

फॉलो-ऑन दिल्यानंतर उपहाराच्या वेळेपर्यंत अफगाणिस्तानने बिनबाद १८ धावा केल्या होत्या; मात्र डावाने होणारा लाजिरवाणा पराभव टाळण्यासाठी त्यांना अजूनही ३९४ धावांची गरज होती. चहापानाच्या सत्रापूर्वीच सेदिकुल्ला अटलने सुथारच्या गोलंदाजीवर षट्कार व चौकार हाणत आक्रमक पवित्रा घेतला. वॉशिंग्टन सुंदरच्या गोलंदाजीत प्रसिध कृष्णाकडून झेलबाद होण्यापूर्वी सेदिकुल्ला अटलने ८० चेंडूंत ५ चौकार व एका षट्कारसह ४२ धावा केल्या. रहमानुल्लाह गुरबाजने २४ चेंडूंत २४ धावांची भर घातली, परंतु रहमत शाह (१३) वगळता इतर फलंदाज एक अंकी धावसंख्येवरच बाद झालेत. अफगाणिस्तानचा दुसरा डाव ३५.५ षटकांत ११२ धावांत गुंडाळताना वॉशिंग्टन सुंदरने ४ बळी, कुलदीप यादवने ३ बळी, तर मोहम्मद सिराज व मानाव सुथारने प्रत्येकी एक बळी टिपला. ◀(वृत्तसंस्था)

### एनजी व साऊथ सोलापूर रेड संघाचे विजय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

साऊथ सोलापूर आपटे ग्रुप चषक क्रिकेट स्पर्धेत नीलेश गायकवाड क्रिकेट अकादमी (एनजीसीए) व साऊथ सोलापूर रेड संघानी विजय मिळविले.

एनजी अकादमीने साऊथ सोलापूर रेड संघावर ३ गडी राखून थरारक विजय मिळवला. पावसाच्या व्यत्ययामुळे अटीतटीच्या झालेल्या या सामन्यात साऊथ सोलापूरच्या नीतिकेश गज्जमने झळकावलेले शानदार शतक संघाला विजय मिळवून देऊ शकले नाही. पावसाच्या व्यतयामुळे विजयासाठी असलेल्या २०९ धावा एनजी क्लबने सात गडी गमावित गाठले. यश पवार सामन्याचा मानकरी ठरला.दुसऱ्या सामन्यात साऊथ सोलापूर (रेड) संघाने कोहिनूर क्रिकेट क्लबवर १४७ धावांनी दणदणीत विजय मिळविला. अष्टपैलू कामगिरी केलेला साईरवितेजा (२६ धावा व ३ बळी) सामन्याचा मानकरी ठरला.

**संक्षिप्त धावफलक : साऊथ सोलापूर (रेड):** ७ बाद २३६ (नीतिकेश गज्जम १००, हसन शेख ४५, विष्णू कोटापल्ली २९. गोलंदाजी: यश पवार २ बळी, आदित्य चोटाके १ बळी) **पराभूत विरुद्ध एनजीसीए :** ७ बाद २०९ (संस्कार गवळी ३३, यशराज ताकळे २८, श्लोक आनंद २७. गोलंदाजी: नीतिकेश गज्जम ३ बळी).

**साऊथ सोलापूर रेड:** सर्व बाद २१८ (कार्तिक मेंगू ४०, विष्णू कोटापल्ली २७, साईरवितेजा २६, गोलंदाजी: शाहीद ३ बळी, अझहर अत्तार २ बळी) **विजयी विरुद्ध कोहिनूर क्रिकेट क्लब :** सर्व बाद ७१ (गुरुकिरण (१४, श्रवण कुमार १३, गोलंदाजी: साई रवितेजा व कार्तिक कोकुल ३ बळी, नीतिकेश गज्जम २ बळी).

### राष्ट्रीय योग ऑलिम्पियाड ऑनलाईन प्रश्नमंजूषा; १० जूनपर्यंत नोंदणी करावी

**सोलापूर, दि. ८ जून-**

२१ जून या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून एनसीईआरटी आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयामार्फत राष्ट्रीय योग ऑलिम्पियाड २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत इयत्ता ३ री ते १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले असून, यामध्ये विद्यार्थ्यांना विनामूल्य सहभाग घेता येणार आहे. या उपक्रमात ऑनलाईन नोंदणी करण्याची अंतिम मुदत १० जून २०२६ आहे. नोंदणीसाठी अधिकृत लिंक: https://www.nyoncert.in/registration2026/register.php तर आधिक माहितीसाठी www.nyoncert.in हे संकेतस्थळ पहावे. राज्यातील सर्व शाळां व कनिष्ठ महाविद्यालयांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्याच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने केले आहे.



### आंतरराष्ट्रीय शुडोकान कराटे परीक्षेत ११ प्रशिक्षकांना 'ब्लॅक बेल्ट' पदवी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

जागतिक कराटे महासंघ व एशियन कराटे महासंघाशी संलग्न 'जपान कराटे-डो शुडोकान' आणि 'भारतीय शुडोकान कराटे' यांच्या वतीने घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय ब्लॅक बेल्ट पदवी परीक्षेत महाराष्ट्रातील ११ प्रशिक्षकांनी घवघवीत यश संपादन केले.

यामध्ये सोलापूरसह ठाणे, मुंबई आणि सोलापूर येथील प्रशिक्षकांचा समावेश असून, त्यांना विविध स्तरांवरील प्रतिष्ठित 'ब्लॅक बेल्ट' पदवी बहाल करण्यात आली. यशस्वी झालेल्या या सर्व ब्लॅक बेल्ट प्रशिक्षकांना भारतीय शुडोकान कराटेचे प्रमुख मझहर खान, महाराष्ट्र शुडोकान कराटेचे प्रमुख भीमराव बाळगे, इक्बाल शेख यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा ॲम्युचर स्पोर्ट्स कराटे असोसिएशनचे अध्यक्ष महादेव चाकोते, आमदार सचिन कल्याणशेट्टी, डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील, नगरसेवक सीए विनोद भोसले, 'सिकई'चे अध्यक्ष मुकुंदराव जाधव, राज्य किकबॉक्सिंग असोसिएशनचे उपाध्यक्ष मनीष सुरवसे, शिवकुमार पाटील, माजी क्रीडाधिकारी सत्तेन जाधव, सागर कत्ते, सुरेश माळगे, सुभाष काळे आणि धनंजय धेंडे आदींसह क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी यशस्वी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

**यशस्वी प्रशिक्षक व मिळालेली पदवी (दान):** सिक्स दान : सचिन सोनकांबळे (ठाणे), फिफ्थ दान : माधुरी रमानाथन (मुंबई), फोर्थ दान : महादेव ताकतोडे (श्रीपूर, माळिशरस), सुरेश सोनवणे आणि नारायण घोडके (दोघे सोलापूर), थर्ड दान : मनोज बाळगे आणि शशिकला पोळ (दोघे सोलापूर), सेकंड दान (२पव ऊप): प्रचित जोगदांडे, पौर्णिमा पुजारी, भारती चिंता आणि श्रावण वालीकर (चौघेही सोलापूर).

### पुणे 'वृक्षथॉन हाफ मॅरेथॉन'मध्ये अक्कलकोटचा अरुण राठोड द्वितीय



**२१ किमी अंतर १ तास ८ मिनिटांत पार; ७५ हजारांचे बक्षीस पटकाविले**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

अक्कलकोट तालुक्यातील बबलाद तांडा येथील धावपटू अरुण धनसिंग राठोड याने पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित 'वृक्षथॉन हाफ मॅरेथॉन' (२१ किमी) स्पर्धेत चमकदार कामगिरी करत द्वितीय क्रमांक पटकावला.

पुण्यात रविवारी झालेल्या या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत अरुणने आपली चुणूक दाखवित २१ किलोमीटरचे अंतर अवघ्या १ तास ०८ मिनिटे ३९ सेकंद अशा उत्कृष्ट वेळेत पूर्ण करत हे यश संपादन केले.

या शानदार कामगिरीबद्दल अरुणला ७५ हजार रुपये रोख बक्षीस, आकर्षक ट्रॉफी आणि पदक देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. ग्रामीण भागातील प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, सातत्यपूर्ण सराव, जिद्द आणि कठोर मेहनतीच्या बळावर अरुण यांनी हे यश मिळवले आहे. अरुण राठोड यांच्या या उल्लेखनीय राष्ट्रीय स्तरावरील यशाबद्दल 'चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशनतर्फे त्यांचे विशेष कौतुक व अभिनंदन करुन आगामी क्रीडा प्रवासासाठी आणि भावी स्पर्धांसाठी संस्थेच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.



### 'बाबां'च्या हस्ते 'आई'चा स्मृतिचिन्ह देऊन गौरव

**चेतक स्केटिंग क्लबतर्फे मातृदिनानिमित्त विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

चेतक क्लबच्या वतीने जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून आयोजित केलेल्या 'आईच्या स्पर्धांचा' दिमाखदार बक्षीस समारंभ ७ जून रोजी 'तिरंगा बंगला' येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्य म्हणजे, उपस्थित वडिलांच्या (बाबांच्या) हस्ते विजेत्या मातांना (आईला) ट्रॉफी आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

या अंतर्गत घेण्यात आलेल्या 'मुलाचे बोट धरून पळणे' या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत मातांनी उत्स्फूर्तपणे भाग घेतला. काही मातांनी तर साडी नेसलेली असतानाही, येणाऱ्या अडथळ्यांवर मात करत आपल्या पाल्यासह सुसाट धावून यश मिळवले. कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत आदराने राष्ट्रगीताने करण्यात आली. त्यानंतर चेतक क्लबच्या सर्व लहान मुलांना खाऊचे वाटप करण्यात आले, तर उपस्थित सर्व मातांना प्रेमाचे प्रतीक म्हणून गुलाबपुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमाबद्दल उपस्थित पालक आणि मुलांनी चेतक शिबिराविषयी मनापासून समाधान व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट संयोजन आणि नियोजन दिव्यकांत गांधी यांनी केले.

**स्पर्धेतील प्रथम पाच (कंसात पाल्याचे नाव):** रुतुजा (स्वरा पोखरापूरकर), तन्झिला (मोहम्मद शेख), भाग्यश्री (सार्थक खताळ), मिसबा (सिमराह इनामदार), पाचवा विभागून -सपना (अलेक्या सानम) आणि पल्लवी (लतिका मोरे).

## निधन वृत्त...

### तारामती आवताडे

**मंगळवेढा, दि. ८ जून-**



संत दामाजी हाऊसिंग सोयायटीमधील तारामती जगन्नाथ आवताडे यांचे रविवार दि. ७ जून रोजी दुपारी १२.५५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ६९ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात एक मुलगा, पाच विवाहित मुली, सून, जावई, नातवंडे, परतवंडे असा परिवार आहे. झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण मुंबईचे फायनान्स कमिशनर महेश आवताडे यांच्या त्या मातोश्री होत.

### ईमाम मणेरी

**सांगोला,दि. ८ जून-**



सांगोला नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष ईमाम मुसा मणेरी (वय-६९) यांचे सोमवार दि.८ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

### प्रभाकर गेंट्याल

**सोलापूर, दि. ८ जून-**



कुंभारी येथील कॉ. गोदूताई परुळेकर वसाहतीतील रहिवासी कॉ. प्रभाकर शिवराम गेंट्याल यांचे सोमवारी अल्पशा आजाराने निधन झाले. माजी आमदार नरसय्या आडम यांचे ते भाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले आणि आई असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर उद्या, मंगळवार दि. ९ जून रोजी सकाळी १० वाजता शांती चौक येथील पद्मशाली स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## ऋषिकेश नलावडेचा 'डोमीनाटर्स' संघ विजेता

**चॅम्पियन मेगा टेबल टेनिस लीग स्पर्धेतील कामगिरी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

सोलापूर जिल्हा टेबल टेनिस संघटना व बार्शी टेबल टेनिस अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'चॅम्पियन मेगा टेबल टेनिस लीग' स्पर्धेत ऋषिकेश नलावडे यांच्या नेतृत्वाखालील 'डोमीनाटर्स' संघाने अजिंक्यपद पटकावले.

इंदिरा गांधी पार्क स्टेडियमवरील मुळे पॅव्हेलियन येथे झालेल्या या थरारक स्पर्धेत डोमीनाटर्स संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजेतेपदाला गवसणी घातली. विजेत्या संघात ऋषिकेश नलावडे सोबत स्वप्निल फडके, राजेश भिलावे, नमन अगरवाल आणि चैत्रा लोकोजू या खेळाडूंचा समावेश होता.




या स्पर्धेत 'दबंग' संघाने उपविजेतेपद संपादले. या संघात पिनाक पाटकर, ओंकार मुळे, सचिन चव्हाण, अद्वैत जोशी आणि ईश्वरी पाटील यांनी चमकदार कामगिरी केली. तर, डॉ. नितीन तोष्णीवाल, राजवर्धन तिवारी, मुक्ता शेवाडे, अथर्व खळदकर आणि शिवानी सानप यांच्या 'स्पिन वॉरियर्स' संघाने तिसरा क्रमांक मिळिवला. बँक ऑफ बडोदाचे सिनियर मॅनेजर देवेश कुमार, ग्रामीण महाराष्ट्र बँकेचे श्री. सावंत, श्री. भोसले आणि सुनील मदान यांच्या हस्ते विजेत्यांना करंडक व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या भव्य स्पर्धेला ग्रामीण महाराष्ट्र बँक, डॉ. भास्कर पाटील, डॉ. नितीन तोष्णीवाल आणि पोतदार लॅब यांचे प्रायोजकत्व लाभले होते. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी गणेश स्वामी, झेड. एम. पुणेकर, गोवर्धन अहमद शेख, श्री खळदकर आणि ओंकार काबरा यांनी परिश्रम घेतले.

## शिवाजी नाईट कॉलेजच्या तिघांची राष्ट्रीय आंतर-विद्यापीठ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

येथील छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या तीन खेळाडूंची 'अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ पॉवरलिफ्टिंग स्पर्धे'साठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या संघात निवड झाली आहे.

विद्यापीठाने जाहीर केलेल्या निवड यादीनुसारसुमेध चंदने (७४ किलो वजन गट), साक्षी पवार (८४ किलो) व वैष्णवी माने (८४ किलोवरील) या तिन्ही खेळाडूंनी विद्यापीठाच्या आंतर-महाविद्यालयीन स्पर्धेत आपापल्या वजन गटात प्रथम क्रमांक पटकावला होता. तसेच, 'ऑल इंडिया युनिव्हर्सिटी' (अखण) ने प्रत्येक वजन गटासाठी निश्चित केलेले किमान वजन उचलण्याचे कठीण पात्रता निकष यशस्वीपणे पूर्ण केल्यामुळे त्यांची या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या वर्षीच्या अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ पॉवरलिफ्टिंग स्पर्धेचे आयोजन चेन्नई (मद्रास) येथील 'हिंदुस्तान इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स' तर्फे करण्यात आले आहे.



या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक प्रा. संतोष गवळी, प्रा. सचिन गायकवाड, नवनाथ गायकर आणि गिरीश गिंडी यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या या दैदिप्यमान यशाबद्दल मराठा समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे, जनरल सेक्रेटरी महेश माने आणि प्राचार्य डॉ. नितीन मोटे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# इराणचा पुन्हा इस्रायलवर हल्ला

**● तेल अवीववर डागली क्षेपणास्त्रे ● इस्रायलने केले प्रतिहल्ले ● भारतीय नागरिकांना इराण सोडण्याचा सल्ला**



इस्रायलच्या क्षेपणास्त्र हल्ल्यानंतर तेहरानमध्ये इमारतींचे झालेले नुकसान

### युद्धविरामाच्या प्रयत्नांना सुरुंग

**इराण आणि अमेरिका यांच्यात कायमस्वरूपी युद्धविराम घडवून आणण्याचे प्रयत्न आधीच अयशस्वी होत होते. आता, इस्रायल आणि इराण यांच्यातील हल्ल्यांच्या मालिकेने शांततेच्या उरलेल्या आशांवर पाणी फेरले आहे. तज्ज्ञांच्या मते, जर हा तणाव लवकरच कमी झाला नाही, तर त्याचे रूपांतर एका विनाशकारी आणि मोठ्या युद्धात होऊ शकते.**

### संयम राखण्याचे ट्रम्प यांचे आवाहन

**राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांना तात्काळ मोठ्या प्रतिहल्ल्यापासून वाचण्यास सांगितले होते. तरीही यानंतरही इस्रायलने इराणमध्ये लष्करी कारवाई केली. इराण आणि इस्रायल यांच्यातील हा ताजा संघर्ष दोन्ही देशांमध्ये युद्धविरामाबाबत आधीपासूनच तणाव निर्माण झाला असताना झाला आहे.**

**तेहरान, ८ जून**

इराण आणि इस्रायल यांच्यात एप्रिलमध्ये युद्धविराम झाल्यानंतर आता दोन महिन्यांनी पुन्हा युद्ध सुरू झाले आहे. इराणणे रविवारी रात्री इस्रायलवर बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे डागली. ही कारवाई लेबनॉनमधील हिजबुल्लाहवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून करण्यात आली आहे.

हल्ल्यानंतर इस्रायलच्या अनेक भागांमध्ये सायरन वाजले आणि लोकांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले, असे इराणच्या रेव्होल्यूशनरी गार्डने सांगितले. याला प्रत्युत्तर म्हणून काही तासांनंतर इस्रायलने इराणमध्ये प्रतिहल्ले सुरू केले. पश्चिम आणि मध्य इराणमधील लष्करी तळांना लक्ष्य केले आहे, असे इस्रायली सैन्याने सांगितले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कडक सूचनांकडे दुर्लक्ष करून इस्रायलने इराणवर एक मोठा हल्ला केला. इस्रायली हवाई दलाने मध्य आणि पश्चिम इराणमधील लष्करी तळांना लक्ष्य केले. इराणच्या वृत्तसंस्थेनुसार, तेहरान, तब्रीझ आणि इस्फहानमध्ये अनेक स्फोट झाले. इस्रायलने हल्ल्यांमध्ये एअर-लॉन्च बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा वापर केला असल्याचा दावा इराणच्या रेव्होल्यूशनरी गार्डने केला.

हल्ल्यांनंतर इराणने तेहरानमधील इमाम खोमेनी आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आसपासची हवाई हद्द बंद केली. इराकने ७२ तास आणि सीरियाने १२ तासांसाठी आपली हवाई हद्द बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. इस्रायली लष्कराने स्वतः एक्स या समाज माध्यम खात्यावरील एका पोस्टद्वारे हवाई हल्ल्याची घोषणा केली. इराणच्या सरकारी टीव्हीनेही वृत्तसंस्थेचा हवाला देत, तेहरान तसेच इस्फहान आणि तब्रीझसारख्या शहरांमध्ये मोठ्या स्फोटांचे आवाज ऐकू आल्याची पुष्टी केली. या घटनेपूर्वी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांना फोन केला होता. ट्रम्प यांनी त्यांना इराणविरुद्ध कोणतीही प्रतिशोधात्मक लष्करी कारवाई करण्यापासून परावृत्त होण्यास स्पष्टपणे सांगितले होते. मात्र, इस्रायलने आपल्या सर्वात मोठ्या मित्र राष्ट्राच्या अध्यक्षांच्या या इशाऱ्याकडे दुर्लक्ष केले. (वृत्तसंस्था)



युरियासह अन्य खतांचा तुटवडा आणि काळाबाजार यामुळे संतप्त झालेल्या किसान मजदूर संघर्ष समितीच्या सदस्यांनी सोमवारी अमृतसर येथे आंदोलन केले

### राजौरीमध्ये केले तोफगोळे निकामी

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यात नियंत्रण रेषेवर सोमवारी दोन वेगवेगळ्या ठिकाणी तीन मोर्टारचे गोळे सापडले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. जांघर वनक्षेत्रात दोन मोर्टारचे गोळे आढळले, तर आणखी एक गोळा सोमवारी सकाळी नौशेरा सेक्टरमधील मकरी गावातील एका निर्जन ठिकाणी बेवारस अवस्थेत सापडला.

# फाल्ताचा 'पुष्पा' जहाँगीर खानला नेपाळ सीमेवर अटक

### 'एसटीएफ'ची कारवाई

**कोलकाता, ८ जून**



पश्चिम बंगालच्या फालता विधानसभा मतदारसंघातील तृणमूल काँग्रेसचा उमेदवार आणि पोलिस अधिकाऱ्याला पुष्पा स्टाईलमध्ये धमकी देणाऱ्या जहाँगीर खानला राज्य पोलिसांच्या विशेष चौकशी पथक अर्थात् एसटीएफने भारत-नेपाळ सीमेवर सोमवारी अटक केली.

निवडणुकीत हिंसाचार घडवल्याचा आरोप असलेला जहाँगीर खान दीर्घकाळापासून फरार होता. मतदानावेळी पोलिसांना उघड आव्हान दिल्याने तो चर्चेत आला होता. खंडणी वसुलीच्या आरोपाखाली त्याला उत्तर बंगालमधील भारत-नेपाळ सीमेवर अटक करण्यात आली, अशी माहिती पोलिसांनी दिली. कलकत्ता उच्च न्यायालयाने जहाँगीर खानला दिलेली अंतरिम सुरक्षा रद्द केली होती. त्याच्या विरोधात दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील फालता पोलिस ठाण्यात सात एफआयआर दाखल करण्यात आले आहेत, असे एका पोलिस अधिकाऱ्याने सांगितले.

पश्चिम बंगालमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान हिंसाचार आणि नियमांच्या उल्लंघनाचा आरोप झाल्यानंतर फाल्ता येथील मतदान रोखण्यात आले होते. निवडणुकीच्या काळात निवडणूक आयोगाने नियुक्त केलेल्या पोलिस अधिकाऱ्याला जहाँगीर खानने 'पुष्पा झुकेगा नही' असे म्हणत आव्हान दिले होते. त्यानंतर राज्यात सत्ताबदल झाल्यावर २१ मे रोजी फाल्तात झालेल्या फेरमतदानावेळी जहाँगीर खानने नाव मागे घेतले होते. मात्र, अभिषेक बॅनर्जी किंवा तृणमूल काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या निर्देशानुसार हा निर्णय घेतल्याचे त्याने स्पष्ट केले नव्हते. (वृत्तसंस्था)

### जमीन घोटाळा प्रकरणी सोरेनवर चालणार खटला

**रांची, ८ जून**

झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांना ईडी कोर्टाकडून मोठा झटका बसला आहे. रांचीतील बरियातू रोड परिसरातील ८.८६ एकर जमीन घोटाळा प्रकरणात दाखल करण्यात आलेली त्यांची डिस्चार्ज याचिका विशेष न्यायालयाने फेटाळली आहे. या निर्णयामुळे या प्रकरणात त्यांच्याविरोधातील खटला पुढे चालणार आहे. ईडीचे विशेष न्यायाधीश योगेश कुमार यांच्या न्यायालयाने सर्व पक्षांचे युक्तिवाद ऐकल्यानंतर ३ जून रोजी निर्णय राखून ठेवला होता. (वृत्तसंस्था)

# 'ब्रिक्स' जागतिक अर्थव्यवस्थेचा 'पॉवर हाऊस'

### व्लादिमिर पुतिन यांचे प्रतिपादन

**सेंट पीटर्सबर्ग, ८ जून**

जागतिक अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल दिसत असून, ब्रिक्स देश अर्थव्यवस्थेच्या विकासाचे मुख्य इंजीन झाले आहेत. मागील पाच वर्षांत जागतिक जीडीपीत जवळपास ४९ टक्के हिस्सा ब्रिक्स देशांचा आहे. उदयोन्मुख बाजारपेठा आता जागतिक स्तरावर स्वतःला एक प्रमुख आर्थिक शक्ती म्हणून प्रस्थापित करीत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होत आहे, असे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी सांगितले. ते २९ व्या 'सेंट् पीटर्सबर्ग इंटरनॅशनल इकॉनॉमिक फोरम'ला संबोधित करीत होते.



सध्या क्रयशक्तीच्या आधारे जागतिक जीडीपीत ब्रिक्सचे योगदान जवळपास ४० टक्के झाले आहे. या व्यतिरिक्त व्यापार आघाडींवर या देशांनी वेगाने प्रगती केली आहे. ब्रिक्सच्या स्थापनेपासून जागतिक वस्तू व्यापारातील त्याचा वाटा दुपटीपेक्षा अधिक वाढला आहे, असे पुतिन यांनी म्हटले.

ब्रिक्स आता केवळ पारंपरिक व्यापार आणि कमोडिटी निर्यातीपर्यंत मर्यादित राहिलेला नाही. जागतिक उच्च-तंत्रज्ञान आधारित निर्यातीत ब्रिक्सची हिस्सेदारी एकतृतीयांशपेक्षा जास्त झाली आहे. जागतिक सॉफ्टवेअर उद्योगात भारताची स्थिती अत्यंत बळकट आहे. दुसरीकडे जीन कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) पेटंटमध्ये जागतिक नेतृत्व करीत आहे. रशियाही डिजिटल मंच, वित्तीय क्षेत्रातील तंत्रज्ञान आणि अणुऊर्जा क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करीत आहे, असे पुतिन यांनी सांगितले.

आर्थिक विकासासोबत ब्रिक्सच्या मंचावरून जागतिक समानतेचा मुद्दाही उपस्थित करण्यात करण्यात आला. जग अधिक न्यायसंगत होते, त्यावेळी आर्थिक विकास जागतिक अर्थव्यवस्थेच्या मुख्य प्रवाहापासून दूर असणाऱ्या अब्जावधी लोकांपर्यंत पोहोचतो, असे पुतिन यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

### आफ्रिका-मध्य आशिया उगवत्या बाजारांचे भविष्य

**या आर्थिक कार्यक्रमात आफ्रिका आणि मध्य आशियासारख्या प्रदेशांमधील विकासाच्या संभाव्यतेवर प्रकाश टाकण्यात आला. उझबेकिस्तान आणि रशियातील सहकार्य केवळ व्यापारी पातळीवरील नव्हे, तर तांत्रिक आघाडी आणि संयुक्त उत्पादन प्रकल्पांमध्ये बदलत आहे. याचा एकूण पोर्टफोलियो ५० अब्ज डॉलर्सचा असल्याचे उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शवकत मिर्जियोयेव्ह यांनी सांगितले.**

## चित्रपट वार्ता

### 'द इंडिया स्टोरी'चा टीझर प्रदर्शित




**मुंबई :** काजल अग्रवाल आणि श्रेयस तळपदे यांच्या 'द इंडिया स्टोरी' चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला. या चित्रपटात खाण्यापिण्याच्या वस्तूंमधील भेसळ आणि शेतीत रसायनांच्या चुकीच्या वापराकडे लक्ष वेधले आहे. खाण्यापिण्याच्या वस्तूंमध्ये कशी भेसळ केली जाते आणि त्याने आपड कसे आजारी पाडतो हे दाखवण्यात आले आहे. हा चित्रपट लोकांना विचार करण्यास प्रवृत्त करेल आणि त्यांना जागरूक करेल. हा चित्रपट २४ जुलै रोजी प्रदर्शित होईल, असे टीझरच्या शेवटी सांगण्यात आले आहे. याचे दिग्दर्शक चेतन डीके आहेत. या चित्रपटाव्यतिरिक्त श्रेयस लवकरच 'गोलमाल ५' मध्येही दिसणार आहे. यात अजय देवगणही आहे.

### अक्षय कुमारने केला राजपालसोबत 'प्रॅन्क'

**मुंबई :** अक्षय कुमारने त्याच्या 'वेलकम टू द जंगल' चित्रपटाच्या सेटवरून एक 'बिहाइंड द सीन्स' व्हिडीओ समाज माध्यमावर शेअर केला आहे. व्हिडीओमध्ये त्याचा सहकलाकार राजपाल यादव दिसतो आहेत.



यामध्ये राजपाल यादव एका कुंपणाजवळ उभा आहे. तेवढ्यात अक्षय कुमार त्यांच्या मागे एक घोडा घेऊन पोहोचतो. घोडा राजपाल यादवने घातलेली विग कुरतडू लागतो. अचानक घडलेल्या या घटनेमुळे राजपाल यादव घाबरून ओरडतो. यानंतर अक्षय कुमार आणि राजपाल यादव दोघेही मोठ्याने हसतात. राजपाल यादवला आपली 'हॉर्सपॉवर' दाखवण्यात खूप मजा आली. 'वेलकम टू द जंगल' तुमच्या कल्पनेपेक्षाही जास्त जंगली आहे. २६ जून २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये भेटूया, असे व्हिडीओ शेअर करताना अक्षय कुमारने लिहिले.

### 'पेद्दी'ने गोळा केला १५० कोटींचा गल्ला




**मुंबई :** राम चरण आणि जान्हवी कपूर यांचा 'पेद्दी' चित्रपटाने अवघ्या तीन दिवसांत बॉक्स ऑफिसवर राज्य करत १०० कोटींचा टप्पा ओलांडला आहे. बुची बाबू सना दिग्दर्शित 'पेद्दी'ने अवघ्या दोन दिवसांत या चित्रपटाने जवळपास ९५ कोटी रुपयांचा बिझनेस केला. दरम्यान, प्रदर्शनाच्या तिसऱ्या दिवशी चित्रपटाने १०० कोटींचा आकडा पार केला. या चित्रपटाची भारतातील एकूण कमाई १२५.४० कोटी रुपयांवर पोहोचली आहे. या चित्रपटाने तेलुगूमध्ये ११५.६५ कोटी कमावले आहेत. हिंदी भाषेत ८.०५ कोटी, कन्नडमध्ये ५९ लाख तर, मल्याळममध्ये १६ लाख आणि तामिळमध्ये ९५ लाख रुपयांचा बिझनेस केला.

# राज्यसभेसाठी भाजपाचा तिसरा उमेदवार

### काँग्रेसच्या नटराजनविरोधात महेश केवट मैदानात

**भोपाळ, ८ जून**

भाजपाने मध्य प्रदेशातील राज्यसभेच्या तीन जागांसाठी होणाऱ्या निवडणुकीत महेश केवट यांना तिसरे उमेदवार म्हणून मैदानात उतरवले आहे. मत्स्यव्यवसाय कल्याण मंडळाचे अध्यक्ष केवट काँग्रेसच्या उमेदवार मीनाक्षी नटराजन यांच्या विरोधात निवडणूक लढवतील. यापूर्वी, शनिवारी भाजपाचे दोन उमेदवार तरुण चुघ आणि रजनीश अग्रवाल यांनी राज्यसभेच्या निवडणुकीसाठी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते.

तिसऱ्या उमेदवाराबाबत रविवारी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी भाजपा नेत्यांची बैठक झाली. या बैठकीत तिसरे उमेदवार म्हणून केवट यांच्या नावावर एकमत झाले. त्यानंतर केंद्रीय नेतृत्वाने त्याला मंजुरी दिली. भाजपच्या केंद्रीय निवडणूक समितीने रात्री केवट यांची तिसरे उमेदवार म्हणून घोषणा केली. दरम्यान, सोमवारी राज्यसभा निवडणुकीसाठी काँग्रेसच्या उमेदवार मीनाक्षी नटराजन यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

**विजयासाठी भाजपाला आणखी १० मतांची गरज**

२३० सदस्यसंख्या असलेल्या मध्य प्रदेश विधानसभेत प्रभावी मतसंख्या २२८ आहे. यापैकी भाजपाचे १६४ आणि काँग्रेसचे ६४ आमदार आहेत. काँग्रेस आमदार निर्मला सप्रे भाजपाच्या बाजूने दिसत आहे. तर आमदार मुकेश मल्होत्रा यांच्या मतदानावर बंदी असल्यामुळे काँग्रेसची प्रभावी संख्या ६२ वर आली आहे. राज्यसभा निवडणुकीत विजयासाठी प्रत्येक उमेदवाराला ५८ मतांची आवश्यकता आहे. त्यामुळे भाजपाचे दोन उमेदवार ११६ मतांचा कोटा पूर्ण करून सहज विजयी होतील. यानंतर भाजपाकडे ४८ मते शिल्लक राहतील. त्यांना तिसऱ्या जागेसाठी आणखी १० मतांची आवश्यकता असेल. (वृत्तसंस्था)

# भारत-चीन स्पर्धक नव्हे, भागीदार

### चीनची बदलती भूमिका

**बीजिंग, ८ जून**

चीन आणि भारताने योग्य धोरणात्मक दृष्टिकोन बाळगला पाहिजे. त्यानुसार ते परस्परांचे प्रतिस्पर्धी नसून, सहकार्य करणारे भागीदार आहेत आणि एकमेकांच्या विकासासाठी संधी आहे, धोके नाहीत, असे एका वरिष्ठ चिनी अधिकाऱ्याने सोमवारी सांगितले.

भारत-चीनने जवळचे संबंध टिकवून ठेवले पाहिजे, असे रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी गुरुवारी जगातील प्रमुख वृत्तसंस्थांच्या प्रमुखांशी संवाद साधताना म्हटले होते. त्यांच्या वक्तव्यावर विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते लिन जियान यांनी उपरोक्त वक्तव्य केले. सध्या चीन-भारत परिस्थिती सर्वसाधारणपणे स्थिर आहे आणि दोन्ही बाजूंमध्ये संवादाची सुरळीत यंत्रणा कार्यरत आहे, असे लिन यांनी सांगितले.

दोन्ही देश परस्परांचे स्पर्धक किंवा प्रतिस्पर्धी नसून सहकार्य करणारे भागीदार आहेत आणि ते एकमेकांसाठी धोके नसून, विकासाच्या संधी आहेत, या दृष्टिकोनावर चीन आणि भारताने ठाम राहिले पाहिजे, असे लिन यांनी सांगितले. दोन्ही बाजूंनी द्विपक्षीय संबंधांकडे धोरणात्मक उंचीवरून आणि दीर्घकालीन दृष्टिकोनातून पाहणे व हाताळणे, परस्पर विश्वास वाढवणे व सहकार्य विस्तारणे तसेच मतभेद योग्यरीत्या हाताळून भारत-चीन संबंधांचा सुदृढ व स्थिर विकास साधणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

भारत आणि पाकिस्तानने संवाद आणि चर्चेद्वारे आपापले मतभेद योग्य प्रकारे हाताळावेत आणि या प्रदेशात शांतता आणि स्थिरता राखण्यासाठी संयुक्तपणे प्रयत्न करावेत, याला आमचा पाठिंबा आहे, असे पाकिस्तानसोबत चीनच्या घनिष्ट संबंधांबाबत भारताच्या चिंतेवर भाष्य करताना लिन म्हणाले. (वृत्तसंस्था)

### भारत-चीन आणि रशिया उदयोन्मुख अर्थव्यवस्था

**भारत-चीन आणि रशिया या उदयोन्मुख अर्थव्यवस्था आहेत आणि त्यांच्यात सलोख्याचे संबंध राखणे हे केवळ त्या देशांच्याच नव्हे, तर जागतिक शांतता, सुरक्षा आणि स्थैर्याच्याही हिताचे आहे, असे या तीन देशामधील संबंधांवर भाष्य करताना लिन म्हणाले. त्रिपक्षीय सहकार्य पुढे नेण्यासाठी रशिया आणि भारताशी संवाद कायम ठेवण्यास चीन तयार आहे, असे त्यांनी नमूद केले.**

# वैभव नाईक यांच्या मालमत्तांची चौकशी

**मुंबई, ८ जून**

ठाकरे गटाचे रत्नागिरी येथील जिल्हाप्रमुख आणि माजी आमदार वैभव नाईक यांच्या बेहिशेबी मालमत्तेची पुन्हा रत्नागिरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून (एसीबी) चौकशी सुरू केली आहे.

एसीबीने कणकवली नगरपंचायतीकडे एक पत्र पाठवून वैभव नाईक यांनी खरेदी केलेल्या व्यापारी गाळ्यांबाबत सविस्तर माहिती मागविली आहे. एसीबीच्या या पावलामुळे राजकीय वर्तुळात आणि जिल्ह्यात या प्रकरणाची पुन्हा जोरदार चर्चा रंगली आहे. (वृत्तसंस्था)

### खान सरांची आता होणार कोर्टरूममध्ये परीक्षा

**पाटणा, ८ जून**

खान ग्लोबल स्टडीज संस्थेशी संबंधित गोळीबार आणि हिंसाचार प्रकरणात नवा टप्पा गाठला गेला असून संस्थेचे संचालक फैसल खान उर्फ खान सर यांनी अटकपूर्व जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. या प्रकरणात आधीच अटक करण्यात आलेल्या दोन सुरक्षारक्षकांच्या जामीन अर्जांवरही न्यायालयात सुनावणी झाली.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने निकाल राखून ठेवला आहे. तपासादरम्यान सुरक्षारक्षकांनी दिलेल्या जबानीमुळे प्रकरण अधिक गुंतागुंतीचे बनले आहे. त्यांच्या निवेदनाच्या आधारे पोलिसांनी फैसल खान यांचे नावही गुन्ह्यात समाविष्ट केले आहे. घटनेनंतर अनेक दिवस उलटूनही खान सर पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. त्यांच्या ठिकाणाबाबत विविध चर्चा सुरू असल्या तरी अधिकृतरीत्या कोणतीही माहिती समोर आलेली नाही. दरम्यान, ते आत्मसमर्पण करणार असल्याच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र त्यांच्या वकिलांनी या चर्चांना पूर्णविराम देत अशा कोणत्याही शक्यता नाहीत. कायदेशीर मार्गानेच आपली बाजू मांडली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. (वृत्तसंस्था)

# बांगलादेशातील ४८०० घुसखोरांना पाठविले परत



### अनेक घुसखोर स्वतःहून परतले

**उत्तर २४ परगणा जिल्ह्यातील हकीमपूर सीमेवरील लोकांच्या हालचालींकडे लक्ष वेधताना अधिकारी म्हणाले, अनेक बेकायदेशीर स्थलांतरित स्वतःहून निघून गेले आहेत. बंगालची लोकसंख्या रचना बदलली आहे, असा दावा त्यांनी केला. येथील विधानसभा निवडणुकीत बांगलादेशातून होणारी घुसखोरी आणि लोकसंख्या रचनेतील बदल हे भाजपाचे सर्वात मोठे मुद्दे होते. राजकीय फायद्यासाठी ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वातील सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले असा दावा त्यांनी केला.**

**होल्डिंग सेंटरमधील ८३६ प्रतीक्षेत**

**कोलकाता, ७ जून**

पश्चिम बंगालमधील सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये उभारण्यात आलेल्या 'होल्डिंग सेंटर्स'मधून जवळपास ४८०० घुसखोरांना बांगलादेशात पाठविण्यात आले. अशा प्रकारच्या ८३६ व्यक्तींना परत पाठवण्याची प्रक्रिया प्रलंबित आहे, अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी दिली.

बंगालमध्ये घुसखोरी हा एक मोठा मुद्दा आहे, असे अधिकारी यांनी ठामपणे सांगितले. भारत-बांगलादेश सीमेवर कुंपण घालण्यासाठी गरज असलेल्या ५५६ किमीपैकी १०० किमीची जागा अगोदरच सीमा सुरक्षा दल अर्थात् बीएसएफला हस्तांतरित करण्यात आली आहे, असे ते म्हणाले.

जमीन हस्तांतरणाची प्रक्रिया ही सातत्याने होणारी आहे आणि देशाच्या सुरक्षेसाठी ती आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय सीमा सुरक्षित करण्यास राज्याचे प्राधान्य आहे. आम्ही बीएसएफला १०० किमी जागा हस्तांतरित केली असून, उत्तर बंगालमधील चिकन नेक कॉरिडॉरला प्राधान्य दिले जात आहे, असे शुभेन्दू अधिकारी यांनी येथे भाजपा कार्यकर्त्यांच्या विशेष प्रशिक्षण कार्यक्रमाला संबोधित करताना सांगितले.

चिकन नेक हा उत्तर बंगालमधील जमिनीचा एक अरुंद पट्टा आहे. हा सुमारे २०-२२ किमी रुंद आणि जवळपास ५० किमी लांब असून, त्याला अधिकृतपणे सिलिगुडी कॉरिडॉर म्हणून ओळखले जाते. हा पट्टा भारताच्या उर्वरित भागाला ईशान्येकडील राज्यांशी जोडतो. सुरक्षा आणि सामरिक अशा दोन्ही दृष्टिकोनांतून हा भाग एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि संवेदनशील जीवनवाहिनी मानला जातो.

पश्चिम बंगाल सर्व राज्यांमध्ये बांगलादेशी सर्वात लांब आंतरराष्ट्रीय सीमा सामायिक करते, ती एकूण ४०९६ किमीपैकी २,२१७ किमी पसरलेली आहे. नागरिकत्व सुधारणा कायद्याच्या कक्षेत न येणाऱ्या बेकायदेशीर स्थलांतरितांना केंद्र सरकारच्या कायद्यानुसार परत पाठवण्याची प्रक्रिया राज्य सरकारने सुरू केली आहे. या घुसखोरांना थेट बीएसएफच्या ताब्यात दिले जात आहे, असे अधिकारी यांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# ही लढाई सोपी नाही

सरकारला प्रश्न विचारणे, व्यवस्थेच्या विरोधात आवाज उठविणे, हा राज्यघटनेने दिलेला हक्क बजावण्याबाबत आज जनतेमध्ये कमालीची जागृती झालेली असल्याने, अनेक जण व्यवस्था आणि सरकारच्या विरोधात बंडाच्या पवित्र्यात दंड थोपटून उभे राहू लागले आहेत. समाज जागा झाला आहे, जागरूक झाला आहे. पण या जागरूकतेमुळेच, एका महत्त्वाच्या मुद्याचा सामाजिक विसर पडेल की काय अशी भीती वाढू लागली आहे. सारे काही सरकारने केले पाहिजे, समाजातील प्रत्येक बऱ्या-वाईटास सरकार आणि यंत्रणांना जबाबदार धरून त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याच्या शक्तीची जाणीव झाल्यापासून समाजाची स्वतःकडे वळून पाहण्याची सवय कमी होत आहे की काय, याचा शोध घ्यायची वेळ येणार आहे. सरकारसोबत समाजानेही आत्मचिंतन करावयास हवे. त्याकडे दुर्लक्ष झालेच, तर त्याचे परिणाम काळजी करावयास लावणारेच असतील. महागाई, बेरोजगारी, शिक्षणव्यवस्थेतील गैरव्यवहार आदी बाबींमुळे आजच्या तरुणाईचे भवितव्य टांगणीला लागले आहे, हे खरेच आहे. या समस्यांबाबत कमालीची जागरूकता निर्माण झाली असून या समस्यांच्या विरोधात सरकारला जाब विचारणारा तरुण रस्त्यावर उतरू लागल्याने, समस्यांचे गांभीर्य व्यवस्थांना नजरेआड करता येणार नाही, हे वास्तव आहेच, पण याच संघर्षात, तरुणाईच्या भविष्यालाच आव्हान देणाऱ्या काही समस्या मात्र उग्र होत असताना आणि त्याच्या विरोधात संघर्षाकरिता दंड थोपटण्यासाठी तरुणाईनेच पुढाकार घेण्याची गरज आहे. या समस्येचे काही दुष्परिणाम अनेक घराघरांपर्यंत पोहोचू लागलेले आहेत. केवळ तरुण पिढीच नव्हे, तर अनेक कुटुंबे या समस्येपायी उद्ध्वस्त होण्याची वेळ आलेली आहे आणि तरुण पिढी मात्र त्याची फारशी दखल घेताना दिसत नसल्याने, ही समस्या सातत्याने सुखैनेव वाढतच चालली आहे. ही बाब गंभीर आहेच, पण केवळ तरुणांच्या, कुटुंबांच्याच नव्हे, तर देशाच्या भवितव्याच्या दृष्टीनेही हिताची नसल्याने, समाजाला घडविण्याच्या कामी प्रभावी ठरणारा घटक म्हणून तरुण पिढीने या समस्येला प्राधान्य द्यावयास हवे. सुदैवाने, या समस्येबाबत सरकार आणि सरकारी यंत्रणा कमालीच्या जागरूक असलेल्या दिसतात. ती दूर करण्यासाठी सातत्याने सर्व पातळ्यांवर कठोर प्रयत्नदेखील सुरू असलेले दिसतात, पण ज्यांना या समस्येने ग्रासले आहे, त्या तरुणाईची मात्र या कामी सरकारला पुरेशी साथ मिळत नसावी. ही समस्या म्हणजे, अमली पदार्थांच्या व्यसनाच्या विळख्यात ओढल्या जाणाऱ्या तरुण पिढीच्या भविष्यासमोर उभी राहिलेली ही समस्या पुसून टाकण्यासाठी तरुणांनीच पुढाकार घ्यायची गरज.

महाराष्ट्राला औद्योगिक प्रगती, शैक्षणिक गुणवत्ता, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक नेतृत्वाची मोठी परंपरा लाभलेली आहे. या परंपरेचा महाराष्ट्राने नेहमीच अभिमान बाळगला आहे. परंतु राज्यातील अंमली पदार्थांच्या विळख्याचे संकट मात्र, या परंपरेस आतून पोखरणारे ठरत आहे. पुणे-अहिल्यानगर मार्गावरील तुळापूर येथील एका शेतघरातील प्रोजेक्ट एक्स नावाच्या एका रेव्ह पार्टीवर पोलिसांच्या गुन्हे शोध शाखेने छापा घातल्यानंतर मद्यधुंद अवस्थेत सापडलेल्या तरुण-तरुणींच्या टोळक्याने या संकटाचे प्रश्नचिन्ह पुन्हा ठळक केले आहे आणि मुंबईच्या वरळी येथील एका संगीत कार्यक्रमात एका तरुणाच्या अति मद्यसेवनामुळे ओढवलेल्या मृत्यूने समाजास अंतर्मुख होण्यास भाग पाडले आहे. गेल्या काही वर्षांत मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, पिंपरी-चिंचवड यासारख्या शहरांमध्ये अंमली पदार्थांच्या तस्करीची, विक्रीची आणि सेवनाची प्रकरणे वेगाने वाढली आहेत. अशा घटना समोर आल्या की समाज नेहमीच सरकारला धारेवर धरण्यासाठी सरसावतो. तसे व्हायला हवेच, पण ज्या घरांतील तरुण मुले-मुली अशा पार्ट्यांमध्ये देहभान आणि सारे काही विसरून आपल्या भवितव्यासमोर स्वहस्ते प्रश्न निर्माण करतात, त्या घरांच्या जबाबदारीसाठी कोणास धारेवर धरावयाचे हा प्रश्न मात्र शिल्लक राहतो. तुळापूरच्या त्या पार्टीत अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्या तरुणांचा धिंगाणा व्यवस्थेला जाब विचारणारा आहेच, पण ज्या समस्यांसाठी ही तरुणाई सरकारच्या विरोधात दंड थोपटून उभी राहत असते, तीच तरुणाई समाजासमोर असे प्रश्न निर्माण करण्यास जबाबदार असेल, तर त्याचा जाब कोणास विचारावा आणि त्याची जबाबदारी समाजाने का घ्यायची नाही, हा प्रश्न विचारला गेला पाहिजे. तो पचण्यास अवघड आहे, हे खरेच, पण त्यामुळे त्याकडे कानाडोळा करून चालणार नाही. कारण या समस्येने केवळ कायदा-सुव्यवस्थेचाच नव्हे तर संपूर्ण समाजव्यवस्थेचाच प्रश्न निर्माण केला आहे.

अमली पदार्थांच्या व्यसनाधीनतेच्या या वाढत्या संकटाला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने ३१ ऑगस्ट २०२३ रोजी अमली पदार्थविरोधी विशेष टास्क फोर्सची स्थापना केली. राज्याच्या इतिहासात प्रथमच अंमली पदार्थांविरोधात स्वतंत्र आणि केंद्रीकृत स्वरूपाची यंत्रणा उभारण्यात आली. राज्याने या समस्येची गांभीर्याने दखल घेतल्याचे त्यातून दिसून आले. मात्र जवळपास तीन वर्षांनंतरही, परिस्थितीमध्ये फारसा बदल झालेला दिसत नाही. टास्क फोर्सची स्थापना झाली, मोठमोठ्या कारवाया झाल्या, हजारो कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त झाले; तरीही राज्यातील अमली पदार्थांचा सुळसुळाट मात्र थोपवता आलेला नाही. याचे उत्तर शोधण्यासाठी केवळ आकडेवारीकडे पाहून चालणार नाही. त्यामागील सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि मानसिक वास्तव समजून घ्यावे लागेल. अमली पदार्थांविरोधी टास्क फोर्सच्या स्थापनेनंतर राज्यभरात मोठ्या प्रमाणावर कारवाया झाल्या. अनेक उत्पादन केंद्रे उद्ध्वस्त करण्यात आली. हजारो कोटी रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. अनेक तस्करांना अटक झाली. काही ठिकाणी संघटित गुन्हेगारीविरोधी कायद्यांचाही वापर करण्यात आला. परंतु याच आकडेवारीची दुसरी बाजू अधिक अस्वस्थ करणारी आहे. जप्तीचे आकडे जितके वाढतात, तितकाच एक प्रश्न मोठा होतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त होत असेल तर, त्या व्यसनाच्या विळख्यात अडकलेल्यांची संख्या किती असेल आणि त्यांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी बाजारात प्रत्यक्ष किती माल पोहोचत असेल, हा प्रश्न केवळ सरकारला विचारणे पुरेसे नाही. याचे उत्तर शोधण्यासाठी समाजाने पुढाकार घ्यायला हवा.

पूर्वी अमली पदार्थांचे सेवन हे महानगरांतील उच्चभ्रू वर्गापुरते मर्यादित असल्याचा समज होता. आज तो पूर्णपणे चुकीचा ठरला आहे. म्हणूनच, अंमली पदार्थांच्या प्रश्नाकडे केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे पुरेसे नाही. हा प्रश्न समाजाच्या आरोग्याशी, कुटुंबव्यवस्थेशी आणि भविष्याशी जोडलेला आहे. एखादा तरुण व्यसनाधीन होतो तेव्हा त्याचा परिणाम फक्त त्याच्यावर होत नाही. त्याचे शिक्षण विस्कळीत होते, रोजगाराच्या संधी कमी होतात, मानसिक संतुलन बिघडते आणि संपूर्ण कुटुंब संकटात सापडते. महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांमध्ये व्यसन हा कौटुंबिक कलहाचा प्रमुख विषय बनत आहे. अंमली पदार्थांचा वाढता वापर आणि गुन्हेगारी यांचा परस्परसंबंधही अत्यंत गंभीर आहे. व्यसनाधीन व्यक्तींमध्ये आर्थिक गुन्हे, हिंसाचार आणि लैंगिक अत्याचार यांचे प्रमाण तुलनेने अधिक असते. ड्रग्जच्या पैशातून संघटित गुन्हेगारी वाढते. हवाला व्यवहार, खंडणी, शस्त्रांची तस्करी आणि आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी नेटवर्क यांना आर्थिक बळ मिळते. त्यामुळे अमली पदार्थांचा प्रश्न हा अखेरीस राष्ट्रीय सुरक्षेशीही जोडला जातो. म्हणूनच, या समस्येकडे केवळ सनसनाटी गुन्हेगारी म्हणून न पाहता मानवी आणि सामाजिक संकट म्हणून पाहिले पाहिजे.

आज महाराष्ट्र एका वळणावर उभा आहे. एका बाजूला प्रगत राज्य अशी ओळख भक्कम होत आहे तर दुसऱ्या बाजूला तरुण पिढीला गिळंकृत करण्यासाठी सज्ज असलेले अमली पदार्थांचे जाळे आहे. कोणतेही युद्ध जिंकण्यासाठी केवळ शस्त्र पुरेसे नसते. त्यासाठी व्यापक सामाजिक जागरूकता, कठोर राजकीय इच्छाशक्ती, प्रभावी पुनर्वसन व्यवस्था आणि कुटुंबसंस्थेची मजबूत साथ आवश्यक असते. अन्यथा कठोर कारवाया होत राहतील, टास्क फोर्सची यंत्रणा विस्तारत राहील; पण समाजाच्या हातातून त्याची तरुण पिढी निसटत राहील.

## आंतरराष्ट्रीय

# मध्यपूर्वेतील अस्थिरतेचे नवे आव्हान

प्रा. जयसिंग यादव



भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावर वसलेला लेबनान हा देश आकाराने लहान असला, तरी मध्यपूर्वेच्या राजकारणात त्याचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. गेल्या काही दशकांपासून हा देश प्रादेशिक शक्तिसंघर्ष, धार्मिक ध्रुवीकरण, बाह्य हस्तक्षेप आणि अंतर्गत राजकीय अस्थिरता यांचा केंद्रबिंदू राहिला आहे. अशा परिस्थितीत लेबनॉनमध्ये पुन्हा वाढत असलेला तणाव आणि युद्धविरामाच्या प्रयत्नांबाबत निर्माण झालेली अनिश्चितता ही केवळ एका देशाची समस्या नसून संपूर्ण मध्यपूर्वेच्या भवितव्याशी संबंधित बाब आहे. हिजबुल्लाहची भूमिका, इस्रायलची सुरक्षा धोरणे, इराणचा प्रभाव आणि अमेरिकेची मध्यस्थी यामुळे हा संघर्ष अधिक गुंतागुंतीचा बनला आहे. आज जग एका अशा टप्प्यावर उभे आहे, जिथे युद्धे केवळ रणांगणावर लढली जात नाहीत, तर राजनैतिक मंचांवर, आर्थिक धोरणांमध्ये आणि जनमताच्या पातळीवरही लढली जातात. लेबनानमधील परिस्थिती हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. संघर्षातील प्रत्येक पक्ष आपली भूमिका योग्य असल्याचा दावा करतो; परंतु या सर्व दाव्यांच्या पलीकडे एक मूलभूत प्रश्न उभा राहतो, तो म्हणजे या संघर्षाचा शेवट नेमका कोणाच्या हितासाठी आणि कोणत्या मार्गाने होणार आहे? मध्यपूर्वेतील राजकारण समजून घेताना हिजबुल्लाहकडे केवळ एका सशस्त्र संघटनेच्या रूपात पाहणे अपुरे ठरते. लेबनॉनच्या सामाजिक आणि राजकीय संरचनेत या संघटनेचे खोलवर अस्तित्व आहे. देशातील अनेक भागांमध्ये तिचा प्रभाव केवळ सुरक्षा विषयांपुरता मर्यादित नसून सामाजिक सेवा, राजकीय प्रतिनिधित्व आणि स्थानिक नेतृत्वाशीही जोडलेला आहे. त्यामुळे लेबनॉनमधील कोणतीही शांतता प्रक्रिया हिजबुल्लाहला पूर्णपणे बाजूला ठेवून यशस्वी होईल, अशी अपेक्षा वास्तववादी वाटत नाही.

शांततेसाठी नेहमीच संवाद आवश्यक असतो आणि संवादासाठी सर्व प्रभावी घटकांचा सहभाग आवश्यक असतो. दुसरीकडे, इस्रायलची भूमिकादेखील समजून घेणे आवश्यक आहे. इस्रायलने आपल्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. सीमावर्ती भागांमधून होणारे हल्ले, क्षेपणास्त्रांचा धोका आणि शत्रुत्वाची भावना यामुळे इस्रायल अनेकदा कठोर लष्करी कारवाया करतो. त्याच्या दृष्टीने या कारवाया राष्ट्रीय सुरक्षेचा भाग असतात; परंतु प्रत्येक लष्करी कारवाईचे परिणाम केवळ लक्ष्यांपुरते मर्यादित राहत नाहीत. त्याचा परिणाम सामान्य नागरिकांवर, पायाभूत सुविधांवर आणि समाजाच्या मानसिकतेवरही होतो. युद्ध जितके लांबते, तितकी द्वेषाची दरी खोल होत जाते. या संपूर्ण समीकरणात इराणची भूमिका अत्यंत संवेदनशील आहे. इराण आणि इस्रायल यांच्यातील तणाव हा आजच्या मध्यपूर्वेतील सर्वात गंभीर भू-राजकीय प्रश्नांपैकी एक मानला जातो. लेबनानमधील संघर्षाला व्यापक प्रादेशिक संघर्षाचे स्वरूप प्राप्त झाले, तर त्याचे परिणाम दूरगामी ठरू शकतात. अशा परिस्थितीत केवळ लेबनान किंवा इस्रायल नव्हे, तर संपूर्ण प्रदेश अस्थिरतेच्या गर्तेत जाऊ शकतो. यामुळे ऊर्जा बाजारपेठा, जागतिक व्यापार आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेवरही परिणाम होऊ शकतो. अमेरिकेने अनेक दशकांपासून मध्यपूर्वेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी विविध प्रयत्न केले आहेत. काही प्रयत्न यशस्वी ठरले, तर काही अपयशी; मात्र इतिहास सांगतो, की स्थानिक घटक तयार असतात, तेव्हाच बाह्य शक्तींची मध्यस्थी प्रभावी ठरते. कोणत्याही संघर्षाचा तोडगा बाहेरून लादता येत नाही. तो संबंधित समाजांनी आणि नेतृत्वाने स्वीकारला पाहिजे. अन्यथा करार कागदावर राहतात आणि वास्तवात संघर्ष कायम राहतो.

लेबनॉनची अंतर्गत परिस्थितीही हे संकट अधिक गंभीर बनवते. गेल्या काही वर्षांमध्ये देशाने आर्थिक दिवाळखोरी, चलनवाढ, बेरोजगारी आणि राजकीय अनिश्चिततेचा सामना केला आहे. अनेक कुटुंबांचे जीवन आधीच संकटात सापडले आहे. अशा वेळी संघर्ष तीव्र झाल्यास सामान्य नागरिकांची परिस्थिती बिकट होऊ शकते. युद्धाचा सर्वांत मोठा फटका युद्धाशी प्रत्यक्ष संबंध नसलेल्यांना बसतो. त्यांच्या घरांचे, रोजगाराचे, शिक्षणाचे आणि भविष्याचे नुकसान होते. युद्धाच्या बातम्यांमध्ये अनेकदा शस्त्रास्त्रे, रणनीती आणि राजकीय घोषणा यांवर भर दिला जातो; परंतु प्रत्येक संघर्षामागे मानवी वेदनांची एक मोठी कहाणी दडलेली असते. हजारो कुटुंबे विस्थापित होतात. मुलांचे शिक्षण खंडित होते. रुग्णालयांवर ताण वाढतो आणि संपूर्ण पिढी असुरक्षिततेच्या वातावरणात वाढते. त्यामुळे कोणत्याही संघर्षाचे मूल्यांकन करताना मानवी हक्क आणि मानवी जीवन केंद्रस्थानी ठेवले पाहिजे. आजची सर्वांत मोठी गरज म्हणजे संयम आणि संवाद. संघर्षातील कोणताही पक्ष स्वतःला पूर्णपणे विजयी समजू शकत नाही. आधुनिक युद्धांमध्ये स्पष्ट विजयापेक्षा दीर्घकालीन नुकसान अधिक दिसून येते. आर्थिक संसाधने खर्ची पडतात, सामाजिक एकात्मता कमकुवत होते आणि भविष्यातील विकासाला मोठा धक्का बसतो. त्यामुळे युद्ध सुरू ठेवण्यापेक्षा संवादाचा मार्ग स्वीकारणे अधिक शहाणपणाचे ठरते.

मध्यपूर्वेच्या इतिहासात अनेक वेळा असे क्षण आले आहेत, जेव्हा परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती निर्माण झाली; परंतु त्याच इतिहासात संवाद, करार आणि राजनैतिक प्रयत्नांमुळे संघर्ष कमी झाल्याची उदाहरणेही आहेत. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीकडे निराशेने नव्हे, तर जबाबदारीच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. आंतरराष्ट्रीय समुदाय, प्रादेशिक शक्ती आणि स्थानिक नेतृत्व यांनी एकत्रितपणे शांततेसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. आज लेबनानमधील संघर्ष हा केवळ सीमावाद किंवा लष्करी कारवायांचा विषय राहिलेला नाही. तो मध्यपूर्वेच्या भविष्यातील राजकीय व्यवस्थेची, प्रादेशिक संतुलनाची आणि जागतिक स्थैर्याची कसोटी बनला आहे. हा संघर्ष अधिक विस्तारल्यास अनेक देशांना परिणाम भोगावे लागू शकतात; परंतु संवाद आणि राजनैतिक प्रयत्नांना प्राधान्य दिले गेल्यास शांततेच्या नव्या अध्यायाला सुरुवात होऊ शकते. शांतता ही कधीही सहज मिळत नाही. ती संयम, विश्वास आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांनी निर्माण करावी लागते. लेबनानमधील सध्याची परिस्थिती जगाला हेच स्मरण करून देते, की युद्धाची किंमत नेहमीच शांततेपेक्षा अधिक असते. म्हणूनच आज गरज आहे ती शस्त्रांच्या आवाजापेक्षा संवादाच्या भाषेला महत्त्व देण्याची. कारण अखेरीस कोणत्याही राष्ट्राचा खरा विजय रणांगणावर नव्हे, तर आपल्या नागरिकांना सुरक्षित, स्थिर आणि सन्मानाचे जीवन देण्यात असतो.

मध्यपूर्व हा प्रदेश गेल्या अनेक दशकांपासून संघर्ष, राजकीय स्पर्धा, धार्मिक ध्रुवीकरण आणि जागतिक महासत्तांच्या हस्तक्षेपामुळे सतत अस्थिर राहिला आहे. इस्रायल-पॅलेस्टाईन संघर्ष, सीरिया युद्ध, इराण-सौदी अरेबिया स्पर्धा आणि विविध सशस्त्र संघटनांची उपस्थिती यामुळे या प्रदेशात शांतता प्रस्थापित करण्याचे प्रयत्न वारंवार अपुरे ठरले आहेत. अशा परिस्थितीत लेबनॉनमधील तणाव पुन्हा एकदा वाढताना दिसत आहे. हिजबुल्लाहने युद्धविरामाच्या प्रस्तावाला विरोध दर्शविल्याची माहिती समोर येत असताना आणि इस्रायलने लष्करी कारवाया सुरू ठेवण्याची भूमिका घेतल्याने संपूर्ण प्रदेशातील स्थैर्यापुढे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. युद्धविराम हा कोणत्याही संघर्षाच्या समाप्तीचा अंतिम उपाय नसला, तरी शांततेकडे जाणारा पहिला आणि अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. संघर्षग्रस्त भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी, मानवी मदत पोहोचवण्यासाठी आणि राजनैतिक चर्चेसाठी वातावरण तयार करण्यासाठी युद्धविराम आवश्यक मानला जातो; मात्र संघर्षातील सर्व प्रमुख पक्ष चर्चेचा भाग नसतात किंवा कराराला त्यांची मान्यता नसते, तेव्हा अशा प्रयत्नांचे यश अनिश्चित बनते. लेबनॉनमधील सध्याच्या घडामोडी याच वास्तवाची आठवण करून देतात.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

# शोषणमुक्त ग्राहकासाठी कायद्याची गरज

चंद्रकांत लोहाणा

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये ग्राहकाला दैवत म्हणून संबोधले जाते. त्यास राजाचीही उपाधी दिली जाते. असे असतानाही हा वर्ग उपेक्षित आहे. कोणतीही कंपनी आपले उत्पादन बाजारामध्ये आणताना त्यावर कमाल किरकोळ किंमत छापत असते. या मागचा शुद्ध हेतू असा की, ग्राहकाला ती विकत घेतली जाणारी वस्तू छापील किमतीपेक्षा जास्त दराने विकली जाऊ नये आणि विक्रेत्याकडून ग्राहकांची लूट होऊ नये. जर कोणी एखादा विक्रेता छापील किमतीपेक्षा जास्त किंमत लावून ती वस्तू विकत असेल तर त्या ग्राहकाला अन्यायाविरोधात दाद मागण्याचा कायदेशीर अधिकार आहे. परंतु, प्रत्यक्षात उत्पादनावर छापली जाणारी कमाल किरकोळ किंमत हेच ग्राहकांना लुटण्याचे मुख्य शस्त्र बनले आहे. हे अनेक ग्राहकांना अजूनही माहीत नाही किंवा त्याबद्दल समाजामध्ये फारशी जनजागृतीही दिसून येत नाही. छोट्या किराणा दुकानांपासून तर मॉल्सपर्यंत सर्वत्र कमाल किरकोळ किमतीवर आकर्षक जाहिराती केल्या जातात; ग्राहक अशा जाहिरातीमध्ये अडकतात.

कंपनीमध्ये तयार होणाऱ्या कोणत्याही वस्तूवर एमआरपी किती टाकावी याबाबत भारतामध्ये असा कोणताही स्पष्ट कायदा नाही. एखाद्या वस्तूचे उत्पादन मूल्य जर १०० रुपये असेल आणि सर्व खर्च व नफा धरून ती वस्तू दुकानामध्ये १५० रुपयांमध्ये पोहोचत असेल तर ती किती कमाल किमतीमध्ये विकली जावी हा मुळात कायदाच नाही. त्यामुळे नफा धरून त्या वस्तूची किंमत १५० रुपये जरी असली तरी कंपनी त्या वस्तूवर कमाल किरकोळ किंमत चारशे रुपये, पाचशे रुपये छापण्यास मोकळी आहे. नेमका हाच झोल ग्राहकांच्या खिशावर डल्ला टाकण्यासाठी पुरेसा आहे. नेमकी हीच बाब हेरून अनेक ई-कॉमर्स विदेशी कंपन्या भारतामध्ये लूट करीत असल्याचे दिसून येत आहे. अमुक एखाद्या वस्तूवर ५० टक्के सूट किंवा एका वस्तूवर एक विनामूल्य असे प्रलोभन देऊन ग्राहकांच्या खिशाला कात्री लावली जाते, हे ग्राहकाच्या लक्षातही येत नाही. चारशे रुपये कमाल किरकोळ किंमत असणारी ती वस्तू कंपनीने ५० टक्के सवलत देऊनही ग्राहकाला विकली तर दोनशे रुपये वसूल होतात. त्याआधी विना सवलत देऊन विकलेल्या वस्तूंवर कंपनीने किती नफा कमविला असेल, त्याबाबत कल्पना न केलेलीच बरी.

मुळात सर्व खर्च आणि नफा धरून त्या वस्तूची किंमत फक्त १५० रुपये होते. म्हणजे त्या विक्रेत्याने पन्नास टक्के सूट देऊनही ग्राहकाच्या खिशामधुन पन्नास रुपये अधिक उकळले तरीही तो गुन्हा ठरत नाही. कारण की, स्पष्ट असा कायदा नाही. उत्पादित केलेल्या मालावर किंवा वस्तूवर कमाल किरकोळ किंमत किती असावी, उत्पादन मूल्यावर आधारित किंमत असावी असा स्पष्ट कायदा जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत ग्राहक हा सतत भ्रामक संकल्पनेवर फसविला जाणार आहे. मुळात कोणताही व्यापारी असो वा कारखानदार स्वतःचा तोटा करून ती वस्तू कधीच विकणार नाही, हा साधा नैसर्गिक नियमही ग्राहकांच्या लक्षात येत नाही. या सर्व बाबीमागे कमाल किरकोळ किमतीची रचनाच फार मोठ्या प्रमाणामध्ये कारणीभूत आहे. एखाद्या वस्तूचा उत्पादन खर्च आणि त्यावर छापील किमतीचा काहीही संबंध नसतो. अनेकवेळा उत्पादन खर्चाच्या कितीतरी पटीने ती किंमत छापली जाते. आज शिकविले जाणारे अर्थशास्त्र आणि बाजारपेठेमध्ये अवलंबल्या जाणाऱ्या आर्थिक पद्धती ग्राहकांच्या हिताच्या नक्कीच नाहीत. या शास्त्रामध्ये ग्राहकांना केंद्रस्थानी ठेवल्याचे दिसून येत नाही. खरं तर ग्राहकाभिमुख कल्याणकारी अर्थव्यवस्था हवी असेल तर त्यामध्ये ग्राहकाला केंद्रस्थानी ठेवून आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. सरकारने कधीच ग्राहकाच्या हिताकडे लक्ष न दिल्याने ग्राहकांची लूट होत आली आहे. हे सर्व थांबवायचे असेल तर फक्त आणि फक्त उत्पादन मूल्यावर आधारित भाव हा एकमेव पर्याय उपलब्ध आहे. त्यासाठी आमच्या प्राचीन भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास केला तर हे सहज लक्षात येईल. त्यासाठी याज्ञवल्क्य स्मृती, ऋग्वेद, भास्कराचार्य, कौटिल्य अर्थशास्त्रामध्ये उत्पादित मालाचे मूल्य कसे निर्धारित करावे आणि त्यानंतर ग्राहकाभिमुख वस्तूची किंमत किती असावी याबाबत सविस्तर विवेचन केले आहे. त्यामुळे वस्तूवर निव्वळ कमाल किरकोळ किंमत छापणे ही ग्राहकांची शुद्ध फसवणूक असून, वस्तूवर उत्पादनमूल्यही छापल्यास भारताची अर्थव्यवस्था शोषणमुक्त आणि नक्कीच कल्याणकारी होऊ शकते. ग्राहक पंचायतनेही त्यासाठी कंबर कसली आहे. त्यासाठी जनतेनेही दबावगट निर्माण केला तर यश हमखास मिळू शकते.

९८८१७१७८५६

## विशेष

# उष्णतावाढ अकस्मात नाही

अरविंद कडबे



इंग्रजांनी आपल्या देशावर साधारणतः २०० वर्ष राज्य केले. या कालावधीत त्यांनी आपले शैक्षणिक धोरण, सामाजिक धोरण, राजकीय धोरण, शेती विषयक धोरण व पर्यावरणीय धोरणात अत्यंत जाणीवपूर्वक आपल्या देशाचा घात केलेला आहे व त्याचा परिणाम आज आपला देश भोगत आहे. कारण इंग्रजांनी जो विकास केला त्याच विकासाच्या पावलावर आपले राज्यकर्ते आपल्या देशाला विकसित करण्याच्या उद्देशाने कामाला लागलेले आहेत असे स्वातंत्र्यानंतर आपल्याला जाणवत आहे.

महात्मा गांधीजींच्या विचारांनी जर आपण समृद्ध खेडी हा शाश्वत विकासाचा मार्ग स्वीकारला असता तर आजची परिस्थिती कदाचित वेगळी असती. इंग्रजांनी पर्यावरणाच्या दृष्टीने काय केलं की त्या काळात आपल्या देशात लाकडी कोळसा हे इंधन म्हणून आपल्याकडे वापरले जायचे व त्यासाठी आपलं जैविक जंगल होतं ते कंत्राटदारांना द्यायला सुरुवात केली व त्या ठिकाणी कमर्शियल जंगलाची सुरुवात झाली. आपल्या देशातले जैविक जंगल (४५-५० टक्के) हळूहळू कमी होण्यास सुरुवात झाली. त्यांच्या धोरणानुसार आपल्याकडे असे म्हणता येईल की त्यांनी सागवानाची शेती जे कमर्शियल वूड म्हणून सर्वत्र मोठ्या प्रमाणात वापरले जात होते त्याचा उपयोग करण्यात आला.

स्वातंत्र्यानंतर १९७० मध्ये आपल्या राज्यकर्त्यांनी फॉरेस्ट डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया (एफडीसीएम) ची स्थापना करून त्या माध्यमातून इंग्रजांनी लागवड केलेल्या सागवानाची सर्वत्र लागवड केली व आपल्या देशातील जैवविविधता युक्त जंगले मोठ्या प्रमाणात समाप्त झाली. त्याचा दुष्परिणाम आज आपण मोठ्या प्रमाणात तापमान वाढीत दिवसेंदिवस अनुभवतो आहे. त्याचबरोबर आमच्या राज्यकर्त्यांनी शहरीकरण व त्यात मोठ्या प्रमाणात कॉंक्रिटीकरण करण्याचा घाट घातल्यामुळे तापमान वाढीत मदतच झाली. कॉंक्रिटीकरणाचे रस्ते करताना त्यात दुभाजकांमध्ये मोठी झाडे लावण्याऐवजी डेकोरेटिव्ह झाड लावण्याचा प्रकार अत्यंत त्रासदायक आहे.

त्याऐवजी त्यांनी इंग्रजांनी जसे रस्त्याच्या दुतर्फा मोठी झाडे लावली होती ती त्यांच्याकडून शिकण्याऐवजी लहान डेकोरेटिव्ह झाडे काय उपयोगाची? त्यामुळे सिमेंटचा रस्ता हा अधिक उष्णता शोषून घेतो रात्री उष्णता सोडण्याचे काम करतो व त्यामुळे गेल्या ५०-६० वर्षांत दिवस व रात्री यातील उष्णतेच्या प्रमाणाची दरी ही कमी झालेली आहे. पूर्वी जरी उष्णता होती व याच प्रकारचे तापमान होते तरी रात्री गाव, शहर थंड व्हायचे, आज असे नाही. याच्यात दिवसेंदिवस भर औद्योगीकरणाची झाली. तसेच एसीचा मोठ्या प्रमाणात वापर वाढला, विजेचा वापर वाढला व प्रदूषणात सातत्याने भर पडतच गेली व त्याचे परिणाम म्हणून मग अल निनोसारखे दुष्परिणाम होत आहे.

आज आपल्याकडे जैविक जंगल फक्त ८-९ टक्के आहे व लागवडीचे जंगल हे १२ ते १३ टक्के आहे. याविरुद्ध उष्णता वाढवणारे घटक, जसे मोठ्या प्रमाणात रासायनिक शेती, पेट्रोल व डिझेलच्या गाड्या वाढतच आहे. युद्धात मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी शस्त्रे ही पण उष्णता वाढवण्यास मदत करीत आहेत. या सर्वांचा दुष्परिणामच आपण अनुभवतो आहे. त्यासोबतच एकही नदी, नाला, ओढा, तलाव, जलाशय हे जैविक पाण्याने प्रवाहित नाही. त्यामुळे त्याचाही परिणाम होत आहे. प्रदूषणाची साखळी सातत्याने वाढत असताना त्याला सांभाळणारी जैविक साखळी मात्र कोलमडताना आपण अनुभवतो आहे व त्याचा परिणाम तापमानवाढीत होत आहे. आम्हाला याकरिता प्रयत्न करावे लागतील तरच भविष्य उज्ज्वल होईल, जीवन जगणं सुसह्य होईल.

७६५९०८४५५५
(ओलावा फाऊंडेशन)

## निष्क्रिय विरोधी पक्ष व निश्चयी पंतप्रधान



इराण-अमेरिका, इस्रायल युद्ध सुरू होऊन तीन महिने होऊन गेले आहेत. अजूनही युद्ध संपण्याची काहीच शक्यता दिसत नाही. या युद्धात शेकडो निरपराध लोक मारले गेले आहेत. लहान मुलांना सुद्धा निर्दयीपणे मारण्यास मागे पुढे पाहिले गेले नाही. तिन्ही देशांचे अतोनात नुकसान झाले आहे. पण सत्तेचा माज व स्वतःची असुरी इच्छा यापुढे कोणीच माघार घ्यायला तयार नाहीत. या युद्धामुळे आपल्या देशाचे सुद्धा नुकसान होत आहे. पण विरोधी पक्ष खासकरून मोदीविरोधी नेते जबाबदारीचे भान न ठेवता बेजबाबदारपणे वागत आहेत. त्यांच्या वागण्याचा त्यांना जरा सुद्धा पश्चात्ताप होत नाही. सर्वसामान्य जनतेला याची झळ कमीत कमी व्हावी म्हणून नरेंद्र मोदी दिवस रात्र मेहनत घेत आहेत. पण या नतद्रष्ट नेत्यांना त्याचे काहीच सोयरसुतक नाही. कोरोना काळात सुद्धा मोदींनी अपार कष्ट घेऊन लोकांचे जीव वाचवले होते. आजही ज्या ज्या देशांकडून मदतीची शक्यता आहे त्या त्या देशात ते स्वतः जाऊन आले आहेत. त्यांनी आपल्या कोणत्याच मंत्र्यांना या करता पाठविले नाही.

विचार करा राहुल गांधी जर मोदींच्या जागी असते तर भारतीय जनतेची काय अवस्था झाली असती. त्यात भरीस भर म्हणून डोनाल्ड ट्रम्पसारखा राष्ट्राध्यक्ष काहीही म्हणतो व करतो आहे. पण नरेंद्र मोदींच्या धैर्याचे जितके कौतुक करावे तेवढे कमीच आहे. आपण नशीबवान आहोत म्हणून आपल्याला असे दूरदृष्टी लाभलेले पंतप्रधान मिळाले आहेत. त्यांचे भारतावर व जनतेवर अपार प्रेम आहे. व राष्ट्र प्रथम हे त्यांचे ब्रीद आहे. त्यांना अशा कुजक्या विचारांनी बरबटलेल्या नेत्यांची पर्वा करायची काहीच गरज नाही. म्हणूनच त्यांच्यावर जनतेचा अढळ विश्वास असल्यामुळेच भाजप एकापाठोपाठ एक राज्य जिंकत आहेत. ९ जूनला मोदी सरकारला दोन वर्षे पूर्ण होत आहेत. सामान्य जनतेच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपप्रणीत रालोआ सरकारला खूप शुभेच्छा.

**राजेंद्र मनोहर वाडी**/९४२३६३२२३०

## वाचक पत्रे

### हिंदूंनो, जागे व्हा

दि. ८ जूनच्या अंकातील अग्रलेख 'तरच टळेल देवस्थानांवरील बालंट' वाचला. महाराष्ट्र सरकारने प्रस्तावित केलेला हिंदूंच्या भावना दुखावणारा; देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम आराखडा हिंदू संघटनांनी विरोध केल्यामुळे स्थगित केला आहे. रद्द केला नाही. म्हणजे पुढे चालून हिंदू संघटनांचा विरोध शमविण्याइतपत मसुद्यात फेरफार करून परत हे विधेयक मंजूर करवून हा हिंदूंना जाचक कायदा महाराष्ट्रात लागू करण्याचे सरकारचे धोरण असू शकते. इतर धर्मीयांची देवस्थाने वगळून फक्त हिंदूंच्या देवस्थानांपुरता असा कायदा करणे म्हणजे देवस्थानांच्या स्वायत्ततेवर घाला घालणारा तर असेलच शिवाय करोडो हिंदूंच्या भावना दुखावणारा निश्चितच होईल. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात हिंदूंच्या देवस्थानांपेक्षा इतर धर्मीयांच्या धार्मिक स्थळांची एकूण संख्या लाखातच मोजावी लागेल. मोठ्या संख्येत असणाऱ्या मशिदी, चर्च, जैन मंदिरे, शिखांचे गुरु मंदिरे, बौद्धधर्म प्रार्थना स्थळे यांच्याकडे असणाऱ्या आर्थिक मालमत्तेची व अधिक्रमित स्थावर जमिनीची मोजदाद करण्याचे व त्यांच्या अधिकारावर अंकुश आणणारा कायदा करण्याची सरकारला काही गरज वाटत नाही; फक्त हिंदूंचीच देवस्थाने असला कायदा करण्यासाठी लक्ष्य करणे; करोडो हिंदूंना अन्यायकारक तर आहेच शिवाय घटनेने धार्मिक बाबतीत सर्व धर्मीयांना दिलेल्या समान अधिकाराचे हनन करणारे आहे. आपल्या आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक सामाजिक घटनादत्त अधिकारासाठी सदैव जागे राहून अशा प्रकारचे आपल्या अधिकारांचे हनन करणारे कायदे लागू होणार नाहीत यावर डोळ्यात तेल घालून सतत जागृत राहणे आवश्यक आहे.

**ॲड. प्रकाश देशपांडे**/पुणे, ७०५८९७५३७६

### रेल्वे रुळांवर स्वच्छता आवश्यक



आजच्या धावत्या युगात फिरण्यासाठी सर्व सुविधा उपलब्ध आहेत. परंतु यामध्ये रेल्वेने फिरणारी मंडळी खूप जास्त आहेत. रेल्वेमध्ये अनेक ठिकाणी खाजगी कंत्राट दिलेले आहेत म्हणून त्यावर नियंत्रण आहे की नाही किंवा त्यावर काही संशोधन होते की नाही हे कळण्यास काहीही मार्ग नाही. काही काही गाड्यांमध्ये नंबरवर तक्रार केली असता प्रवाशांची असुविधा कमी होत नाही.

शिवाय एसीमध्ये जी पांघरण्याची सुविधा म्हणून पॅकेट दिलेले असते त्याचे कव्हर जमा करण्याची योग्य ती काळजी घेतली जात नाही म्हणून हे पॅकेट सर्वत्र खाली फेकून दिले जातात आणि स्वच्छता करणारी माणसे ते रेल्वेच्या डब्याबाहेर ढकलून देतात म्हणजे कचरा कायम रेल्वे रुळावर असतो. तसेच प्लास्टिकच्या पिशव्या, पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, फळ खाऊन टाकलेली साले, नाश्ता केलेले डबे सर्रास झाडण्यात येतात तेही सुद्धा बाहेर ढकलून फेकले जातात. त्याचे कुठेही व्यवस्थापन नाही. त्याची विल्हेवाट लावण्याची योग्य सोय केल्यास कचरामुक्त भारत होण्यास खूप मदत होईल. मला वाटते रेल्वेमधून पडत असलेला कचरा ही फार मोठी गंभीर समस्या आहे. त्यामुळे प्रदूषण वाढतेच. याची योग्य ती दखल घेतल्यास नक्की सुधारणा होऊ शकते.

**डॉ. अचला तांबोळी**/९८९०६१७५३९

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# घरफोडी करणारा पोलिसांच्या जाळ्यात; साडे पाच तोळे सोने हस्तगत

## पांगरी पोलिसांकडून दोन दिवसांत गुन्हा उघडकीस

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि. ८ जून -**

तालुक्यातील चिखर्डे येथे वृद्ध महिलेला विश्वासात घेऊन घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरुन नेणाऱ्या आरोपीला पांगरी पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत अटक केली आहे. त्याच्याकडून चोरीस गेलेल्या ८ तोळे सोन्याच्या दागिन्यांपैकी ५.५ तोळ्याचे दागिने हस्तगत केले आहेत.

चिखर्डे येथील शेतकरी राहुल उकीरडे (वय ४१) यांनी पांगरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. ४ जून रोजी उकीरडे कुटुंब शेतीच्या कामासाठी बाहेर गेले असताना त्यांच्या घरी आजी गंगुबाई या एकट्याच होत्या. दुपारी १-३० वाजण्याच्या सुमारास एक व्यक्ती घरात आला. त्याने स्वतःची ओळख नात्यातील व्यक्ती म्हणून करुन देत वृद्ध महिलेला पाणी मागितले. ती पाणी आणण्यासाठी घरात गेल्यानंतर आरोपीने



घरातील कपाटाची चावी मिळवली. त्यानंतर कपाट उघडून सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा ऐवज चोरुन नेला. संध्याकाळी कुटुंबीय घरी परतल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आला.

घटनेची माहिती मिळताच पांगरी पोलिसांनी तातडीने तपास सुरु केला. तांत्रिक माहिती, गुप्त बातमीदार आणि स्थानिक तपासाच्या आधारे संशयिताचा शोध घेतला. तपासादरम्यान पोहेकॉ.सचिन माने, पोकॉ. तानाजी लोकरे, पोकॉ.बळी बेंद्रे, पोकॉ. संगम लढले यांनी आरोपी बापू लक्ष्मण झोंबाडे (वय ४०, रा. चिखर्डे, ता. बार्शी) याला ताब्यात घेऊन चौकशी केली. चौकशीत चोरीची कबुली मिळाल्यानंतर त्याला अटक केली. पोलिसांनी आरोपीकडून चोरीस गेलेल्या म ालापैकी ३ तोळे ५ ग्रॅमची सोन्याची साखळी गंठण, १ तोळा ५ ग्रॅमचे सोन्याचे नेकलेस,५ ग्रॅमची सोन्याची बिंदली असा मुद्देमाल जप्त केला आहे. उर्वरित मालाचा शोध सुरु असून गुन्ह्यात वापरलेल्या मोटारसायकलीचाही तपास सुरु आहे.

पांगरी पोलीस ठाण्यात या प्रकरणी कलम ३०५(अ) व ३३२(क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता, १० जूनपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

# यशवंत शैक्षणिक समितीतर्फे धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा होणार सत्कार

## १५ जुलैपर्यंत नावनोंदणीचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.८ जून -**

यशवंत शैक्षणिक समि तीच्यावतीने धनगर समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन केले आहे. इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा म ान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

रविवार, दि. २ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता सोलापूरमधील हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात सोहळा होणार आहे. १० वी आणि १२ वी बोर्ड परीक्षेत ७५% किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळालेले धनगर समाजातील जिल्ह्यातील विद्यार्थी या सत्कारासाठी पात्र असतील. नाव नोंदणीसाठी गुणपत्रक आणि शाळा सोडल्याचा दाखला १५ जुलैपर्यंत शंकर कोळेकर - ९८८१६९३१९७, प्रा. उत्तम हुंडेकर - ९८५०६६९६६६, प्रा. नागनाथ धायगोडे - ९८६०१३६७४३, प्रा. शावरू जडगे - ९४२२४६०४१६, बाळकृष्ण वाघमोडे - ९९७०१७५७४० यांच्या व्हॉट्सअप क्रमांकावर द्यावा.


## कमला को-ऑप. बँक लिमिटेड, सोलापूर

**कमला को-ऑप. बँक लिमिटेड, सोलापूर.**

१४/३०, रविवार पेठ, गांधी नगर, अक्कलकोट रोड, सोलापूर ४१३००६.

**२७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस व सभासद प्रशिक्षण कार्यक्रम (फक्त सभासदांसाठी)**

कमला को-ऑप, बँक लि., सोलापूर या बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा व सभासद प्रशिक्षण कार्यक्रम गुरूवार दि. २५ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता बँकेच्या सभागृहात खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरणार आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही नम्र विनंती...

**सभेपुढील विषय**

१) मागील दिनांक १९/०६/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) सन २०२५-२६ सालाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३) मा. संचालक मंडळाचे शिफारसीनुसार सन २०२५-२६ च्या नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) सन २०२५-२६ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून माहिती घेणे व सन २०२४-२५ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची दोष दुरूस्ती माहितीसाठी.
५) सन २०२५-२६ च्या अंदाज पत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे तसेच मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२६-२७ चे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६) सन २०२६-२७ सालाकरीता वैधानिक लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मेहनताना ठरविणे.
७) सन २०२६-२७ सालाकरीता अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.
८) सन २०२६-२७ सालाकरीता बाहेरील कर्ज मर्यादा ठरविणे.
९) सदर वार्षिक सर्वसाधारण सभेस हजर नसलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस मान्यता देणे.
१०) मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने येणारे आयत्या वेळेचे विषयांवर विचार करणे.

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक - ०९/०६/२०२६**

**मा. संचालक मंडळाचे आदेशावरून**
**जे.जी. कल्याणशेट्टी**
**व्यवस्थापक**

*** विशेष सूचना ***

१) कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या अर्धातासानंतर घेतली जाईल. त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) बँकेचा सन २०२५-२६ सालाचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफातोटा पत्रक बँकेच्या नोटीस बोर्डावर लावलेला आहे. कृपया याची नोंद घ्यावी.
३) सन २०२५-२६ अखेरच्या ताळेबंद व नफातोटा पत्रकाची काही माहिती, स्पष्टीकरण विचारावयाचे असल्यास दि. २२/०६/२०२६ पर्यंत बँकेचे कार्यालयात, बँकेचे वेळेत व्यवस्थापकाकडे लेखी कळवावे. त्यानंतर आलेल्या प्रश्नांचा सदरह सभेत विचार केला जाणार नाही.
४) ज्या सभासदांनी अद्यापही शेअर्स सर्टिफिकेट नेले नाहीत व वारस नोंद केलेली नाही त्यांनी त्वरीत बँकेशी संपर्क साधावा.
५) केंद्र शासनाच्या सुचनेनुसार पर्यावरण संरक्षण म्हणून बँकेचा अहवाल, नोटीस वगैरे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून पाठविणेसाठी सर्व सभासदांनी आपला ई-मेल आयडी बँकेकडे कळवावा.
६) प्रतिवर्षी लाभांश त्वरीत मिळणेसाठी कृपया सभासदांनी आपले बचत खाते उघडून सहकार्य करावे.
७) ज्या सभासदांचा पत्ता बदल झाला असेल त्यांनी नवीन पत्ता, मोबाईल नंबर बँकेस त्वरीत लेखी कळवावे.
८) मा. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांच्या निर्देशानुसार प्रत्येक खातेदारांने दर दोन वर्षांनी KYC पुर्तता **(ओळखीचा पुरावा, पत्त्याचा पुरावा, स्वतःचा फोटो, आधार कार्ड, पॅन कार्ड व मोबाईल नंबर)** करणे आवश्यक आहे. अन्यथा दि. ३१/१२/२०२६ नंतर खात्यावर व्यवहार करता येणार नाहीत.
९) ज्या सभासदांनी किमान रू. १०००/- चे शेअर्स धारण केले नाही त्यांनी सदरची पुर्तता त्वरीत करावी अन्यथा नवीन पोटनियमानुसार त्यांचे सभासदत्त्व रद्द होईल.
१०) सभासदांनी सभेस येतेवेळी कृपया नोटीस प्रत सोबत आणावी.

www.kamalabank.com


## फॅबटेकमध्ये 'एचपीएलसी'च्या अनुप्रयोगांवर व्याख्यान

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. ८ जून-**

फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोला येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, संशोधनात्मक व व्यावसायिक ज्ञानवृद्धीसाठी औषधनिर्माण क्षेत्रातील एचपीएलसी कंपनीचे अनुप्रयोग या विषयावर व्याख्यान झाले.

प्रमुख वक्ते सीएमआर कॉलेज ऑफ फार्मसी, कांडलकोया, जि.मेदचल, तेलंगणा येथील प्रा.डॉ.बनोथू भद्रू यांनी औषधांची गुणवत्ता, सुरक्षितता आणि परिणामकारकता सुनिश्चित करण्यासाठी एचपीएलसीचा कशाप्रकारे वापर केला जातो याची माहिती दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्न विचारले. प्राचार्य डॉ. संजय बैस यांनी अशा तज्ज्ञ व्याख्यानांमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबरच उद्योग क्षेत्रातील अद्ययावत घडामोडींची माहिती मिळते आणि त्यांच्यामध्ये संशोधनाची आवड निर्माण होते, असे नमूद केले. कार्यक्रमासाठी डॉ.नाहीद शेख, डॉ.योगेश राऊत, सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून गोव्यातील श्री दत्त मंदिर जीर्णोध्दाराचे आज भुमीपूजन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. ८ जुन-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाचा विस्तार भक्ताभिमुख होत आहे. याचाच एक भाग म्हणून गोवा येथील नानोरा बिचोलिम गट नं.४८७/६ या जागेत नियोजित श्री दत्त मंदिर जीर्णो द्धाराचा भूमिपूजन कार्यक्रम मंगळवार दि.९ जुन रोजी सायंकाळी ५ वाजता होणार आहे.

गोवा येथे बहुसंख्येने श्री स्वामी समर्थांचे भक्त असून ते श्री स्वामी अन्नछत्र मंडळाशी जोडलेले आहेत. गोवा येथील



नानोरा बिचोलिम येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या जागेत श्री दत्त मंदिर होते. याचा जीर्णोद्धार व्हावा म्हणून तेथील स्वामीभक्तांची मागणी होती. ती श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून पूर्ण होत आहे.

हा कार्यक्रम गोव्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री रोहन खवटे, न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, म्हापसा गोवाचे माजी महापौर रोहन कवळेकर, मुंबईचे माजी नगरसेवक विजय तांडेल, उद्योगपती मनोज गंगावणे, कल्याण, तुकाराम म्हात्रे- नगरसेवक लक्ष्मण पालेकर- उद्योगपती यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे यांनी दिली आहे.

# पाणी टंचाई निवारणासाठी समन्वयाची गरज

## अध्यक्ष दीपक वैद्य; जिल्हा परिषदेत जलव्यवस्थापन समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून -**

संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर गावपातळीवरील अडचणी तातडीने सोडविण्यासाठी सर्व विभागीय अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याचे निर्दे श जिल्हा परिषद सोलापूरच्या जलव्यवस्थापन व स्वच्छता समितीच्या बैठकीत देण्यात आले. जिल्ह्यातील जलसंधारण, पाणीपुरवठा आणि भूजलस्थितीचा आढावा घेताना लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या विविध समस्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची गरज बैठकीत अधोरेखित करण्यात आली.



जिल्हा परिषद सोलापूर येथे सोमवारी झालेल्या या बैठकीस समितीचे अध्यक्ष दीपक वैद्य, जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार, प्रभारी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, जिल्हा जलसंधारण अधिकारी हरिश सपताळे, सहाय्यक जिल्हा जलसंधारण अधिकारी एन. एस. लाड यांच्यासह विविध विभागांचे खातेप्रमुख आणि समि ती सदस्य उपस्थित होते.

बैठकीत कृषी विभाग, म हाराष्ट्र जीवन प्राधिकरण, ग्राम ीण पाणीपुरवठा विभाग, मृद व जलसंधारण विभाग, भूजल सर्वे क्षण व विकास यंत्रणा, यांत्रिकी विभाग तसेच लघुपाटबंधारे विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला. कृषी विभागामार्फत शेततळे योजनांच्या प्रगतीची माहिती घेतली. तसेच भूजल सर्वेक्षण विभागाने तालुकानिहाय भूजल पातळीत झालेली वाढ-घट याबाबतचे सादरीकरण केले.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या शिरभावी व आंधळगाव पाणीपुरवठा योजनांच्या कामांचा आढावा घेतला. मृद व जलसंधारण विभागाकडून कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांची स्थिती, साठवण तलाव आणि सर्वेक्षणाबाबत माहिती सादर केली. यांत्रिकी विभागाला ग्रामीण भागातील हातपंप दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

जलस्रोतांचे प्रभावी व्यवस्थापन, पाणीपुरवठा योजनांची कार्यक्षमता आणि टंचाईग्रस्त भागांतील नागरिकांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने अधिक सजगपणे काम करण्याची आवश्यकता बैठकीत व्यक्त केली. बैठकीस समिती सदस्य रामप्पा चिवडशेट्टी, रश्मी हिप्परगी सदस्य, सिध्दराम शिवमुर्ती, गीतांजली साळुंखे, नंदकुमार काळे, शनमुखी कोरके, वंदना कांबळे उपस्थित होते.

## बार्शीत राजस्थानच्या व्यावसायिकाची दुचाकी चोरी

**बार्शी दि.८ जून-**

बार्शी शहरातील व्हळे शेलगाव चौक परिसरात भाड्याने राहणाऱ्या फिरत्या व्यावसायिकाची मोटारसायकल चोरट्याने चोरुन नेली. या प्रकरणी बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. सरदार विजयसिंग बंजारा (वय २८), मूळ रा. तीन टापरी, बंजारा वस्ती, ता. रामगंजमंडी, जि. कोटा (राजस्थान) हे बाज विक्रीचा व्यवसाय करतात. सध्या ते बार्शी शहरातील व्हळे शेलगाव चौक येथे प्रसाद पाटील यांच्या शेडमध्ये भाड्याने राहत होते. १ जून रोजी व्यवसाय ते सायंकाळी ७ वाजता राहत्या ठिकाणी परतले. त्यांनी त्यांची मोटारसायकल (क्रमांक आरजे-३३-एसजे ४३५६) शेडच्या बाजूला हँडल लॉक करुन उभी केली होती. २ जून रोजी सकाळी सुमारे ६ वाजता उठून बाहेर आल्यानंतर त्यांना मोटारसायकल जागेवर दिसून आली नाही. सहकाऱ्यांच्या मदतीने परिसरासह बार्शी शहर, आजूबाजूच्या भागात शोध घेवूनही ती सापडली नाही. अखेर त्यांनी पोलिसांत फिर्याद दिली. याप्रकरणी पोलिस तपास करत आहेत.


Classifieds

**विकणे आहे**

**विजापूर रोड, माशाळे नगर माता लक्ष्मी अपार्टमेंटमध्ये 2BHK फ्लॅट विकणे आहे. पार्किंग व पाण्याची मुबलक सुविधा आहे.**
**--- संपर्क ---**
**7498948451**
**9579030937**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम जनतेस विशेषतः शहर बार्शी तालुका बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दीतील व आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी बार्शी म्यु.पल हद्दीतील मिळकत याचा सि.स.नं. १४६५ मिळकतीमधील माझे मालकीचे क्षेत्रफळ २११.३० चौ.मी. व २२७७.८१४ चौ.फुट आहे. याचे प्रत्यक्ष जागेवरील मोजमाप पूर्व बाजू मी. ८.८६ १.६८, दक्षिण बाजू मी. ०.३० + १३.७२ + ७.१९, पश्चिम बाजू मी. ४.१९ + ०.३० + ५.९४ उत्तर बाजु मी. १४.६८ + ६.१० आहे. याची पाणी व वागणुक पूर्व बाजुचे रस्त्याने जाते व आहे. यासी चतुःसिमा पुर्वेस - सि.स.नं. १४६४ व बोळाचा रस्ता, दक्षिणेस - सि.स.नं. १४६९ व १४१८, पश्चिमेस - सि.स.नं. १४२० व १४१८, उत्तरेस - सि.स.नं. १४६१ व १४६२. तसेच यात जुन्या विटामातीचे पन्हाळी पत्र्याचे सात खोल्या, संडास, बाथरुमसह, येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक वर्णनाची जागा आतील सर्व तदंगभुत वस्तुसह व हक्कासह.

येणेप्रमाणे वरील वर्णन केलेली मिळकत ही समद अब्दुल गन्नी सौदागर, रा. बार्शी, ता. बार्शी यांची मालकीची व प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून सि.स.न १४६५ चे मालमत्तापत्रकी हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटूंबिक व कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकारास कायमखुष खरेदी देण्याचा ठराव केलेला आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत हि निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे पक्षकारास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे.

याही उपर सदर मिळतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साटेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, बँक कर्ज, सावकारकी, बोजा, गहाणखत, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्कअधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदपत्रानिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्त्यावर हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून आठ (०८) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहित धरून खरेदी देणार यांचे बरोबर ठरलेल्या अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. ०८/०६/२०२६

**अशिल- जहांगीर कासीम पठाण, तर्फे**
**सही/-**
**ॲड. रियाज अ. शेख**
**बी.ए., एलएल.बी.**
**जिल्हा सत्र न्यायालय आवार बार्शी,**
**बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ९०२८५६६८४४**
**खरेदी घेणार तर्फे ॲडव्होकेट**

## खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे चिखर्डे, ता. बार्शी परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि सोलापूर सब डि ता. बार्शी पैकी मौजे चिखर्डे येथील शेतजमिन गट नं. ६३९ क्षेत्र ०१ हे ७३ आर आकार ०४ रु. ८६ पैसे यांसी चतुःसिमा :- पुर्व - राजेंद्र उकिरडे यांची जमीन, दक्षिण - यावरलकर यांची जमीन, पश्चिम - विजय घोलप यांची जमीन, उत्तर- नारायण गोरे यांची जमीन.

येणेप्रमाणे चतुःसिमापूर्वक शेतजमीन आतील सर्व तदंगभूत वस्तु व वहिवाटीचे हक्कासह. येणेप्रमाणे वरील वर्णन केलेली मिळकत ही शिवाजी परशुराम गोर, रा. चिखर्डे, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे खरेदी मालकीची स्वसंपादीत असून प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीची असून ७/१२ हक्कपत्रकी त्यांचे नावे दाखल असून त्यांनी सदर मिळकत त्यांचे कौटुंबिक म्हणजेच दवाखान्याचे खर्चासाठी व कायदेशीर गरजेपोटी आमचे अशिलास विक्री देण्याचा ठराव करून इसारा दाखल रक्कम घेतलेली आहे. खरेदी देणार यांनी सदर मिळकत हि निर्वेध, निजोखमी असल्याची खात्री आमचे अशिलास दिलेली आहे. तसेच त्यांनी सदरची मिळकत हि निर्वेध निजोखमी खरेदी देण्याचे मान्य केलेले आहे. याही उपर सदर मिळतीबाबत कोणाचे कसलेही कायदेशीर अधिकार, हक्क, साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, कुळ वहिवाट, वहिवाटीचे अधिकार मालकी हक्क, वारसा, गहाणपट्टा, बटईपत्र, पोटगी, चोळीबांगडी अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही स्वरूपाचे कायदेशीर हक्कअधिकार असल्यास त्यांनी खालील नमूद पत्तयावर योग्य त्या कागदपत्रानिशी व पुराव्यासह खालील नमूद पत्त्यावर हे जाहिर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून आठ (०८) दिवसात लेखी हरकत कळवावी. अन्यथा वरील नमूद मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आलेस आमचे पक्षकार हे सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी असल्याचे प्रामाणिकपणे गृहित धरून खरेदीदेणार यांचे बरोबर ठरलेल्या अटी व शर्ती प्रमाणे खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही खरेदीपुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता. ०८/०६/२०२६

**सही/-**
**ॲड. सुधीर प्रभाकर होनमुटे**
**एम.बी.ए., एल एल.बी.**
**मो. ९८६०५६९७१८**
**पत्ता - जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी**
**ता. बार्शी**
**आमचे अशिलतर्फे ॲडव्होकेट**

## सावधानतेची जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे तडवळे (या), ता. बार्शी, जि. सोलापूर व परिसरातील लोकांस कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब. डी. व ता. बार्शी पैकी मौजे तडवळे (या), येथील शेतजमिन याचा गट नं. ४८५ पैकी क्षेत्र हे १-०६ आर आकार रु. २-४५ पैसे यांसी चतुःसिमा :- पुर्वेस - किरण आवारे व दिपक आवारे, दक्षिणेस - कुबेर आवारे, पश्चिमेस - वंदना पवार, उत्तरेस - सुखदेव पवार येणेप्रमाणे जमीन आतील तदंगभूत वस्तूसह. उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन कविता भरत नागटिळक, जयश्री किरण जाधव व आरुष किरण जाधव, अपाक जयश्री यांची वडिलार्जित मिळकत असून सदर मिळकत ही कविता भरत नागटिळक व जयश्री किरण जाधव यांनी त्यांच्या कायदेशीर गरजेचेपोटी विक्रीला काढल्याने व सदर वरील नमूद कविता व जयश्री यांनी आमचे अशील यांना सदर मिळकती विक्री घेण्याचे विनंती केल्याने आमचे अशिलाचे व वरील नमूद कविता व जयश्री यांच्यामध्ये वरील नमूद मिळकतीचे खरेदी व्यवहार रक्कम रुपये १५,००,०००/- ठरवून त्यापैकी इसारादाखल वेळोवेळी आमचे अशिलांनी ७,५०,०००/- (अक्षरी सात लाख पन्नास हजार रुपये) एवढी रक्कम वरील नमूद कविता व जयश्री यांना दिलेली आहे. सदरचा व्यवहार हा गावातील प्रतिष्ठीत अर्जुन शंकर पवार, दिपक शंकर पवार, नानासो भिमराव पवार यांच्यासमक्ष झालेला असून इसार घेतेवेळी वरील नमूद कविता व जयश्री यांनी दि. १६/०८/२०२४ आमचे अशिलास सदर मिळकतीचा कब्जा दिलेला होता तो आजतागायत आमच्या अशिलाचा मालकी हक्काने शांततामयरित्या आहे. सदर जमीनीतून आमचे अशिल हरजीनसी उत्पन्न घेत आहेत. खरेदीस काही तांत्रिक अडचण असल्याने कायदेशीर अडचण असल्याने जयश्रीचा मुलगा आरुष हा अज्ञान असल्याने अज्ञानाच्या जमीनी विक्रीस परवानगी मिळण्याकामी कोर्टातून अर्ज करुन परवानगी घेणे आवश्यक असल्याने एक वर्ष मुदतीत वरील कविता व जयश्री यांनी परवानगीची पुर्तता करुन आमचे अशिलास खरेदीखत लिहून नोंदवून देणे आवश्यक व कायदेशीर होते तसा ठराव आमचे अशिल व वरील कविता व जयश्री यांचेत झालेला होता, केवळ नातेसंबंधामुळे विश्वासखातर लेखी करार झालेला नाही. सदर शेतजमीनीचा कब्जा मिळाल्यानंतर आमचे अशिलाने सदर जमीनीची लेवल करुन गोदावरी नदीवरुन पाईपलाईनही केलेली आहे. त्यास आमचे अशिलाचे रककम रुपये ४,००,०००/- खर्च झालेले आहेत. जमनीची सुधारणा केल्यामुळे वरील नमूद कविता भरत नागटिळक व जयरी किरण जाधव यांना जमीनीचा अधिकचा मोह सुटलेला आहे. त्यामुळे आमचे अशिलास सदर जमीन देण्यास, खेरदीखत करुन देण्यास टाळाटाळ करत आहेत. तसेच खरेदीखतास नकार देत आहेत. सदर व्यवरहारापोटी इसारा दाखल वरील नमूद स्विकारुन आमचे अशिलास कायदेशीर कब्जा देवून वरील कविता व जयश्री या खरेदीखत करुन देण्यास नकार देत आहेत ते आमचे हक्क व अधिकार डावलून इतर कोणास खरेदी देण्याचे विचारात आहेत अशी चर्चा गावी आहे. सबब वरील नमूद मिळकतीसंदर्भाने आमचे अशिलासोबत कविता भरत नागटिळक व जयश्री किरण जाधव यांनी खरेदी व्यवहार ठरवून इसारदाखल वेळोवेळी रक्कम स्विकारलेली असून मालकी हक्कात कब्जा आमचे अशिलास दिलेला आहे. तरी सदर जमीन आमचे अशिलाचे असलेले हक्क व अधिकार बाधीत करण्याचे दूष्ट हेतुने व अधिकच्या मोहापाई वरील नमूद कविता भरत नागटिळक व जयश्री किरण जाधव हे कोणास जमीनीचे हक्क व अधिकार हस्तांतरित होतील असा व्यवहार अथवा दस्त करतील, सदर दस्ताने व व्यवहाराने आमच्या अशिलाव्यतिरिक्त दुसरे कोणास हक्क प्राप्त होणार नाहीत. सदरचे दस्त, व्यवहार आमचे अशिलास बंधनकारक राहणार नाहीत. सदर दस्ताने व व्यवहाराने त्यांना कुठलेही हक्क प्राप्त होणार नाहीत. आमचे अशिलाचा कब्जा हा सदर मिळकतीत मालकी हक्काने असून आमच्या अशिलाचे हक्क व अधिकार बाधीत होतील असे व्यवहार अथवा दस्त कविता भरत नागटिळक व जयश्री किरण जाधव यांच्याकडून करु नये. केल्यास ते आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. तारीख : ०६/०६/२०२६

**सही/-**
**श्री. एम.पी. धस.**
**श्री. डी.एम. धस**
**ॲडव्होकेटस्**
**रा. नाईकवाडी प्लॉट,**
**उपळाई रोड, बार्शी, जि. सोलापूर**
**मो.नं. ९८९०४७२०९६ / ८४५९२५१४५४**

**SRM E-Tender Notice**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000040135 E-Tender No.: SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 06/2026-27, Particulars:** Work of annual rate contract for the work of loading, transportation, unloading & stacking of all types of EHV Equipment / Material (as and when required) from various Major Stores / Store Centers /Site Stores of MSETCL to Substation sites and any other store centers to substation sites and vice versa under EHV O&M Circle, Solapur. **Estimated cost:** Rs. 25,00,000/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 25,000/- **Tender cost** in Rs. 500.00+ GST, **Sale period:** 30.05.2026 to 15.06.2026 **Last Date of Submission:** 15.06.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 16.06.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Superintending Engineer - 7798878000 For further details. **Subsequent call intimations (2nd/3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

**1) https://srmetender.mahatransco.in.**
**2) https://mahatransco.in**

**Note:** All eligible Supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Superintending Engineer,**
**EHV O&M Circle Solapur**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# SOLAPUR JANATA SAHAKARI BANK LTD., (Multi-state Scheduled Co-operative Bank)

## Balance Sheet as on 31st March 2026

### Capital and Liabilities

| SR NO. | Capital & Liabilities (भांडवल व देणे) | Schedule | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|---|
| 1 | Capital (भांडवल) | A | 727,457,100.00 | 721,231,600.00 |
| 2 | Reserve and Surplus (राखीव निधी व जादा निधी) | B | 2,147,630,750.47 | 1,977,025,672.09 |
| 3 | Deposits (ठेवी) | C | 18,962,131,321.85 | 19,041,458,753.49 |
| 4 | Unapplied Interest (As per contra) (न आकारलेली व्याज-दुबेरजी) | - | 629,707,592.94 | 2,848,889,990.68 |
| 5 | Interest Payable (देणे व्याज) | - | 19,289,130.00 | 22,571,219.00 |
| 6 | Other Liabilities (इतर देणी) | D | 237,843,439.25 | 284,276,715.99 |
| 7 | Profit & Loss Account (नफा-तोटा खाते) | E | 270,339,157.90 | 243,977,746.12 |
| 8 | Total (एकूण) | - | **22,994,398,492.41** | **25,139,431,697.37** |
| | Contingent Liabilities (संभाव्य देणी) | M | 896,268,259.11 | 933,709,309.08 |

### Property and Assets

| SR NO. | Property & Assets (जिंदगी व येणे) | Schedule | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|---|
| 1 | Cash and Balances with Reserve Bank of India (रोख शिल्लक व रिझर्व्ह बँकेमधील शिल्लक) | F | 1,258,115,126.08 | 1,522,215,989.71 |
| 2 | Balance with Other Banks (इतर बँकांतील ठेवी) | G | 1,859,089,381.74 | 3,102,435,196.96 |
| 3 | Investment (गुंतवणूक) | H | 7,372,260,050.00 | 6,113,995,200.00 |
| 4 | Advances (कर्जे) | I | 11,104,058,592.69 | 10,739,947,751.63 |
| 5 | Interest Receivable (येणे व्याज) | - | 200,932,715.00 | 192,635,652.00 |
| 6 | Unapplied Interest (As per contra) (न आकारलेले व्याज-दुबेरजी) | - | 629,707,592.94 | 2,848,889,990.68 |
| 7 | Premises (जागा व इमारत) | J | 871,842.00 | 3,469,610.00 |
| 8 | i) Dead Stock, Furniture, Fixture, Fittings, Library, Vehicles)/ (अ) डेड स्टॉक, फर्निचर, फिक्स्वर फिटिंग, वाहन आणि सॉफ्टवेअर | K | 51,348,427.37 | 56,331,106.69 |
| 9 | Other Assets (इतर येणी) | L | 126,924,164.51 | 164,111,923.62 |
| 10 | Non Banking Assets acquired in satisfaction of claims (दाव्यापोटी अधिग्रहीत केलेली बिगर बँकिंग मालमत्ता) | - | 271,950,600.00 | 271,950,600.00 |
| 11 | Deferred Tax Asset (प्रलंबित कर येणी) | - | 119,140,000.08 | 123,448,676.08 |
| | Total (एकूण) | | **22,994,398,492.41** | **25,139,431,697.37** |

sd/-
**DEPUTY GEN MANAGER**
उपसरव्यवस्थापक

sd/-
**CHIEF EXECUTIVE OFFICER**
मुख्य कार्यकारी अधिकारी

sd/-
**DIRECTOR**
संचालक

sd/-
**DIRECTOR**
संचालक

sd/-
**VICE CHAIRMAN**
उपाध्यक्ष

sd/-
**CHAIRMAN**
अध्यक्ष

Date: 27-May-2026
Place: Solapur

SOLAPUR JANATA SAH. BANK LTD. MULTI-STATE SCHEDULED CO-OP. BANK SOLAPUR

**STATUTORY AUDITORS**

**For Shashank Patki and Associates**
Chartered Accountants
FRN: 122054W

Shashank Patki And Associates FRN 122054W

**CA Amruta Khadilkar (Partner)**
Membership no: 607642
**UDIN: 26607642ASZUOP7670**

### Schedule- A Capital

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| A | Authorised Capital : (अधिकृत भागभांडवल) | 1000000000.00 | 1000000000.00 |
| | 20000000 Shares of 50/-each (Previous year 2,00,00,000 Shares of 50/- each) २,००,००,००० भाग प्रत्येकी रुपये ५०/- (मागील वर्षी २,००,००,००० भाग प्रत्येकी ५०/- प्रमाणे भागांची रक्कम | | |
| B | Subscribed & Paid up share Capital : (वसूल झालेले भाग भांडवल) | | |
| | 14549142 (P.Y. 14424632) Shares of Rs.50/- each प्रत्येकी रुपये ५०/- प्रमाणे एकूण १,४५,४९,१४२ (मागील वर्षी १,४४,२४,६३२ भागांची रक्कम पुर्णतः वसूल झालेली | 727,457,100.00 | 721,231,600.00 |
| | Out of Above | | |
| | Shares held by Individuals and Others | 717,949,600.00 | 706,834,100.00 |
| | Co-Operative institutions | 9,507,500.00 | 14,397,500.00 |
| | State Government | 0.00 | 0.00 |
| | **Total : (एकूण)** | **727,457,100.00** | **721,231,600.00** |

### Schedule- B Reserve & Surplus

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| 1 | Statutory Reserve / (विधीविहित गंगाजळी) | 777,573,802.75 | 655,505,035.97 |
| 2 | Revaluation Reserve / (पुनर्मुल्यांकन निधी) | 0.00 | 0.00 |
| 3 | Building Fund / (इमारत निधी) | 187,506,750.50 | 137,506,750.50 |
| 4 | General Reserve / (सर्वसाधारण निधी) | 35,513,176.00 | 33,959,088.00 |
| 5 | Charity Reserve / (धर्मार्थ निधी) | 0.00 | 1,052,588.00 |
| 6 | Shareholder Welfare Reserve / (भागधारक कल्याण निधी) | 21,097,187.34 | 20,010,137.34 |
| 7 | Employee Welfare Reserve / (सेवक कल्याण निधी) | 4,475,158.78 | 3,966,558.78 |
| 8 | Provision For Contingencies / (आकस्मित खर्चाची तरतूद) | 226,104,975.35 | 187,642,176.76 |
| 9 | Non Banking Asset Interest Reversal (NBA व्याज रिव्हर्सल) | 21,000,000.00 | 21,000,000.00 |
| 10 | Investment Fluctuation Reserve / (गुंतवणूक चढउतार निधी) | 128,489,724.19 | 108,489,724.19 |
| 11 | Bad & Doubtful Reserve / (संशयित बुडीत निवारण निधी) | 456,164,835.88 | 633,350,778.79 |
| 12 | Special Bad & Doubtful Reserve / (विशेष संशयित बुडीत निवारण निधी) | 3,964,500.00 | 2,192,000.00 |
| 13 | Provision for Investment / (गुंतवणुकीवरील तरतूद) | 200,787,750.00 | 28,311,333.51 |
| 14 | Bad & Doubtful Advances Reserve for ARC / (संशयित बुडीत कर्ज निधी) | 30,260,000.00 | 33,796,000.00 |
| 15 | Provision for Investment in shares of other co-op bank and society / (इतर सहकारी बँकेच्या व सहकारी संस्थातील शेअर्स व गुंतवणुकीवरील तरतूद) | 263,850.00 | 263,850.00 |
| 16 | Contingent Provision for Standard Assets / (उत्तम कर्जावरील संभाव्य तरतूद) | 50,000,000.00 | 44,500,000.00 |
| 17 | Election Fund (निवडणूक निधी) | 4,429,039.68 | 5,000,000.00 |
| 18 | Technology Upgrade Reserve (तंत्रज्ञान सुधारणा निधी) | 0.00 | 60,000,000.00 |
| 19 | General Welfare Fund (सामान्य कल्याण निधी) | 0.00 | 479,650.25 |
| | **Total : (एकूण)** | **2,147,630,750.47** | **1,977,025,672.09** |

### Schedule- C Deposits

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| | 1) Fixed Deposits (मुदत ठेव) | | |
| | i)Individuals (व्यक्तिशः) | 13,089,464,640.13 | 13,166,275,213.28 |
| | ii)Central Co-op. Banks (मध्यवर्ती सहकारी बँक) | 0.00 | 0.00 |
| | iii)Other Co-op. Societies (इतर सहकारी संस्था ) | 1,356,701,605.00 | 1,365,811,566.00 |
| | Total (1). . . | **14,446,166,245.13** | **14,532,086,779.28** |
| | 2) Savings Deposits (बचत ठेव) | | |
| | i)Individuals (व्यक्तीशः) | 3,194,913,111.06 | 3,103,760,567.05 |
| | ii)Central Co-op. Banks (मध्यवर्ती सहकारी बँक) | 0.00 | 0.00 |
| | iii)Other Co-op. Societies (इतर सहकारी संस्था) | 58,608,428.95 | 80,211,292.82 |
| | Total (2) . . . | **3,253,521,540.01** | **3,183,971,859.87** |
| | 3) Current Deposits (चालू ठेव) | | |
| | i)Individuals (व्यक्तीशः) | 955,055,924.48 | 1,003,711,212.83 |
| | ii)Central Co-op. Banks (मध्यवर्ती सहकारी बँका) | 0.00 | 0.00 |
| | iii)Other Co-op. Societies (इतर सहकारी संस्था) | 233,727,252.23 | 200,908,918.51 |
| | Total (3) . . . | **1,188,783,176.71** | **1,204,620,131.34** |
| | 4) Money at call & short notice (मागणी करताच आणि अल्पकालीन सुचनेने द्याव्या लागणाऱ्या ठेवी) | | |
| | 5) Matured Deposits (मुदत संपलेल्या ठेवी) | 0.00 | 0.00 |
| | i)Individuals (व्यक्तीशः) | 64,906,244.00 | 114,750,136.00 |
| | ii)Other Co-op. Societies (इतर सहकारी संस्था) | 8,754,116.00 | 6,029,847.00 |
| | | 73,660,360.00 | 120,779,983.00 |
| | **Total : (एकूण)** | **18,962,131,321.85** | **19,041,458,753.49** |

### Schedule - D Other Liability

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| I | Bills Payable (देय - पेस्लीप, बिल्स इ.) | 6,605,164.28 | 3,410,294.00 |
| II | Unclaimed Dividend (लाभांश देणी) | 11,860,788.00 | 10,715,031.00 |
| III | Suspense Account (अनामत खाती) | 49,388,773.17 | 51,778,862.54 |
| IV | Draft Payable (ड्राफ्ट देणे) | 32,440.00 | 1,694,494.00 |
| V | Sundry Payable (अन्य देणी) | 169,956,273.80 | 180,804,008.92 |
| VI | Provision for Income Tax (आयकर तरतूद) | 0.00 | 35,874,025.53 |
| | **Total : (एकूण)** | **237,843,439.25** | **284,276,715.99** |

### Schedule - E Profit & Loss

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| | Net Profit/Loss for the year (चालू वर्षातील निव्वळ नफा / तोटा) | 270,328,157.90 | 243,977,746.12 |
| | Add: Profit/Loss of last year (मागील वर्षाचा नफा/तोटा) | 11,000.00 | 0.00 |
| | Profit/Loss(-) brought forward (नफा / तोटा ताळेबंदास वर्ग) | 270,339,157.90 | 243,977,746.12 |

### Schedule - F Cash and Balances with Reserve Bank of India

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| 1 | A) Cash (रोख) | | |
| | I) Cash in hand | 114,385,922.00 | 112,805,600.00 |
| | II) Standing Deposit Facility A/c with RBI | 0.00 | 0.00 |
| | Total (A)... / एकूण (अ)... | 114,385,922.00 | 112,805,600.00 |
| 2 | B) Current Accounts with: (चालू खाती) | | |
| | I) Reserve Bank of India (रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया) | 1,143,729,204.08 | 1,409,410,389.71 |
| | Total (B). . ./ एकूण (ब)... | 1,143,729,204.08 | 1,409,410,389.71 |
| | **Total : (एकूण)** | **1,258,115,126.08** | **1,522,215,989.71** |

### Schedule G- Balances with Other Banks

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| 1 | A) Current Deposit Accounts (चालू ठेव खाती) | | |
| | I)State Bank of India and Associates Banks (स्टेट बँक ऑफ इंडिया आणि इतर सरकारी बँका) | 62,583,356.79 | 71,440,081.97 |
| | II)District Central Co-op. Banks (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका) | 46,510,625.42 | 41,895,480.15 |
| | III)State Co-operative Banks (राज्य सहकारी बँका) | 14,867.80 | 7,709.40 |
| | IV) Current Deposit with other Banks (अन्य बँकातील चालू ठेव खाती) | 87,929,437.73 | 90,907,334.44 |
| 2 | B) Fixed Deposits with Banks (मुदत ठेवी) | | |
| | i)District Central Co-op. Banks (जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका) | 20,000,000.00 | 20,000,000.00 |
| | ii) With other Banks / (अन्य बँकामधील ठेवी) | 1,642,051,094.00 | 2,878,184,591.00 |
| | **Total : (एकूण)** | **1,859,089,381.74** | **3,102,435,196.96** |

### Schedule- H Investments

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| 1 | In Central & State Government Securities at Book value (केंद्र व राज्य शासनाने उभारलेल्या कर्ज रोख्यातील गुंतवणूक पुस्तकी किंमतीनुसार ) | | |
| | SGL/ एस.जी.एल. Face Value / दर्शनी किंमत Rs.7150000000.00 (P.Y. / मागील वर्षी Rs.6000000000.00) Market Value / बाजारभावाने किंमत Rs. 6895084000 (P.Y. मागील वर्षी Rs.6153134650) {(Out of this, Securities of face value of Rs. 9500.00 lakhs(P.Y. 8500.00 Lakhs) earmarked for Statutory Reserve) (वरीलपैकी रु. ९५००.०० लाख (मागील वर्षी ८५००.०० लाख) दर्शनी किंमतीच्या रोख्यांची रक्कम गंगाजळीसाठी राखून ठेवली आहे) } Market value C.Y./ बाजारभावाने चालू वर्षातील किंमत -9720.91 लाख & Market Value P.Y./ बाजारभावाने मागील वर्षातील किंमत 7942.23 lakhs | 7,340,663,200.00 | 6,078,862,350.00 |
| 2 | In Shares | | |
| | i) Co-op.Institutions / सहकारी संस्था | 263,850.00 | 263,850.00 |
| | ii) Maharashtra State Co-Op Bank / राज्य सह. बँक | 73,000.00 | 73,000.00 |
| | iii) National Payment Corporation of India Shares | 0.00 | 0.00 |
| | iv) NUCFDC Shares | 1,000,000.00 | 1,000,000.00 |
| | Total (एकूण) | 1,336,850.00 | 1,336,850.00 |
| | | | |
| 3 | Other Investment (अन्य गुंतवणूक) | | |
| | i) ARC Security Receipt | 30,260,000.00 | 33,796,000.00 |
| | | | |
| | **Total : (एकूण)** | **30,260,000.00** | **33,796,000.00** |
| | | | |
| | Total Investment (एकूण गुंतवणूक) | 7,372,260,050.00 | 6,113,995,200.00 |

### Schedule I - Advances

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| A | "Short Term Loans, Cash Credit, Overdraft & Bills Discounted of which secured against / (अल्प मुदत कर्ज, कॅशक्रेडीट, ओव्हरड्राफ्ट व बिल्स डिस्काऊंटिग यापैकी) | | |
| i | "Govt. & other approved securities (सरकारी कर्जरोखे व तत्सम तारणावर) | - | - |
| ii | Other Tangible Securities (अन्य मुर्त तारणावर) | 5,710,728,075.06 | 5,636,184,692.74 |
| iii | On Personal Sureties (बिनातारणी जामीनकी) | 2,115,188.79 | 3,430,094.67 |
| | **Total (A)** | **5,712,843,263.85** | **5,639,614,787.41** |
| i | Due from individuals (व्यक्तीशः येणे असलेली) | 903,919,416.32 | 711,883,681.10 |
| ii | Overdue advances (मुदत संपुनही येणे असलेली) | 235,469,002.00 | 1,230,028,228.93 |
| iii | Considered Bad & Doubtful of Recovery (संशयित अथवा बुडीत) | 92,302,706.00 | 126,885,420.64 |
| | | | |
| B | Medium Term Loans of which secured against (मध्यम मुदतीची कर्जे) | | |
| i | Govt. & other approved securities (सरकारी कर्जरोखे व तत्सम तारणावर) | - | - |
| ii | Other Tangible Securities (अन्य मूर्त तारणावर) | 1,096,029,376.74 | 994,061,406.20 |
| iii | On Personal Sureties (विनातारणी जामीनकी) | 1,322,010,705.83 | 1,267,158,163.21 |
| | **Total (B)** | **2,418,040,082.57** | **2,261,219,569.41** |
| i | Due from individuals (व्यक्तीशः येणे असलेली) | 1,648,941,176.34 | 429,921,842.06 |
| ii | Overdue advances (मुदत संपुनही येणे असलेली) | 124,461,878.00 | 332,292,126.71 |
| iii | Considered Bad & Doubtful of Recovery (संशयित अथवा बुडीत) | 117,305,607.00 | 88,088,600.02 |
| | | | |
| | C) Long Term Loans of which secured against (दीर्घ मुदतीची कर्जे) | | |
| i | Govt. & other approved securities (सरकारी कर्जरोखे व तत्सम तारणावर) | - | - |
| ii | Other Tangible Securities (अन्य मुर्त तारणावर) | 2,913,024,242.82 | 2,762,789,582.68 |
| iii | On Personal Sureties (विनातारणी जामीनकी) | 60,151,003.45 | 76,323,812.13 |
| | **Total (C)** | **2,973,175,246.27** | **2,839,113,394.81** |
| i | Due from individuals (व्यक्तीशः येणे असलेली) | 1,566,027,699.66 | 1,231,998,895.06 |
| ii | Overdue advances (मुदत संपुनही येणे असलेली) | 158,763,397.00 | 574,506,358.20 |
| iii | Considered Bad & Doubtful of Recovery (संशयित अथवा बुडीत) | 162,852,844.00 | |
| | **Total : (एकूण)** | **11,104,058,592.69** | **10,739,947,751.63** |

### Schedule J - Premises

| SR NO. | Particulars (तपशील) | 31-03-26 (Current Year) | 31-03-25 (Previous Year) |
|---|---|---|---|
| I | Premises (जागा व इमारत) | | |
| | i) Cost (मूळ किंमत) | 39,393,243.84 | 46,772,544.84 |
| | Add : Additions | 280,227.00 | 0.00 |
| | Less : Deletions | 1,801,229.00 | 7,379,301.00 |
| | Total Cost...(i) | 37,872,241.84 | 39,393,243.84 |
| II | | | |
| | ii) Depreciation | | |
| | Less : Accumulated Depreciation | 35,923,633.84 | 33,867,121.84 |
| | Less : Depreciation on deleted items | | |
| | Accumulated Depreciation | | |
| | Add : Current Year Depreciation | 1,076,766.00 | 2,056,512.00 |
| | Total Depreciation (ii) | 37,000,399.84 | 35,923,633.84 |
| | Closing Balance (i-ii) | 871,842.00 | 3,469,610.00 |

पान ७ वर

## महत्वाचे...




### एन.बी.के. फॅन्समार्फत नंदमुरी बाळकृष्णा यांचा वाढदिवस साजरा

**सोलापूर, दि. ८ जून-**

शहर एन.बी.के.फॅन्स व तेलुगु भाषा अभिवृद्धी सार्वजनिक ग्रंथालयम यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदपूरम आमदार (आंध्रप्रदेश) नंदमुरी बाळकृष्णा यांचा ६६ वा वाढदिवस साजरा करण्यात आला. तसेच कवी प्रा. नरेंद्र गुंडेली यांची तेलुगु मराठी साहित्यिक संस्था, सोलापूर अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक तिप्पणा गणेरी यांनी केले. बालराज बोल्ली यांनी मनोगत व्यक्त करताना ५३ वर्षांपूर्वी एन.टी.रामाराव फॅन्स असोसिएशनची स्थापना व त्यानंतर सोलापूर शहर एन. बी. के. फॅन्सची स्थापना याविषयीची माहिती विशद केली. पद्मशाली शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड.श्रीनिवास क्यातम यांनी नंदमुरी बाळकृष्णा यांचे चित्रपटसृष्टी व राजकारणातील स्थान याविषयी मनोगत व्यक्त केले. नगरसेवक सत्यनारायण गुर्रम यांनी नंदमुरी बाळकृष्णा यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. समाजसेवक राहुल गंधुरे यांनी एन.बी.के फॅन्स सभासदांनी राबवलेला कार्यक्रम स्तुत्य असून फारच चांगला आहे, असे गौरवोद्गार काढले. पद्मशाली ज्ञाती संस्थेचे विश्वस्त रामचंद्र जन्नू यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून नंदमुरी बाळकृष्णा यांचा पहिला चित्रपटपासून ते आतापर्यंतचा प्रवास व राजकारणातील त्यांचा प्रवासाबद्दल यथार्थ वर्णन केले. कार्यक्रमानंतर अन्नदान करण्यात आले. कवी प्रा.नरेंद्र गुंडेली यांनी सूत्रसंचालन केले. दयानंद अल्लोळी यांनी आभार मानले. याप्रसंगी जनार्दन इंजामुरी, रवि चिठ्ठीपल्ली, श्रीनिवास लगशेट्टी, गिरीधर यन्नम, राजू इराबत्ती, राजू बिंगी, समय्या चिठ्ठीपल्ली, व्यंकटेश लगशेट्टी, सदानंद वंगा, सदानंद नुती, बाळू म्हेत्रे, अंबादास वासम, पुरुषोत्तम लगशेट्टी, नागराज मोने, शंकर द्यावरकोंडा, बाळकृष्ण आंबट, सोमनाथ वंगा, रमेश वंगा, श्रीनिवास गणेरी, अंबादास सायपूर, शंकर कस्तुरी, श्रीपाद चिंता, श्रीनिवास गोसकी, विजयालक्ष्मी गुडूर आदी उपस्थित होते.

### किरकोळ कारणावरुन जीवघेणा हल्ला

**दक्षिण सोलापूर दि. ८ जून-**

किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रुपांतर थेट जीवघेण्या हल्ल्यात झाल्याची धक्कादायक घटना मंद्रूप पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ठेंगे वस्ती, वांगी येथे घडली आहे. याप्रकरणी एका संशयिताविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत अरिफा महमद कोरबू (वय-३५) यांनी दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, फिर्यादी व राजेभाई फकीर यांना आरोपी महादेव ठेंगे याने त्यांच्यातील जुन्या वादाच्या पार्श्वभूमीवर रागाच्या भरात जीव घेण्याच्या उद्देशाने गंभीर हल्ला केला. घटनेची माहिती मिळताच पोनि शंकर पटवारी, पोउनि राज डांगे व डी.बी.पथकाने तपास करुन महादेव ठेंगे यास मोहोळ तालुक्यातील परमेश्वर पिंपरी येथून अटक करण्यात आली. पोलीस उप निरीक्षक राज डांगे हे पुढील तपास करीत आहेत.

# राजकीय कार्यकर्त्यांना महामंडळे, समित्यांवर जाण्याची ओढ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा एकदा महामंडळे, समितीवर जाण्याचा उत्साह वाढला आहे. या कार्यकर्त्यांना नेतेमंडळींनी सुध्दा शब्द दिला आहे. त्यामुळे विधानपरिषद निवडणुकीनंतर निवडीचा मुहूर्त लागण्याची शक्यता असल्याने कार्यकर्ते याची वाट पाहत आहेत.




कोणत्याही राजकीय पक्षाची ताकद ही कार्यकर्त्यांच्या सहभागावर अवलंबून असते. ज्या पक्षात कार्यकर्त्यांचा, नेतेमंडळींचा सन्मान होतो, पदे मिळतात, तो पक्ष कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जनतेत शेवटच्या घटकापर्यंत जातो. परंतु ज्या पक्षात कार्यकर्ते वाऱ्यावर सोडले जातात, तो पक्ष भविष्यात नावापुरता उरतो.

शिवसेनेचे दोन गट आणि राष्ट्रवादीचे दोन गट निर्माण झाले आहेत. त्यापैकी शिवसेनेचे शिंदे आणि राष्ट्रवादीचे अजित पवार गट सत्तेत आहेत. यामुळे कार्यकर्त्यांचीही विभागणी झाली आहे. सत्तेच्या लालसेने अनेकांनी शिंदे, पवार गटात जाणे पसंत केले. या दोन्ही गटांनी कार्यकर्त्यांना महामंडळे, समित्या देऊ, अशी आश्वासने दिली आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर आता विधान परिषदेच्या निवडणुका सुरू आहेत.

सत्तांतर केलेल्या नेतेमंडळी कार्यकर्त्यांची होरपळ सुरू झाली आहे. इकडे आड आणि तिकडे विहीर अशी त्यांची अवस्था झाली आहे. सध्या सत्तेवर सर्वात मोठा पक्ष भाजप असल्याने अर्थातच भाजपच्या वाटेला ६० टक्के आणि राष्ट्रवादी आणि शिवसेनेच्या वाटेला प्रत्येकी २० टक्केप्रमाणे विभागणी होईल, असे बोलले जात आहे. परंतु ही टक्केवारीच शिंदे-पवार गटांना मान्य नसल्याने या निवडी रखडल्याचे सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.

# एनसीएमसी स्मार्ट कार्ड शिबिराचा २५२ जणांनी घेतला लाभ



### महिला, मुली आणि जेष्ठ नागरिकांची झाली सोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

राज्य परिवहन महामंडळाकडून महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना देण्यात येणाऱ्या एनसीएमसी या ५० टक्के सवलतीच्या स्मार्ट कार्ड शिबिराचा लाभ २५२ जणांनी घेतला. प्रभाग क्रमांक ८ मधील भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या कार्यकर्त्या स्नेहा वनकुद्रे यांच्यातर्फे हे शिबिर घेण्यात आले.

सोलापूर महानगरपालिका शाळा क्रमांक तीन मध्ये घेण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी नगरसेवक अमर पुदाले, नगरसेविका गीता गवई, संयोजिका स्नेहा वनकुद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

वय वर्षे ११ ते ६५ वर्षांपर्यंतच्या मुली व महिलांना तसेच ६५ वर्षांवरील जेष्ठ नागरिक महिला व पुरुषांना महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून एसटी प्रवासाच्या तिकिटामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येते. याकरिता शासनाकडून एनसीएमसी कार्ड मिळते.

हे कार्ड ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिला, मुलींना त्यांच्या घराजवळच उपलब्ध व्हावे याकरिता या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २५२ जणांनी अर्ज भरून या शिबिराचा लाभ घेतला. लवकरच या सर्व २५२ जणांना एनसीएमसी कार्ड देण्यात येणार आहे.

भाजपाचे शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे यांनी प्रास्ताविक केले. वैशाली काळे यांनी सूत्रसंचालन तर संयोजिका स्नेहा वनकुद्रे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी वैभव पाटील, सुदर्शन वनकुद्रे, गुणधर पांढरे, शशिकला पांढरे, रुपा कुताटे, श्वेता वनकुद्रे, सुयश वनकुद्रे आदी उपस्थित होते.





# ‘बार कौन्सिल’वर ‘सोलापूर’चा झेंडा

**ज्येष्ठ विधीज्ज्ञ मिलिंद थोबडे यांचा सत्कार**

**ढोल-ताशांच्या गजरात स्वागत**

**शेकडो वकील बांधवांची उपस्थिती**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र ॲन्ड गोवा यांच्या अत्यंत प्रतिष्ठेच्या आणि चुरशीच्या निवडणुकीत ‘सोलापूर’चा झेंडा फडकला. सोलापुरातील ज्येष्ठ विधीज्ज्ञ मिलिंद थोबडे यांनी या निवडणुकीत दैदिप्यमान यश संपादन केले. याबद्दल सोलापूर बार असोसिएशनतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला. ढोल-ताशांचा गजरात केलेले स्वागत, शेकडो वकिलांची असलेली उपस्थिती यामुळे या सोहळ्याला रंगत आली होती.

निवडणुकीतील विजयानंतर ज्येष्ठ विधीज्ज्ञ मिलिंद थोबडे यांनी सोलापूर बार असोसिएशनला सदिच्छा भेट दिली. रंगभवन चौक येथे त्यांचे आगमन होताच वकील बांधवांनी जल्लोषात स्वागत केले. रंगभवन ते न्यायालय परिसरातील हॉलपर्यंत रॅली काढण्यात आली. बार असोसिएशनच्या सभागृहात झालेल्या मुख्य सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी असोसिएशनचे अध्यक्ष ॲड.बाबासाहेब जाधव हे होते.

ज्येष्ठ विधीज्ज्ञ मिलिंद थोबडे यांच्या रुपाने अभ्यासू, कर्तृत्ववान आणि खंबीर नेतृत्व लाभले आहे, असे गौरवोद्गार ॲड.बाबासाहेब जाधव यांनी काढले. यावेळी ॲड.एन.के. शिंदे, ॲड.धानय्या चिवरी, ॲड.एच.एम. अंकलगी, ॲड.बसवराज सलगर, ॲड.शरद पाटील, ॲड.एन.एम. भडंगे, ॲड.महेश सोलनकर, ॲड.बापूसाहेब देशमुख, ॲड.केशव इंगळे, ॲड.गणेश माशाळे, ॲड.अशोक जालादी, ॲड.मलसिध्द देशमुख, ॲड.मंगला जोशी-चिंचोलकर आदींनी मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना ज्येष्ठ विधीज्ज्ञ मिलिंद थोबडे म्हणाले, सोलापूर बार असोसिएशनने माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि दिलेली साथ ही माझ्यासाठी मोठी प्रेरणा आहे. हे यश माझे वैयक्तिक नसून संपूर्ण सोलापूर बारच्या एकजुटीचे प्रतीक आहे. वकिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी मी पूर्ण क्षमतेने कार्यरत राहीन. ॲड.बसवराज हिंगमिरे यांनी सूत्रसंचालन केले. ॲड.मीरा प्रसाद यांनी आभार मानले.

# अधिक मासानिमित्त औसा नाथ संस्थानतर्फे महाप्रसाद; ५१ ब्रह्मवृंद जोडप्यांना भोजन





**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.८ जून-**

अधिक जेष्ठ मासानिमित्त औसा नाथ संस्थानच्यावतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. सद्गुरु ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या धार्मिक कार्यक्रमास अक्कलकोट परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी वटवृक्ष देवस्थान समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांनी विशेष सहकार्य केले.

श्री स्वामी समर्थांना महानैवेद्य अर्पण करून धार्मिक विधी संपन्न करण्यात आले. यावेळी गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी अधिक मास, पुरुषोत्तम मास आणि धोंड्याचा महिना या तिन्हींचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व भाविकांना समजावून सांगितले. या पवित्र कालखंडात नामस्मरण, सत्संग, दानधर्म आणि ईश्वरभक्ती यांचे विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी आपल्या प्रवचनातून स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान ५१ ब्रह्मवृंद जोडप्यांसह ब्राह्मण भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्रीरंग महाराज औसेकर, प्रथमेश इंगळे, गोविंदराव माकणे, शाम कुलकर्णी, शंकर रकसाळे, दिलीप तोडकरी, परशुराम कंठे, सूरज पंढरीकर, अनिकेत जवंजाळ, गुरुनाथ पतंगे, विरनाथ पतंगे, प्रदीप पडगे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुरुषोत्तम निटूरकर (निटूर) आणि नरेंद्र जोशी (कार्लेकर) यांनी यावेळी संकल्प केला. याप्रसंगी प्रशांत गुरव, सोमकांत कुलकर्णी, गंगाधर कुंभार, प्रा.धनराज भुजबळ, जितेंद्र जाजू, गणेश दिवाणजी, रवी जोशी, बाबुराव कुलकर्णी, नागेश होटकर यांच्यासह अनेक भाविक उपस्थित होते.

# महापालिकेचा आयटी क्षेत्रातील तज्ज्ञांशी विनामूल्य तांत्रिक सहकार्याचा करार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

सोलापूर महानगरपालिकेच्या विविध डिजिटल प्रकल्पांची वेळेत व गुणवत्तापूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी, आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर वाढविण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. डिजिटल परिवर्तनासाठी व विविध तांत्रिक प्रकल्पांची वेळेत पूर्तता करण्यासाठी आयटी क्षेत्रातील तज्ज्ञांशी विनामूल्य तांत्रिक सहकार्याचा करार करण्यात आला.

महापौर विनायक कोंड्याल हे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते, आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे, उपायुक्त आशिष लोकरे, उपायुक्त सोनाली यादव, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, संगणक प्रोग्रामर नागनाथ पडमगोंडा, सहाय्यक प्रोग्रामर मतीन सय्यद यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

यावेळी ॲप्रेली कंपनीचे संचालक साकेत मोकाटे व प्रसाद कंदलगांवकर यांच्यासह गिरीश येलका, ओंकार व्हटकर, उमाकांत कुलकर्णी, निरज देवस्थळी, प्रथमेश दुधणीकर, रोहन देशमाने आणि अक्षय बाचुवार यांनी महानगरपालिकेच्या डिजिटल परिवर्तनासाठी सहकार्य करण्याची भूमिका स्पष्ट केली. ॲप रिलाय टेक्नॉलॉजी या कंपनीचे हा करार केला आहे. यानिमित्ताने महापालिकेचे ६ कोटींची बचत होणार असल्याचे सांगण्यात आले.

# अक्कलकोट तालुक्यातील ७६ ग्रामपंचायतींची आजपासून आरक्षण सोडत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.८ जून-**

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार अक्कलकोट तालुक्यातील एकूण ७६ ग्राम पंचायतीचा आरक्षण सोडत मंगळवार, दि.९ जून २०२६ पासून काढण्यात येणार आहे. शुक्रवार, दि.१२ जून २०२६ पर्यंत ही प्रक्रिया चालणार आहे. सोडतीचा कार्यक्रम ग्रामपंचायत कार्यालयाच्या ठिकाणी होणार आहे. आरक्षण सोडतीसाठी नेमून दिलेल्या ग्रामपंचायतीचे नांव, तेथील अधिकारी व कर्मचारी यांचे नाव व पदनाम व विशेष ग्रामसभा बोलावून आरक्षण सोडत काढावयाचा दिनांक व वेळही निश्चित करण्यात आले आहे, अशी माहिती तहसिलदार विनायक मगर यांनी दिली.

मंडळ अधिकारी अक्कलकोट जबेर नदाफ दि. ९ जून सकाळी १० वाजता मातनहळ्ळी व दुपारी २ वाजता नागनहळ्ळी, १० जून रोजी सकाळी १० वाजता उमरगे व दुपारी २ वाजता निमगांव, ११ जून रोजी सकाळी १० वाजता गळोरगी व दुपारी २ वाजता गौडगांव खु, १२ जून रोजी सकाळी १० वाजता बासलेगांव व दुपारी २ वाजता समर्थनगर अशी आहे.

मंडळ अधिकारी वागदरी भासगी आर एस ९ जून सकाळी १० वाजता वागदरी व दुपारी २ वाजता साफळे, १० जून सकाळी १० वाजता खैराट व दुपारी २ वाजता भुरीकवठे, ११ जूनसकाळी १० वाजता गोगांव व दुपारी २ वाजता बादोले बु, १२ जून सकाळी १० वाजता सांगवी बु / हिंगणी / कोळेकरवाडी व दुपारी २ वाजता सांगवी खु/ममदाबाद/कोळीबोट अशी आहे.

सहायक महसूल अधिकारी एस.एन.धर्मसाले, १० जून सकाळी १० वाजता शिरसी/ काळेगांव/बादोले खु., मंडळ अधिकारी वागदरी विठ्ठल मेकाले - ९ जून रोजी सकाळी १० वाजता चपळगांव/बावकरवाडी व दुपारी २ वाजता हन्नूर, १० जून सकाळी १० वाजता बऱ्हाणपूर व दुपारी २ वाजता हालहळ्ळी अ, ११ जून रोजी सकाळी १० वाजता डोंबरजवळगे/ अकतनाळ व दुपारी २ वाजता पितापूर, १२ जून रोजी सकाळी १० वाजता चपळगांववाडी.

मंडळ अधिकारी मैंदर्गी एस.आय.शेख ९ जून सकाळी १० वाजता तोरणी व दुपारी २ वाजता भोसगे, १० जून रोजी सकाळी १० वाजता बणजगोळ व दुपारी २ वाजता संगोगी आ, ११ जून रोजी सकाळी १० वाजता मिरजगी व दुपारी २ वाजता चिक्केहळ्ळी, १२ जून रोजी सकाळी १० वाजता सातनदुधनी व दुपारी २ वाजता कल्लापवाडी.

मंडळ अधिकारी दूधनी प्रदीप जाधव ९ जून रोजी सकाळी १० वाजता इब्राहिमपूर व दुपारी २ वाजता मुगळी, १० जून सकाळी १० वाजता बोरोटी खु. व दुपारी २ वाजता चिंचोळी मै, ११ जून रोजी सकाळी १० वाजता बबलाद व दुपारी २ वाजता सिन्नूर, १२ जून सकाळी १० वाजता बोरोटी बु व दुपारी २ वाजता नागोरे.

मंडळ अधिकारी जेऊर रमाकांत भासगी ९ जून रोजी सकाळी १० वाजता ब्यागेहळ्ळी व दुपारी दोडयाळ,१० जून सकाळी १० वाजता गौडगांव बु व दुपारी २ वाजता जेऊर, ११ जून सकाळी १० वाजता कर्जाळ.

मंडळ अधिकारी नागणसूर महादेव स्वामी ९ जून सकाळी १० वाजता तोळणूर व दुपारी २ वाजता हैद्रा, १० जून २ सकाळी १० वाजता मराठवाडी व दुपारी २ वाजता नागणसूर, ११ जून सकाळी १० वाजता गुरववाडी व दुपारी २ वाजता उडगी.

मंडळ अधिकारी तडवळ चारुदत्त काकडे ९ जून सकाळी १० वाजता तडवळ व दुपारी २ वाजता गुड्डेवाडी, १० जून सकाळी १० वाजता चिंचोळी नं व दुपारी २ वाजता आळगे, ११ जून सकाळी १० वाजता कोर्सेगांव व दुपारी २ वाजता कुमठे, १२ जून रोजी सकाळी १० वाजता मुंढेवाडी व दुपारी २ वाजता शेगांव.

मंडळ अधिकारी करजगी मल्लीनाथ सुतार ९ जून सकाळी १० वाजता सुलेरजवळगे व दुपारी २ वाजता कल्लहिप्परगे, १० जून सकाळी १० वाजता आंदेवाडी बु, व दुपारी २ वाजता आंदेवाडी खु, ११ जूनसकाळी १० वाजता देविकवठे व दुपारी २ वाजता हंद्राळ, १२ जून सकाळी १० वाजता हिळ्ळी.

मंडळ अधिकारी किणी रामकुमार कोळी - ९ जून सकाळी १० वाजता किणी व दुपारी २ वाजता काझीकणबस, १० जून सकाळी १० वाजता किणीवाडी व दुपारी २ वाजता कुरनूर, ११ जून सकाळी १० वाजता मोटयाळ व दुपारी २ वाजता सिंदखेड,१२ जून सकाळी १० वाजता किरनळ्ळी व दुपारी २ वाजता गांव चुंगी.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT



## महत्वाचे...

### आईच्या मृत्यूला मुलगा कारणीभूत; पित्याने दिली फिर्याद

**सोलापूर, दि.८ जून-**

दुचाकीवरुन पाडून आईच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याप्रकरणी एका दुचाकीस्वार मुलाविरुध्द फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. विशेष म्हणजे, त्या मुलाच्या पित्याने फिर्याद दिली आहे. सुयश उमाकांत कोरे (वय-२०, रा. बीबीदारफळ, ता. दक्षिण सोलापूर) असे गुन्हा दाखल मुलाचे नाव आहे. यातील मयत महिलेचा पती व त्या दुचाकीस्वार मुलाचे वडील उमाकांत कलप्पा कोरे (रा.बीबीदारफळ, ता.दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, पार्वती उमाकांत कोरे यांना मुलगा सुयश कोरे हा दि.४ जून २०२६ रोजी एम.एच.१३ ई.डब्ल्यू.३५१५ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन जात होता. एमआयटी कॉलेजसमोर आल्यावर त्याची दुचाकी दगडावर आदळली. यात दुचाकीच्या मागे बसलेल्या पार्वती कोरे ह्या खाली पडून गंभीर जखमी होऊन मृत्यू पावली, असे फिर्यादीत नमूद आहे. पोलिस हवालदार गायकवाड हे पुढील तपास करीत आहे.

### मी कोण आहे? असे म्हणत मारहाण

**सोलापूर, दि.८ जून-**

मला अरे तुरे बोलतो का? मी कोण आहे माहित नाही का? असे म्हणत शिवीगाळ करुन एका तरुणाला चारचाकीमधून बाहेर ओढत फायटर, काठी, लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना रविवार, दि.७ जून रोजी जुळे सोलापुरातील दावत चौक येथे घडली. याप्रकरणी चार अज्ञात जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. याबाबत ज्ञानेश्वर संजयकुमार व्हनसुरे (वय-२६, रा.राहुल नगर, हत्तुरे वस्ती, होटगी रोड, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे रविवार रोजी भावासोबत कारमधून घराकडे जात असताना जुळे सोलापूर येथील दावत चौकात पाठीमागून एक स्कुटी, कार पुढे येवून कार थांबण्याचा प्रयत्न केला. त्यावेळेस फिर्यादीने त्यांना काय झाले? असे विचारले असता त्यांनी आम्हाला वाटले आमचे ओळखीचे मित्र आहेत असे म्हणून पुढे जावून स्कुटी कारचे पुढे लावली. त्यानंतर मागून लाल, चॉकलेटी व पांढरे रंगाच्या तीन कार फिर्यादीच्या कार पुढे लावून कार जाण्याचा मार्ग बंद केला. त्यातील चार अज्ञात इसमांनी कारजवळ येवून 'मला अरे तुरे बोलतो का? मी कोण आहे माहित नाही का? असे म्हणून शिवीगाळ करून फिर्यादीला कारमधून बाहेर काढून फायटर, काठी व लाथाबुक्क्याने मारहाण केली, असे फिर्यादीत म्हटले आहे. फौजदार पवार हे पुढील तपास करीत आहेत.

### डोळ्यात चटणी टाकून मारहाण, सात जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.८ जून-**

मागील भांडणाचा राग मनात धरुन एका तरुणाला डोळ्यात चटणी टाकून रॉड, लाकूड व दगडाने मारून गंभीर जखमी केल्याप्रकरणी सात जणांविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. राजु मंजुळकर, जुबेर शेख, अविनाश ऊर्फ आकाश खराटे, महेश तलाठी व इतर ३ अनोळखी इसम अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत यासीन इक्बाल बागवान (रा.मद्दा झोपडपट्टी, अशोक चौक, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.६ जून रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास चिप्पा मार्केट ते पंतजली स्टोर येथून जात असताना वरील आरोपींनी मागील वेळी रस्त्यावर झालेल्या भांडणाचा राग मनात धरुन जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने डोळ्यात चटणी टाकून लोखंडी रॉड, लाकडी काठी व दगडाने मारहाण केली.

# बळीराजाला लागली खते, बि-बियाणे खरेदीची घाई

## सोमवारपासून 'मृगा'च्या पाऊसधारा सुरु

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

मृग नक्षत्राची (मृगशीर्ष) सुरुवात सोमवार, दि.८ जून रोजी झाली. पावसाळ्याच्या आगमनाची चाहूल देणारे हे नक्षत्र दरवर्षी जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सुरु होते. ज्योतिषशास्त्रानुसार या नक्षत्राचे दोन टप्पे आहेत. मृग नक्षत्र हे पावसाचे प्रमुख नक्षत्र मानले जाते. या नक्षत्रात पडणारा पहिला पाऊस मान्सूनच्या आगमनाचा मानला जातो.

वर्षभरात येणाऱ्या २७ नक्षत्रांपैकी ९ नक्षत्रं ही पावसाची असतात. पावसाच्या नक्षत्रांची सुरुवात ही जरी 'रोहिणी' नक्षत्रापासून होत असली, तरी पावसाच्या आगमनाचा खरा हर्षोल्हास हा मृग नक्षत्रापासूनच सर्वत्र साजरा केला जातो. मृगशीर्ष नक्षत्राशी सूर्य आला की भारतात पावसाळा सुरु होतो. शेतकरी या वेळेला 'मृग लागले' असे म्हणतात.

राज्यातील अनेक शहरातील मुख्य भागात कमाल तापमान ३५.८ अंश सेल्सिअस आणि उपनगरांमध्ये ३५.३ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. या कालावधीत विविध ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस आणि मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला असून येत्या काही दिवसांत हवामान अस्थिर राहण्याची शक्यता आहे.

रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा, यवतमाळ आदी जिल्ह्यात मेघगर्जनेसह पाऊस, विजांचा कडकडाट, सोसाट्याच्या वाऱ्यांचा अंदाज हवामान खात्याकडून वर्तविण्यात आला आहे.




### सूर्याचा आकाशातील भासमान म्हणजे क्रांतीवृत्त

सूर्याचा आकाशातील भासमान मार्ग म्हणजे क्रांतीवृत्त. याच पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या आकृत्यांना प्राचीन भारतीयांनी २७ नक्षत्रं म्हटलं आहे. या २७ नक्षत्रांपैकी मृग, आर्द्रा, पुनर्वसू, उत्तरा, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त ही पावसाची ९ नक्षत्रे आहेत.

### यंदा पाऊस लांबण्याची भीती, पेरणीची घाई करु नये

मृगाचा दमदार पाऊस होताच खरिपाच्या पेरणीला आरंभ होत असतो; मात्र यंदा पाऊस लांबण्याची भीती हवामान विभागाकडून व्यक्त होत असून, शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असे आवाहन जिल्हा कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्राकडे येणाऱ्या पाईपलाईनची दुरुस्ती; बुधवारी शटडाऊन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

सोलापूर शहर पाणी पुरवठ्याच्या अनुषंगाने हिप्परगा तलावापासून भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्राकडे येणाऱ्या पाईप लाईनची दुरुस्ती करणे, व्हॉल्व बसविणे, जोडणी करणे इत्यादि कामाकरिता बुधवार दि.१० जनू २०२६ रोजी सकाळपासून शटडाऊन घेण्यात येणार आहे.



भवानी पेठ जलशुध्दीकरण केंद्रावर अवलंबुन असलेल्या भवानी पेठ दयानंद टाकीवरुन, कस्तुरबा टाकीवरुन दहिटणे शेळगी, विडी घरकुल व हायलेव्हन वरुन होणारा पाणी पुरवठा बुधवार दि.१० जून २०२६ पासून एक वेळ, एक रोटेशन, एक दिवसानी पुढे जाणार आहे. तरी कृपया नागरिकांनी दैनंदिन पाण्याचा वापर काटकसरीने करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## मोबाईल पाहता पाहता छातीत दुखून एकाचा मृत्यू

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

घरामध्ये मोबाईल पाहता पाहता छातीत दुखून एका ४१ वर्षीय इसमाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सोमवार, दि.८ जून २०२६ रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास कुंभार गल्ली येथे घडली.

राम गणपत कोकणे (रा.कुंभार गल्ली, सोलापूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. सोमवारी दुपारी ते घरामध्ये मोबाईल बघत बसले होते. अचानक त्यांच्या छातीत दुखून ते बेशुध्द होऊन जागेवर कोसळले. त्यामुळे त्यांना पुतण्या प्रशांत कोकणे याने उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.





## निर्मिती विहारमधील २५ कडुलिंब वृक्षांची कत्तल टळली

### उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी केला हस्तक्षेप

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

सोलापूर महानगरपालिकेच्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे जुळे सोलापुरातील निर्मिती विहार परिसरातील महापालिकेच्या ओपन स्पेसमधील तब्बल २५ कडुलिंब वृक्षांची होणारी कत्तल टळली आहे.

निर्मिती विहार परिसरातील काही जागरूक नागरिकांना मनपाच्या मालकीच्या खुल्या जागेत संशयास्पद वृक्षतोड सुरू असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तातडीने याबाबत उपमहापौर देवकर यांना माहिती दिली.

माहिती मिळताच उपमहापौरांनी महानगरपालिका उद्यान विभाग व वृक्ष प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना त्वरित घटनास्थळी पाठविले. पथक घटनास्थळी पोहोचले असता एक वृक्ष आधीच तोडण्यात आलेला होता.

वृक्षतोडीसाठी वापरण्यात येणारे कोयते, झाडे तोडण्याची मशीन, पेट्रोल, रासायनिक पदार्थ (ॲसिड) तसेच अन्य साहित्य जप्त करण्यात आले. याबाबत दंडात्मक व कडक कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश उपमहापौर देवकर यांनी दिले.

### वृक्ष हे शहराचे फुफ्फुस आहेत

वृक्ष हे शहराचे फुफ्फुस आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी त्यांचे संरक्षण करणे; नागरिकाची जबाबदारी आहे. बेकायदेशीर वृक्षतोड करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असे उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी सांगितले.

## आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी करा अन्यथा धडक मोर्चा; सकल मातंग समाजाने दिला इशारा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

अनुसूचित जाती-जमाती आरक्षण उपवर्गीकरणाची अंमलबजावणी राज्य शासनाने तातडीने करावी, अन्यथा जुलै २०२६ मध्ये मुंबईतील आझाद मैदानावर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सकल मातंग समाजाच्या वतीने प्रमुख नेत्यांनी पत्रकार परिषदेत दिला.

सकल मातंग समाजाची राज्यस्तरीय निर्धार बैठक सोलापुरात आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी मंत्रीद्वय प्रा.लक्ष्मण ढोबळे, उत्तमप्रकाश खंदारे, दिलीप कांबळे, रमेश बागवे, आमदारद्वय सुनील कांबळे, अमित गोरखे, माजी आमदार सुधाकर भालेराव आदी उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालयाने अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्य सरकारांना दिला आहे. हरियाणा, पंजाब, तेलंगणा, आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांनी या दिशेने पावले उचलली असताना महाराष्ट्र सरकारकडून मात्र अद्याप ठोस निर्णय झालेला नाही.

राज्य सरकारने नियुक्त केलेल्या न्यायमूर्ती अनंत बदर आयोगाने १६ मार्च २०२६ रोजी अहवाल सादर केला असतानाही त्यावर कार्यवाही झाली नाही. अनुसूचित जातींमधील अनेक घटकांना गेल्या ७५ वर्षांत आरक्षणाचा अपेक्षित लाभ मिळाला नाही.

संविधानाचे कलम ३४१/१६ (४) मध्ये नमूद केल्याप्रमाणे गेल्या ७५ वर्षात झिरपण्याच्या सिध्दांताने अनुसूचित जाती आरक्षण महाराष्ट्रातल्या ५९ जातीपर्यंत पोहोचले नाही तर ते केवळ दोन ते तीन जातीमध्ये हे आरक्षण घुटमळून डंप झाले आहे, असेही सांगण्यात आले. बार्टी, आर्टी, अनुसूचित जाती आयोग महिला आयोग यांच्या संयुक्त चौकशी समितीच्या माध्यमातून ७५ वर्षांमध्ये अनुसूचित जातीच्या ५९ जाती पर्यंत किती जातीला लाभ पोहोचला याची जातनिहाय पदनिहाय यादीची श्वेतपत्रिका सरकारने काढावी.

बार्टीची स्थापना झाल्यापासून आजतागायत अनुसूचित जातीच्या किती जात घटकापर्यंत बार्टीच्या शिक्षण प्रशिक्षण स्वावलंबन व इतर अशा योजना ५९ जातींपैकी किती जातीपर्यंत पोहोचल्या त्या लाभार्थ्यांची जात निहाय यादीची श्वेतपत्रिका बार्टीने काढण्याची मागणीही करण्यात आली.

### ५७ जातींना न्याय मिळवून देण्यासाठी...

सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निकालाची अंमलबजावणी महाराष्ट्रात अद्याप झालेली नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करताना ५७ जातींना न्याय मिळवून देण्यासाठी उपवर्गीकरण आवश्यक आहे, असे यावेळी सांगण्यात आले

### ब्रिटीश सरकार, राजर्षी शाहू महाराज, स्वातंत्र्यानंतर...

सन १९१९ ला ब्रिटिश सरकारने अनुसूचित जाती जमातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी झिरपणाच्या सिध्दांताने पहिल्यांदा आरक्षण दिले. त्यानंतर राजर्षी शाहू महाराजांनी दिले. स्वातंत्र्यानंतर संविधानाने महाराष्ट्रातल्या ५९ जातींना १३ टक्के आरक्षण दिले, याकडे लक्ष वेधण्यात आले.

# आषाढी वारी : जर्मन हॅंगर, फूट मसाजर, मोबाईल टॉयलेटची सुविधा

### स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेला प्राधान्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

श्रीक्षेत्र पंढरपूरच्या आषाढी वारीच्या अनुषंगेने जर्मन हॅंगर, फूट मसाजर, मोबाईल टॉयलेटसह इतर सुविधा उपलब्ध करुन दिले जाईल. स्वच्छता व आरोग्य व्यवस्थेला विशेष प्राधान्य दिले जाणार आहे, असे सोलापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सांगितले.

वारी ही केवळ धार्मिक परंपरा नसून लाखो भाविकांच्या व्यवस्थापनाची मोठी जबाबदारी आहे. तालुका आणि पंचायत समिती स्तरावर आषाढी वारीची तयारी पूर्णत्वास केली जात आहे. विभागीय आयुक्त शितल तेली-उगले यांच्या पाहणी दरम्यान अधिकाऱ्यांना विविध सूचना देण्यात आले आहेत.

पंढरपूरकडे जाणाऱ्या पालखी मार्गांवरील तळांवर आणि प्रमुख मुक्काम स्थळी विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याचे नियोजन अंतिम टप्प्यात आले आहे. वारीदरम्यान वाढणारी गर्दी लक्षात घेऊन गर्दी नियंत्रण, स्वच्छता व्यवस्थापन आणि आरोग्य सेवा यावर विशेष भर देण्यात आला आहे.



वारकऱ्यांसाठी निवारा केंद्रांमध्ये जर्मन हॅंगर उभारले जाणार आहेत. दीर्घ पायी प्रवासामुळे होणारा शारीरिक थकवा कमी करण्यासाठी काही ठिकाणी फूट मसाजरची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. वैद्यकीय पथके, आवश्यक औषधसाठा आणि तातडीच्या उपचारांची यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर वारी मार्ग आणि तळ परिसर स्वच्छ ठेवण्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले असून मोबाईल टॉयलेटची संख्या वाढविण्यात आली आहे. पिण्याच्या स्वच्छ पाण्याच्या उपलब्धतेसाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले.

### पालकमंत्र्यांनी घेतली माहिती : जैन



जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि विविध विभागांमधील समन्वयातून ही तयारी करण्यात येत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी दृकश्राव्य माध्यमातून आषाढी वारीच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कामकाजाची माहिती घेतली, असे जि.प.चे मुख्यकार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सांगितले.




## 'नूमवि'च्या शिशु विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.८ जून-**

उन्हाळानिमित्त दोन महिन्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर येथील नूमवि अर्थात नूतन मराठी विद्यालयप्रणित शिशु शाळा सोमवार, दि.८ जून २०२६ पासून सुरु झाली. यंदाच्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी शिशु विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करुन त्यांचे स्वागत करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहत असल्याचे दिसून आले. शिशु शाळेत शिकवल्या जाणाऱ्या विषयांच्या पाट्या हातात घेऊन त्या विषयांचे महत्त्व मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी व्यक्त केले. याद्वारे विद्यार्थ्यांची शाळेबद्दलची आवड दिसून आली. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्यासह सर्व शिक्षिका व शिक्षकेतरवृंद यांनी विद्यार्थ्यांचे औक्षण केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक प्रमुख अलका ओक, मृणाल देशपांडे, स्नेहा गडकर, सारिका कुलकर्णी आदींनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# सोलापूर-गोवा, सोलापूर-हैदराबाद विमानसेवा ऑगस्टपर्यंत बंद

## नाईट लँडिंगची सोय नसल्याने फ्लाय ९१ कंपनीचा निर्णय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

पावसाळ्यात निर्माण होणारी कमी दृश्यमानता (लो व्हिजिबिलिटी) आणि सोलापूर विमानतळावर नाईट लँडिंगची सुविधा उपलब्ध नसल्याने सोलापूर-गोवा व सोलापूर-हैदराबाद विमानसेवा तीन महिने बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात फ्लाय ९१ कंपनीच्या वतीने घेण्यात आला आहे.

आज मृग नक्षत्र निघाले असून, चालू मान्सूनच्या पार्श्वभूमीवर सोलापूर विमानतळावरील विमानसेवांना मोठा फटका बसला आहे. फ्लाय ९१ कंपनीने सोलापूर-गोवा आणि सोलापूर-हैदराबाद या दोन्ही विमानसेवा तात्पुरत्या स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीकडून १९ जूनपासून या मार्गांवरील तिकीट विक्रीही बंद करण्यात आली असून, किमान दोन ते तीन महिने सेवा बंद राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार, पावसाळ्यात निर्माण होणारी कमी दृश्यमानता आणि सोलापूर विमानतळावर नाईट लँडिंगची सुविधा उपलब्ध नसल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. खराब हवामानामुळे विमानांच्या सुरक्षित उड्डाण आणि लँडिंगमध्ये अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून सेवा स्थगित करण्यात आली आहे. दरम्यान, विमानसेवा बंद राहणार असल्याने आगामी काही महिन्यांत सोलापूर आणि आसपासच्याजिल्ह्यांतील प्रवाशांना रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर अधिक अवलंबून राहावे लागणार आहे.




### अचानक सेवा बंद झाल्याने प्रवाशांमध्ये नाराजी

सोलापूर विमानतळावरून वर्षभरापूर्वी सुरू झालेल्या गोवा आणि हैदराबाद विमानसेवांना सोलापूरसह लातूर, धाराशिव, विजयपूर आणि कलबुर्गी परिसरातील प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत होता. व्यावसायिक, शासकीय अधिकारी, विद्यार्थी तसेच पर्यटनासाठी जाणाऱ्या प्रवाशांसाठी या सेवा अत्यंत उपयुक्त ठरत होते. त्यामुळे अचानक सेवा बंद झाल्याने अनेक प्रवाशांना पर्यायी प्रवास व्यवस्थेचा विचार करावा लागणार आहे.

### मान्सूनमुळे संचालनात अडचणी

सोलापूर विमानतळावर अद्याप अत्याधुनिक नाईट लँडिंग प्रणाली उपलब्ध नसल्याने खराब हवामानात विमान संचालनावर मर्यादा येतात. पावसाळ्यात ढगाळ वातावरण, दृश्यमानतेत घट आणि बदलते हवामान यामुळे विमान कंपन्यांना उड्डाणांचे वेळापत्रक कायम ठेवणे कठीण होते. याच कारणामुळे फ्लाय ९१ ने तात्पुरत्या स्वरूपात दोन्ही मार्गांवरील सेवा स्थगित करण्याचा निर्णय घेतल्याचे समजते.

### विमानसेवा ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यापासून पूर्ववत

फ्लाय ९१ कंपनीच्या माहितीनुसार, हवामानाची परिस्थिती अनुकूल राहिल्यास आणि संचालनासाठी आवश्यक अटी पूर्ण झाल्यास दुपारच्या वेळेत मर्यादित स्वरूपात विमानसेवा पुन्हा सुरू करण्याचा विचार केला जाऊ शकतो. मात्र, परिस्थितीमध्ये अपेक्षित सुधारणा न झाल्यास नियमित विमानसेवा ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यापासून पूर्ववत होण्याची शक्यता आहे.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १४६६

**पाउला पाउला उदकें। वर्षाकाळींही परिचोखें।।**
**निर्झरि कां विशेखें। सुलभे जेथ।।**

भगवान श्रीकृष्णांनी अर्जुनाला उपदेश करण्याच्या हेतुने कर्मयोग, कर्मयोगी, ज्ञानसंन्यासयोग, सांख्ययोग, स्थितप्रज्ञ असे बरेच विषय स्पष्ट करुन सांगीतले आहेत. तरी पण अर्जुनाची जिज्ञासा वाढतच गेल्याने श्रीकृष्ण परमात्मा त्याच्या प्रश्नाप्रमाणे वेगवेगळया विषयावर स्पष्टीकरण देत आहेत. आता अर्जुनाने विचारले आहे की, योगाभ्यास करण्यासाठी नेमके स्थान कसे असावे. अशा योग्यश्रेष्ठ पुरुषाची , योगाभ्यासकाची लक्षणे अर्जुनाने यापुर्वीच जाणून घेतली आहेत. असा योगाभ्यासु नेमके कोणत्या स्थळी व कसा बसतो किंवा कसा योगाभ्यास करतो हे अर्जुनाची जाणून घेण्याची इच्छा.आहे. अर्जुनाप्रमाणे आपणालाही हे स्थळ कसे असावे हे जाणून घ्यावे वाटत असेलच. अर्जुनाच्या विनंतीप्रमाणे श्रीकृष्ण परमात्मा योगाभ्यासाचा राजमार्ग व स्थळ कसे असावे हे सांगत आहेत. योगीजन अज्ञानाच्या अन्य आडवाटा टाकून आत्मज्ञानाच्या मार्गाने सरळ जातात. मनाची निश्चलता हीच या मार्गाची वाटचाल असते. खरे म्हणजे हा विषय केवळ ऐकण्याचा किंवा वाचण्याचा नाही तर तो अनुभव घेण्याचा आहे, हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. योगाभ्यासासाठी असे स्थान निवडावे की तेथून हालूच नये असे वाटावे आणि त्या स्थानाच्या वातावरणाने आपले वैराग्य दुप्पट वाढावे. या स्थानी संतांनी वास्तव्य केले असेल तर फारच छान. कारण अशा स्थानी संतोषाची पुष्टी होते व मनाला धैर्याचा उल्हास प्राप्त होतो.योगाभ्यासाच्या स्थानाची रमणीयता हदयाला आत्मानंदाचा अनुभव प्राप्त करुन देते. अशा स्थानावरुन नास्तिक जरी जात असेल तरी त्यालाही तेथे तप करावे असे वाटू लागते. भटकणा-या मनाला स्थिर करण्याची, वैराग्याला थापटी मारुन जागे करण्याची ताकद या स्थानात असते. विषयसुखभोगी विलासी पुरुषालाही असे स्थान मोहित करते आणि त्याला आपले सर्वस्व टाकून येथेच निवांत पडून राहावे वाटते. अशा स्थानी साधकांची वस्ती असावी. सामान्य लोकांचे येणे जाणे येथे नसावे. हे स्थान कसे असावे हे सांगतांना भगवंत म्हणाले, त्या ठिकाणी मुळासकट अमृताप्रमाणे गोड असणारी सदा सर्वकाळ बहरणारी दाट झाडे असावीत. तसेच त्या स्थळी वर्षाकाळाशिवाय इतर ऋतुतही पावला पावलावर पाणी असावे, विशेषत: तेथे शुध्द पाण्याचे झरे सजहपणे प्राप्त होतील असे सुलभ असावेत.



माऊलींनी योगाभ्यासासाठी स्थान कसे असावे, हे सांगतांना वृक्षाचे, पाण्याचे महत्व दाखवून दिले आहे. आज पिण्यासाठी पाणी मिळणे, सावलीसाठी वृक्ष मिळणे कठीण झाले आहे, तर शांतता, तपासाठी अशी जागा मिळेल का ? एवढी वाईट परिस्थिती निर्माण करण्यास आपणच कारणीभुत आहेत. आपण पाणी मोठया प्रमाणावर वाहून जाऊ देतो, मोठया प्रमाणावर वृक्ष तोड करतो. आपण पाणी अडवत, जिरवत नाही, वृक्ष लागवड व वृक्ष संगोपण करीत नाही. हे सर्व सत्य असतांनाही मनाच्या शांतीसाठी योग्य स्थळाची अपेक्षाही आपण करतो. मनाच्या शांतीचा आणि वृक्ष, पाण्याचा किती जवळचा संबंध आहे, हे माऊलींनी सांगीतले आहे. आपणालाही हे निश्चितच पटत असेल. म्हणूनच आपण आनंदासाठी, मन:शांतीसाठी बागेत जातो, जिथे दाट झाडी, हिरवळ, पाणी असेल त्या ठिकाणी बसत असतो. आपण आपल्या मन:शांतीसाठी तरी पाणी अडवू जिरवू या, तसेच वृक्ष लागवड करु या.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## ‘डब्ल्यूआयटी’च्या पेटंटमुळे स्मार्ट कृषीच्या विकासाला नवी गती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

कृषी क्षेत्रातील डिजिटल परिवर्तनाला चालना देणाऱ्या महत्त्वपूर्ण संशोधनाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली आहे. वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या कम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील विद्यार्थी अनीश कोटी, अर्नव पाटील आणि आदित्य निशार यांनी विकसित केलेल्या ‘डिझाइन सिस्टीम ऑफ आयओटी ड्रिव्हन बेस्ड क्रॉप रेकमेंडेशन सिस्टीम यूजिंग मशीन लर्निंग फॉर स्मार्ट ॲग्रिकल्चर‘ या संशोधनाचा भारतीय पेटंट नुकताच प्रकाशित झाला आहे.




ही प्रणाली इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी) आणि मशीन लर्निंग या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांना योग्य पीक निवडीसाठी वैज्ञानिक मार्गदर्शन करते. शेतात बसविण्यात आलेले सेन्सर्स जमिनीतील आर्द्रता, तापमान, हवेतील आर्द्रता आणि इतर कृषी घटकांचा डेटा संकलित करतात.

या माहितीचे मशीन लर्निंग अल्गोरिदमद्वारे विश्लेषण करून त्या भागासाठी सर्वाधिक उपयुक्त आणि उत्पादनक्षम पिकाची शिफारस केली जाते.

या तंत्रज्ञानामुळे शेतकऱ्यांना अनुभवाधारित अंदाजांऐवजी वैज्ञानिक माहितीच्या आधारे निर्णय घेता येणार असून उत्पादनवाढ, खर्चात बचत, पाणी व खतांचा कार्यक्षम वापर आणि पर्यावरणपूरक शेतीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर शाश्वत शेतीसाठी हे संशोधन विशेष महत्त्वाचे मानले जात आहे.

या यशाबद्दल वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त भूषण शहा, वैभव गांधी, पराग शहा, प्र. प्राचार्य डॉ. सचिन गेंगजे, संशोधन व विकास अधिष्ठाता डॉ. श्रीशैलप्पा पाटील, विभागप्रमुख डॉ. अनिता पूजार यांनी अभिनंदन केले आहे.



## साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे यांचा महापौरांकडून सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

लोकशाहीर साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा व विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणारे त्यांचे नातू सचिन साठे यांचा सोलापूर महानगरपालिकेतर्फे महापौर विनायक कोंडयाल यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी महापौर विनायक कोंडयाल यांनी लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, सामाजिक कार्य व जनजागृतीमधील योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख केला. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांनी आपल्या लेखनातून आणि शाहिरीतून समाजातील वंचित, शोषित घटकांना आवाज दिला. त्यांच्या विचारांची प्रेरणा आजही समाजाला दिशा देणारी असून त्यांच्या कार्याचा वारसा जपणाऱ्या सचिन साठे यांचा सत्कार करणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले.

याप्रसंगी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे सोलापूर शहर कार्याध्यक्ष मनोज लोंढे, सामाजिक कार्यकर्ते विनोद वाघमारे, मातंग एकता आंदोलन संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष महेश लोंढे, गणेश वाघमारे, अभिषेक पाटोळे, पृथ्वीराज लोंढे, अमित भद्रे, रविंद्र कांबळे तसेच अक्कलकोट तालुका पंचायत समितीचे सदस्य उत्तम वाघमारे उपस्थित होते.

## फळातील व फळभाज्यांमधील बियांचे दान करण्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

उन्हाचा त्रास दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. हे ओळखून सोलापूरातील श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन, पद्मशाली सखी संघम, वि. दा. सावरकर चॅरिटेबल प्रतिष्ठान आणि पद्मकमळ परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून सोलापूरकरांकडून खाल्लेल्या फळांतील बियां व फळभाज्यांमधील बियांचे दान करण्याचे आवाहन स्थानिक वृत्तपत्रांतून व सोशल मिडियाच्या माध्यमातून केले होते, त्यानुसार अनेकांनी उत्स्फूर्तपणे आणून दिले.




पूर्व भागातील श्रीराम मंदिर देवस्थान येथे अंब्याचे कोय, जांभळ्यांचे बिया, कोरफड, फणस, एरंडी, चिंच, गोकर्ण, पारिजातक, आलूबुखार, खजूर आदी बिया आणून दिले आहेत. आणून देणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने महिलांचा अधिक सहभाग होता.

यावेळी वि. दा. सावरकर चॅरिटेबल प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. राजेंद्रप्रसाद गाजूल, फाउंडेशनचे किशोर व्यंकटगिरी, बालाजी कुंटला, वैकुंठमब जडल, ओमसी पल्ली, मल्लेशम जोगू, पद्मशाली सखी संघमच्या पल्लवी संगा, हेमा मैलारी, वनिता सुरम, पद्मा मेडपल्ली उपस्थित होते.

### बिया कच-यात टाकण्यापेक्षा मातीत घालाव्यात

रेल्वे, बस, कार मधून प्रवास करताना किंवा घरात असताना जेव्हांही विविध प्रकारांच्या फळे खाताना त्यातील बिया काढून कच-यात टाकण्यापेक्षा माती असलेल्या ठिकाणी घालावेत. याचबरोबर प्रत्येकाने एका रोपाचे संगोपन केलेच पाहिजे. कारण, सध्याच्या परिस्थितीवर हा एकच उपाय आहे. लहान मुलाचे जसे संगोपन करतो, अगदी त्याप्रमाणेच. रोपांना अन्नाची गरज भासत नाही. फक्त एक वाटीभर पाणी. मुलं जसे मोठे होताना पाणी पितो, त्याप्रमाणे पाणी घालावे लागेल एवढेच, असे आवाहन फाउंडेशनचे संस्थापक गौरीशंकर कोंडा यांनी केले आहे.



## विजयकुमार जगताप यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**अक्कलकोट, दि. ८ जून-**

विजयकुमार सोन्याबापू जगताप दक्षिण सोलापुर तालुका हे जिल्हा परिषद जलसंधारण विभागात प्रदिर्घ ३९ वर्ष दहा महिने सेवेनंतर नुकतेच सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीबद्दल श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते विजयकुमार जगताप व पत्नी निशा जगताप याचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद सोलापुरचे जिल्हा जलसंधारण अधिकारी सपताळे व उपविभागीय जलसंधारण अधिकारी ऐ.जे. मुजावर दक्षिण सोलापूर व उपविभागीय जलसंधारण अधिकारी जमादार व जलसंधारण अधिकारी संग्राम घवाणे, मयुरेश भोसले, निरंजन माने, मोरे, मोहन बंदिछोडे उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : मंगळवार,**
**दि. ९ जून २०२६**
**विक्रम संवत् २०८३ ।**
**शके -१९४८**
**संवत्सर - पराभव**
**मास - अधिक, कृ. नवमी**
**ऋतु - ग्रीष्म ।**
**नक्षत्र- पू. भाद्रपदा (०९.३८)**
**योग - प्रीति (०८.१७)**
**करण - तौतिल (१५.०४)**
**राहू काल : मंगळवार**
**सायं. ३.०० ते ०४.३०**

**दिनविशेष : १६६५: छत्रपती शिवाजी महाराज आणि मिर्झाराजे जयसिंग यांच्यात 'पुरंदरचा तह' झाला.**
**१९६४: लाल बहादूर शास्त्री यांनी भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतली.**
**१९९७: रशियन बनावटीची सुखोई-३० के (S>ukhoi-30 K) ही लढाऊ विमाने भारतीय हवाई दलात दाखल झाल२००१: टेनिसपटू लिअँडर पेस आणि महेश भूपती यांनी फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेचे पुरुष दुहेरीचे विजेतेपद मिळवले.**

## डिझाईन अभ्यासक्रमात सोलापुरचा डंका

### टॉप ४१०० रँकमध्ये १५ विद्यार्थ्यांची बाजी!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

देशातील अग्रगण्य डिझाइन कोचिंग संस्था (भंवर राठोड डिझाइन स्टुडिओ) सोलापूर केंद्राने राष्ट्रीय पातळीवरील २०२६ (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी) परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. या परीक्षेत सोलापूर केंद्राच्या तब्बल १५ विद्यार्थ्यांनी ऑल इंडिया रँकिंगमध्ये पहिल्या ४१०० विद्यार्थ्यांमध्ये स्थान मिळवून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

भारतामध्ये २० उत्कृष्ट कॅम्पस असून, त्याअंतर्गत ८ वेगवेगळ्या विद्याशाखांमध्ये ४ वर्षांचा (बॅचलर ऑफ डिझाइन) हा पदवी अभ्यासक्रम चालवला जातो. या नामांकित कॅम्पसमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी आता सोलापूरचे हे विद्यार्थी सज्ज झाले आहेत.

सोलापूर केंद्राने केवळ यावर्षीच नव्हे, तर गेल्या ५ वर्षांत सातत्याने सर्वोत्तम निकाल दिला आहे. गेल्या



पाच वर्षांत या केंद्रातून २७ विद्यार्थ्यांची विविध कॅम्पसमध्ये निवड झाली आहे. याशिवाय डिझाइन क्षेत्रातील इतर सर्वोच्च संस्थांमध्येही सोलापूरच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे; ज्यामध्ये ५ विद्यार्थ्यांनी (नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन), ३ विद्यार्थ्यांनी आयआयटी, २ विद्यार्थ्यांनी सीईपीटी आणि १ विद्यार्थ्याने एसपीए नवी दिल्ली येथे प्रवेश मिळवून सोलापूरचे नाव राष्ट्रीय स्तरावर गाजवले आहे. डिझाइन प्रवेश परीक्षांच्या कोचिंग क्षेत्रात संपूर्ण भारतात इतर कोणत्याही कोचिंग इन्स्टिट्यूटच्या तुलनेत सिलेक्शनचा रेट सर्वाधिक आहे. सोलापूर केंद्राच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून कौतुक होत असून, यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शकांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## बसवनगर येथे लक्षद्वीप महोत्सव उत्साहात सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. ८ जून-**

बसवनगर येथील श्रीपुर्णानंद व श्री श्रद्धानंद महाराज मठात भरत महास्वामी यांच्या दिव्य सानिध्यात अधिक मासानिमित्त भव्य लक्षद्वीप महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. या महोत्सवात दररोज विविध धार्मिक, आध्यात्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असून भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.



अधिक मास हा हिंदू धर्मात अत्यंत पवित्र मानला जातो. या निमित्ताने मठात दररोज पहाटे काकड आरती, रुद्राभिषेक, जपयज्ञ, भजन, कीर्तन, प्रवचन, हरिपाठ, गोपूजन तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध कर्नाटक महाराष्ट्र भागांतून आलेले संत, प्रवचनकार व कीर्तनकार धर्मप्रबोधनाचे कार्य करत आहेत. लक्षद्वीप महोत्सवानिमित्त मठ परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने सजविण्यात आला असून हजारो दिव्यांच्या प्रकाशात परिसर उजळून निघाला आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून भक्तांना आध्यात्मिक ऊर्जा मिळावी तसेच समाजात धार्मिक व सांस्कृतिक मूल्यांचे जतन व्हावे हा उद्देश असल्याचे मठाधिपती भरत महास्वामी यांनी सांगितले. महोत्सवा दरम्यान महिला भजन मंडळ, युवक मंडळ तसेच विविध धार्मिक संघटनांचा सक्रिय सहभाग दिसून येत आहे. दररोज मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येत असून श्रीपुर्णानंद व श्री श्रद्धानंद महाराज यांच्या पवित्र स्मृतींना अभिवादन करत आहेत.

महोत्सवाच्या समारोपाच्या दिवशी विशेष पूजन, लक्षद्वीप आरती, महाप्रसाद व भक्तांसाठी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या महोत्सवामुळे बसवनगर परिसरात भक्ती, श्रद्धा व अध्यात्माचा संगम अनुभवास येत असून भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्व भाविकांनी या पवित्र महोत्सवाचा लाभ घेऊन धर्मकार्यामध्ये सहभागी व्हावे, भरत महास्वामी यांनी असे आवाहन केले आहे.

## ‘पर्यावरण रक्षणासाठी वृक्ष लागवड व संवर्धन करण्याची गरज’

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ७ जून-**

पर्यावरण रक्षणासाठी सोलापुरकरांनी वृक्ष लागवड व संवर्धन करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन पर्यावरण संरक्षण गतिविधीचे पश्चिम महाराष्ट्र पदाधिकारी प्रविण तळे यांनी केले.



आयएमए सभागृहात पर्यावरण विषयावर व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ‘आयएमए’चे अध्यक्ष डॉ. संजय मंठाळे, उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र अग्रवाल हजर होते. सोलापूरच्या तापमानाने यावर्षी उच्चांक केला. पण शेजारील लातूर शहरात डॉ. पवन लड्डा यांनी वृक्ष लागवडीने क्रांती घडवली. तेथील तापमान आता कमी झाले आहे. प्रत्येकाने थोडासा वेळ देऊन हिरवाई वाढवली तर चित्र बदलू शकते. महानगरपालिकेने देखील नागरिकांना वृक्षलागवडीसाठी प्रोत्साहन द्यायला हवे. हिप्परगा तलाव, छत्रपती संभाजी तलाव व आदिला नदी यांचे संवर्धन करुन त्या सौंदर्याने परिपूर्ण झाल्यास शहराचे वैभव वाढेल. प्लॅस्टीकचा वापर थांबवला पाहीजे. प्लेट बँकांसारखे उपक्रम त्यासाठी आदर्श आहेत, असेही तळे म्हणाले.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### चिमुकल्या पुतण्याच्या खून प्रकरणी काकाला चार दिवसांची पोलिस कोठडी

**सोलापूर, दि. ८ जून-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील बरुर येथे पाच वर्षाच्या पुतण्याचा गळा आवळून खून केल्याप्रकरणी अटक आरोपी काका अंकुश परसाप्पा कास्तार (वय २५, रा बरूर, दक्षिण सोलापूर) याला रविवारी येथील न्यायालयात हजर केले असता चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. समर्थ यल्लाप्पा कास्तार (वय ५, रा मूळगाव अंजूटगी ता. इंडी, जिल्हा विजयपूर,हल्ली बरुर)असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी मंद्रूप पोलिस ठाण्यात आजी शोभा बगले यांनी फिर्याद दिली आहे. समर्थ बरूर येथील आजी शोभा बगले यांच्याकडे राहत होता. तर त्याचा काका अंकुश हाही त्यांच्या घराजवळच राहत होता. शुक्रवारी दुपारी एक ते दीड वाजण्याच्या सुमारास अंकुशने समर्थला घरी बोलावले. काकाकडे जातो असे सांगून तो घरातून गेला. थोड्या वेळाने अंकुशने बेशुद्धावस्थेत समर्थला उचलून आणले. तो पत्र्यावरून पडल्याचे सांगितले. त्याच्या डोक्यावर व हनुवटीला जखमा दिसल्या. गळ्यावर काळे व्रण होते. समर्थला सोलापूरच्या खासगी रुग्णालयात तपासल्यानंतर त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. शवाविच्छेदनात समर्थला गळा दाबून मारल्याचे निष्पन्न झाले. मंद्रूपचे पोलिस निरीक्षक शंकर पटवारी यांनी आरोपी काका अंकुश कास्तारला ताब्यात घेतले. आरोपीने या खून का केला याचा तपास सुरु आहे.



### बार्शी शहरात शिवराज्य सेनेतर्फे शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा

**बार्शी, दि. ८ जून-**

सालाबादप्रमाणे यावर्षीही शिवराज्य सेना पक्षाच्यावतीने बार्शी शहरात श्री शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. शिवराज्य सेनेच्यावतीने गेली १७ वर्षे अखंडपणे हा सोहळा बार्शीत अभिमानाने आयोजित केला जात आहे. स्थानिक श्री शिवाजी कॉलेज येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य अश्वारुढ मूर्तीजवळ हा सोहळा पार पडला. यावेळी शिवराज्य सेनेतर्फे शिवरायांच्या मूर्तीला पंचामृताने महाअभिषेक घातला. विशेष म्हणजे, महाराजांच्या शिवशाहीतील सर्वसमावेशक विचार जपत १८ पगड जातीतील शिवभक्तांच्या हस्ते हा अभिषेक झाला. यावेळी ''जय भवानी, जय शिवाजी...'' या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. नगरसेवक आकाश राऊत, राहुल काळे, निखिल बारसकर, संदीप पाटील, सोमनाथ डमरे, संतोष कोंढरे, संग्राम देशमुख, विवेक भागवत, सौरभ शहा, सुधीर झिंगे, योगेश खजनदार, शैलेश माने, बाळासाहेब आरगडे, बालाजी पंडीत, अभि दाभाडे, सुरज शिंदे, किरण सलगर, भैया आरगडे, सागर पवार उपस्थित होते. नागरिकांना मिठाई वाटप करुन या सोहळ्याची सांगता करण्यात आली.



### सोलापूर युवक काँग्रेस भक्कमपणे लढत आहे : माजी केंद्रीय गृहमंत्री शिंदे

सोलापूर, दि. ८ जून-

काँग्रेस पक्ष सत्तेत नसताना विरोधकांची भूमिका अनेक आंदोलनाच्या माध्यमातून युवक काँग्रेस सोलापूरात घेत आहेत. युवक काँग्रेस भक्कमपणे लढत आहे. संघटन अधिक मजबूत करा मी तुमच्या पाठीशी आहे, असे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले. जनवात्सल्य निवासस्थानी माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांची सोलापूर शहर युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी भेट घेतली. त्यावेळी ते बोलत होते. खासदार प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली युवक काँग्रेसने केलेल्या कामांचा आढावा सोलापूर युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे यांनी शिंदे यांना दिला. यावेळी युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, दक्षिण तालुका युवक काँग्रेस अध्यक्ष अनंत म्हेत्रे, ॲड. शुभम माने, शहानवाज शेख, सुनिल सारंगी, विवेक इंगळे, दाऊद नदाफ, सचिन पवार, धीरज खंदारे, महेंद्र शिंदे, आकाश जांभळे, शशिकांत शेळके, यासीन शेख, प्रतीक शिंगे, अस्लम शेख, अभिजीत पवार, हणमंतु जावीर, दिनेश डोंगरे, आकाश नाईक, सोपान मिसाळ, काका ख्याडे, प्रवीण चव्हाण उपस्थित होते.



### नारायणा फाऊंडेशनतर्फे पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**सोलापूर, दि. ८ जून-**

बी. नारायणा फाऊंडेशनच्या वतीने ५ जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण चे कार्यक्रम करण्यात आले. फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शंकर बटगिरी यांनी वृक्ष लागवड ही काळाची गरज व एक झाड माझ्या नावाचं असा संकल्प घेऊन, परिसर हिरवं करावे, या विषयावर लोकांना संबोधित केले. यावेळी सोसायटी चे सचिव दिनकर नारायणकर यांनी वृक्षांची संगोपन करावे असे आपल्या मनोगतात व्यक्त केले. यावेळी नरसिंग म्हंता, निखिल बटगिरी, संजीव सानी, मनिष बटगिरी, सागर बटगिरी, अनिल कुलकर्णी, रेवप्पा काळे, दिनकर नारायणकर , मल्लिनाथ अचलेरकर, विठ्ठल पवार, कलशेट्टी, सुनिल भैरामडगी, साईनाथ रसोलगीकर, सुनिल शिंदे, ईश्वर लोकरे उपस्थित होते.

# मंगळवेढ्यातील ब्रह्मदेवाच्या मूर्तीची दुरवस्था; सुरक्षाही वाऱ्यावर

## पुरातत्व खात्याने तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ८ जून -**

मंगळवेढा, येथे सापडलेली एक ऐतिहासिक आणि कलात्मक ब्रह्मदेवाची मूर्ती आज दुरवस्थेत आणि संरक्षणविहीन अवस्थेत आहे. स्थानिक समाजसेवक सुरेश जोशी,आनंद देशपांडे व बंडू सबनीस यांनी मूर्तीचे संवर्धन करण्यासाठी अनेक प्रयत्न केले असून त्यांनी स्थानिक प्रशासन आणि पुरातत्व खात्याकडे लक्ष वेधण्याचा आग्रह धरला आहे.

बाराव्या शतकातील ही सहा फूट उंच व चार फूट रुंदीची चतुर्मुख रेखीव ब्रह्मदेवाची मूर्ती स्थानिक पवित्र विहिरीच्या काठाजवळ आढळली होती. तिच्या चार हातांत वेद, अक्षमाला, कमंडलू व श्रूक कोरलेले आहेत. मूर्तीच्या तळाशी हंसाचे सूक्ष्म कोरकामही दिसते. हा अत्यंत उत्तम दर्जाच्या ग्रॅनाईटवर कोरलेला कलाकृतीचा नमुना आहे. सांस्कृतिक-ऐतिहासिक दृष्टीने खूप मोलाची समजली जाते. मंगळवेढा मुघलांपूर्वीच्या काळात कलचुरी साम्राज्याची राजधानी किंवा महामंडलेश्वर म्हणून ओळखला जायचा. त्या काळात येथे अनेक मंदिरे आणि वैभवशाली वास्तूंचे अस्तित्व होते. परंतु नंतरच्या विविध आक्रमणांतून अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळे नष्ट झाली किंवा त्यांचे साहित्य इतर ठिकाणी वापरले गेले. सध्या बघायला मिळणारी ही ब्रह्मदेवाची मूर्ती त्या उदासीन काळातील आणि स्थानिक कलात्मक परंपरेची जिवंत साक्ष आहे.

### सध्याची परिस्थिती

मूर्ती विहिरीच्या काठाजवळ सापडते. तिचे आजचे स्थान आणि परिस्थिती इतकी संरक्षित नाही की ती दीर्घकाळ टिकाव धरू शकेल. विहिरीचे ताजे दुरुस्तीचे काम काही दिवसांपूर्वी नगरपालिका स्तरावर कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर दिले आहे. त्या कामांत मूर्तीच्या संवर्धनाचा विषय न समाविष्ट झाल्याचे स्थानिक लोक आणि इतिहासप्रेमी नमूद करतात. पुरातन काळातील ग्रॅनाईटवर कोरलेली ही मूर्ती जतन करण्यासाठी तांत्रिक आणि वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब आवश्यक आहे. मूर्तीचे स्थानांतरण, स्वच्छीकरण, संरक्षक उपजीवन आणि प्रतिष्ठापना यासाठी सरकारी संरक्षणाखालील तज्ज्ञांची गरज आहे. स्थानिक कंत्राटदारांकडून विहिरीच्या दुरुस्ती कामात मूर्तीची नाजूक हाताळणी करणे शक्य नसल्याने मूर्तीचे नुकसान होण्याची भीती आहे. मूर्तीला काळजीपूर्वक बाहेर काढून सुरक्षित काठावर ठेवणे किंवा सार्वजनिकरित्या प्रतिष्ठापित करून ती नागरिकांच्या आणि इतिहासप्रेमींच्या भेटीस आणणे हे दोन्ही व्यवहार्य उपाय आहेत.

### पुरातन खाते आणि प्रशासनाला विनंती

स्थानिक नागरिक, इतिहासवेडे आणि समाजसेवक यांच्या म्हणण्यानुसार पुरातत्व विभागाने ताबडतोब या प्रकरणाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. मूर्तीचे संरक्षण, त्याचे पुरातत्व निरीक्षण, आवश्यक रासायनिक व भौतिक तपासणी करून संरक्षण पद्धती ठरविणे आणि नंतर योग्य स्थळी प्रतिष्ठापना किंवा संग्रहालयात हस्तांतरण करणे हे कार्य तज्ज्ञांनी करावे. स्थानिक प्रशासनानेही पुरातत्व खात्याशी समन्वय साधून तातडीने योग्य पावले उचलावीत, अन्यथा या कलात्मक ऐतिहासिक वारशाचे नुकसान होऊ शकते.

### स्थानिक प्रयत्न आणि अडचणी

आनंद देशपांडे व बंडू सबनीस यांनी स्थानिक पातळीवर अनेक प्रयत्न केलेत तात्काळ स्वच्छता, प्रशासनाशी संवाद, आणि वृत्त माध्यमांना माहिती देण्याचे प्रयत्न केले. परंतु संसाधने आणि तांत्रिक कौशल्ये उपलब्ध नसल्यामुळे मूर्तीचे संवर्धन स्थानिक पातळीवर पूर्णत्वास नेणे कठीण आहे. शिवाय, विहिर दुरुस्तीचे काम चालू असल्याने अचानक किंवा बिननियोजित हस्तक्षेप झाल्यास मूर्तीस नुकसान होण्याची शक्यता आहे. स्थानिक लोक आणि इतर इतिहासप्रेमी या मूर्तीला स्थानिक सांस्कृतिक ओळखीचा महत्त्वाचा भाग मानतात. भारतात ब्रह्मदेवाची मूर्तींच्या स्वरूपात पूजा क्वचितच आढळते, त्यामुळे या मूर्तीसारखे मोठे प्रतिकात्मक



अस्तित्व स्थानिक परंपरेसाठी खूप मौल्यवान आहे. स्थानिक नागरिक ती लवकरात लवकर सुरक्षित करावी अशी अपेक्षा व्यक्त करतात.

### उपाय आणि शिफारशी

- पुरातत्व विभागात तातडीने अहवाल पाठवून क्षेत्रातील सर्वेक्षण आणि मूर्तीचे शारीरिक परीक्षण करणे.
- मूर्ती काढण्याचा, स्वच्छ करण्याचा आणि संरक्षित काठावर ठेवण्याचे काम फक्त प्रशिक्षित पुरातत्त्वविषयक व संरक्षणतज्ज्ञांद्वारे करणे.
- मूर्तीचे सविस्तर छायाचित्रण, ३ स्कॅनिंग व दस्तऐवजीकरण करणे.
- स्थानिक प्रशासन आणि पुरातत्व खात्यादरम्यान तातडीची समन्वय बैठक बोलावणे.
- भविष्यातील सार्वजनिक प्रदर्शनासाठी किंवा स्थानिक संग्रहालयात मूर्तीचे सुरक्षित हस्तांतरण करणे किंवा मूर्ती जिथे ठेवायची त्याठिकाणी योग्य संरक्षक संरचना उभारणे.
- स्थानिक समुदायांचे प्रशिक्षण व जागरूकता कार्यक्रम राबवणे, जेणेकरून भविष्यातील देखभालीसाठी स्थानिक सहकार्य मिळू शकेल.

## दिव्यांग गायक रेवणसिध्द फुलारी यांना विश्व कन्नडिगा पुरस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ८ जून-**

गोवा राज्यातील पणजी येथे आयोजित भव्य विश्व कन्नडिगा सन्मान सोहळ्यात झी कन्नड सारेगमप फेम दिव्यांग गायक रेवणसिद्ध फुलारी यांना प्रतिष्ठेचा 'विश्व कन्नडिगा पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

कन्नड चित्रपटसृष्टीतील ख्यातनाम गीतकार, अभिनेते, दिग्दर्शक आणि साहित्यिक डॉ. वी. नागेंद्रप्रसाद यांच्या हस्ते रेवणसिद्ध फुलारी यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी



व्यासपीठावर ज्येष्ठ कन्नड विचारवंत चंद्रशेखर माडलगेरी, गोवा कन्नड साहित्य परिषदेचे अध्यक्ष सिद्धण्णा मेटी उपस्थित होते.

जन्मतः दृष्टिदोष असतानाही आपल्या अद्वितीय गायनकौशल्याच्या बळावर रेवणसिद्ध फुलारी यांनी राज्यासह राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. झी कन्नडच्या लोकप्रिय 'सारेगमप' या संगीत स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून त्यांनी लाखो रसिकांची मने जिंकली. गायन क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा प्रतिष्ठेचा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना रेवणसिद्ध फुलारी यांनी मान्यवर, आपले गुरूजन, कुटुंबीय आणि चाहत्यांचे आभार मानले. कार्यक्रमास श्रीशैल रब्बा, रविकुमार देगाव, शरणप्पा फुलारी उपस्थित होते.

## दोघांकडून विनाकारण लाकडाने मारहाण

### मानेगावमधील तरुणाचा मृत्यू



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून -**

दारूच्या नशेत दोघांनी विनाकारण लाकडाने मारहाण केलेल्या तरुणाचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात रविवारी सायंकाळी सहा वाजता मृत्यू झाला.

अजित चांगदेव माने ( वय २८, रा, मानेगाव, ता. बार्शी) असे त्या मयत तरुणाचे नाव आहे. ४ जून रोजी रात्री साडेदहा वाजता राहत्या घराजवळ त्याला सुरज माने आणि धनाजी माने यांनी विनाकारण दारूच्या नशेत लाकडाने मारहाण केली होती. यात डोक्याला मार लागून जखमी झाल्याने त्याला येथील सीएनएस हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले होते.

मात्र प्रकृतीत सुधारणा होत असल्याने त्याला येथील शासकीय रुग्णालयात भाऊ आकाश माने यांनी बेशुद्ध अवस्थेत सहा जून रोजी संध्याकाळी दाखल केले असता त्याचा उपचारादरम्यान सात जून रोजी सायंकाळी मृत्यू झाला.

## महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी आणि रयतेप्रती निष्ठा हा महान आदर्श

### नगरसेवक महेश इंगळे; स्विमींग ग्रुपतर्फे छत्रपती शिवरायांना मानाचा मुजरा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. ८ जुन-**

शिव राज्याभिषेक दिनानिमित्त शिवरायांच्या जीवन कार्याची माहिती जसे की एका उत्तम प्रशासकाचे आणि लोक कल्याणकारी राजाचे विचार भावी पिढीपर्यंत पोहोचवणे आणि शिक्षणातून याच मूल्यांची जोपासना करणे हे आपणा सर्वांचे ध्येय असावे. महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी आणि रयतेप्रती असलेली त्यांची निष्ठा हा आपल्या सर्वांसाठी एक महान आदर्श असल्याचे मनोगत येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन महेश इंगळे यांनी व्यक्त केले.

आज संपूर्ण महाराष्ट्राची अस्मिता छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिव राज्याभिषेक दिना निमित्त येथील स्विमींग ग्रुपच्यावतीने सर्व सदस्यांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस संस्थापक व नगरसेवक महेश इंगळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व शिवरायांच्या मुर्तीस दुग्धाभिषेक करून छत्रपती शिवरायांना अभिवादन व मानाचा मुजरा करण्यात आला. यावेळी नगरसेवक महेश इंगळे बोलत होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पावन स्मृती आपणांस संकटातही न डगमगण्याचे साहस देतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपणांस स्वराज्य दिले, स्वातंत्र्य दिले, राजा कसा असावा, याचे धडे दिले. वीरता दिली, साहस दिले. त्यांनी रयतेसाठी आपले जीवन अर्पण केले, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी स्विमींग ग्रुपचे प्रथमेश इंगळे, संतोष पराणे, प्रा. शिवशरण अचलेर, प्रा. विद्याधर गुरव, प्रा.अशोक कलशेट्टी, ओंकार उटगे, विश्वनाथ देवरमनी, बाबा सुरवसे, श्रीकांत झिपरे, सुनिल पवार, सुधाकर पाटील, बाळासाहेब एकबोटे, मनोज जगताप, अंकुश केत, श्रीशैल गवंडी, ज्ञानेश्वर भोसले, अमोल माने, नंदकुमार जगदाळे, जगताप, राजेश जगताप, सागर गोंडाळ, तुषार मोरे, समर्थ स्वामी, रमेश शिंदे, मधुकर सदाफुले, संदीप पंडीत, श्रीकांत मलवे उपस्थित होते.



## पियर एज्युकेटर हा विज्ञानवादी हवा : गायकवाड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

किशोरवयीन मुलांमधूनच समवयस्कर पियर एज्युकेटर विज्ञानवादी बनविल्यास ते आपली रक्षा स्वतः करू शकतील असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे ब्रांच मॅनेजर सुगतरत्न गायकवाड यांनी केले.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने आयोजित यंग पीपल प्रोग्राम या कार्यशाळेत ते बोलत होते. कोणत्याच धर्मात किशोरवयीन मुलं, मुली व स्त्रिया सुरक्षित नसल्याचे चित्र आहे. ही आपल्या समाजाला लागलेली कीड म्हणावी लागेल. किशोर मुलांना शाळेतूनच योग्य शिक्षण दिले गेल्यास व पालकांनाही आपल्या पाल्यांची काळजी कशी घेतली पाहिजे याचे मार्गदर्शन मिळाल्यास, अंधश्रद्धेला, बळी न पडता आपल्या पाल्यांना असा विकृत लोकांपासून दूर ठेवल्यास त्यांचे भविष्य वाचू शकेल, असेही ते म्हणाले.

यावेळी सोशल वर्कर कल्पना गडगडे, श्रुती कोल्हापूर, परिचारिका स्नेहा जटला, अर्चना पारशेट्टी, व्यंकटेश मच्छा आदींची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना गायकवाड म्हणाले, सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिरातून विज्ञानवादी दृष्टिकोन आत्मसात करणारा म्हणजेच पियर एज्युकेटर, घेतलेल्या ज्ञानातून इतर किशोरवयीन मुला-मुलींना अंधश्रद्धेपासून दूर ठेवून विज्ञानवादी बनविणारा पियर एज्युकेटर हवा. कार्यशाळेत सोलापूर शहरातील ४५ किशोवयीन मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. प्रास्ताविक श्रुती कोल्हापुरे यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहा जटला यांनी केले तर आभार दिलीप थोरात यांनी मानले.

## पिलीव परिसरात विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस

### शेतकरी आनंदला; उन्हाळी पिकांना जीवदान, खरीप पेरणीची आशा

तभा वृत्तसेवा,
पिलीव दि. ८ जून -

माळशिरस पिलीव परिसरात रविवारी सायंकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. मृग नक्षत्राच्या पहिल्याच दिवशी पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये सध्या आनंदाचे वातावरण आहे.

काही दिवसांपासून कडक उन्हामुळे तसेच पाण्याच्या कमतरतेमुळे या भागातील पिके करपून जाण्याच्या मार्गावर होती. मात्र या पावसामुळे पिकांना जीवदान मिळाले आहे. या भागातील फळबागा, ऊस व इतर पिकांना चांगली



उभारी मिळाली आहे. पिलीवसह कुसमोड, झिंजेवस्ती, बचेरी, शिंगोर्णी, सुळेवाडी, काळमवाडी या भागात मृग नक्षत्राच्या पावसाने हजेरी लावली. सध्या सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी या गावात पिण्याच्या पाण्याचीही तीव्र टंचाई जाणवत आहे. रविवारच्या पावसाने पिकांबरोबरच, जनावरांना व पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्नावर थोडाफाररविवारचा पहिलाच पाऊस असल्यामुळे पडलेले पाणी जमिनीत आटून गेले. मात्र या पावसामुळे दिलासा मिळाला आहे. यावेळी वादळी वाऱ्यासह विजांचा कडकडाट दिसत होता. यामुळे वीजपुरवठा खंडीत झाला होता. तो दुसऱ्या दिवशी दुपारी पूर्ववत झाला.

### आणखी दोन- तीन दमदार पावसांची गरज

रविवारच्या पावसामुळे दिलासा मिळाला असला तरीही अजून एक-दोन दमदार पावसाची अपेक्षा आहे. दोन-तीन दमदार पावसांशिवाय या भागातील ओढे, नाले ,बंधारे तुडुंब भरतील, त्यानंतरच भुजलपातळी वाढणार असल्याचे शेतकरी वर्गातून बोलले जात आहे.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## आषाढी यात्रा : सोयी सुविधा कामांसाठी २० कोटींच्या निधी मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पालखी मार्गावरील आणि यात्रेशी संबंधित विविध सोयी-सुविधांच्या कामांना आता गती मिळणार आहे. यात्रेसाठी आवश्यक कामांसाठी तब्बल २० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. संबंधित कामांच्या निविदा प्रक्रियेसाठीही निवडणूक आयोगाकडून परवानगी मिळाल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या बैठकीनंतर बोलताना जैन यांनी सांगितले की, पालखी मार्गावरील भाविकांच्या सोयीसाठी आवश्यक पायाभूत कामे, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची सुविधा, तात्पुरती निवास व्यवस्था तसेच इतर मूलभूत सुविधा उभारण्यासाठी मंजूर निधीचा वापर करण्यात येणार आहे. निवडणूक आचारसंहितेमुळे काही कामांवर अनिश्चितता निर्माण झाली होती. मात्र, आवश्यक टेंडर प्रक्रिया राबविण्यास आणि त्यास मंजुरी देण्यास निवडणूक आयोगाने परवानगी दिल्याने प्रशासनाने तयारीला वेग देण्याचा निर्णय घेतला आहे.



## महत्त्वाचे...

### कोंडी शिवारातील रस्ते अपघातात साताऱ्याचा तरुण जागीच ठार

**सोलापूर, दि. ८ जून-**

रस्ते अपघातात साताऱ्याचा २४ वर्षीय तरुण गंभीर जखमी होऊन जागीच ठार झालेल्या अवस्थेत सोलापूर - पुणे महामार्गावरील कोंडी शिवारात आज सोमवारी सकाळी सहा वाजता मिळून आला. सणस ऋषिकेश ( वय २४ , रा. एकता कॉलनी , सातारा ) असे त्या मयत तरुणाचे नाव आहे. सोमवारी सकाळी सहा वाजेच्या सुमारास कोंडी शिवारातील शिवानी हॉटेलसमोरील रस्त्यावर त्याचा मृतदेह गंभीर जखमी अवस्थेत आढळून आला. ही खबर मिळताच त्याला १०३३ रुग्णवाहिकेतून डॉ. इरेश कस्सा यांनी येथील शासकीय रुग्णालयात सकाळी साडेसात वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

---

### वळसंग टोलनाका येथे अपघातात जखमी वृद्धाचा मृत्यू

**सोलापूर, दि. ८ जून-**

वळसंग टोल नाका येथे वाहनाच्या धडकेत जखमी झालेल्या औसा तालुक्यातील एका वृद्ध व्यक्तीचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात रविवारी सायंकाळी मृत्यू झाला. एकनाथ कठारे (वय ६३, रा. भेटा,ता. औसा, जि. लातूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. ते चार जून रोजी रात्री दहा वाजेच्या सुमारास वळसंग टोलनाका येथील रस्ता क्रॉस करीत असताना त्यांना अक्कलकोटच्या दिशेने येणाऱ्या चार चाकी वाहनाने धडक दिली होती. यात मार लागून गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात श्रीकांत रजपूत याने दाखल केले. त्यांचा उपचारादरम्यान रविवारी सायंकाळी मृत्यू झाला.

---

### धावत्या रिक्षातून पडलेल्या महिलेचा अखेर मृत्यू

**सोलापूर, दि. ८ जून-**

धावत्या रिक्षातून पडून जखमी झालेल्या प्रवासी महिलेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात आज सोमवारी दुपारी अडीच वाजता मृत्यू झाला. सुरेखा माळगे (वय ५५, रा. हत्तुरे वस्ती, सोलापूर ) असे मयत महिलेचे नाव आहे. त्या पाच जून रोजी सायंकाळी सात वाजता रूपा भवानी मंदिर येथून हत्तुरे वस्तीकडे रिक्षातून जात होत्या. रिक्षा मड्डी वस्ती चौकात आली असता त्या रिक्षातून चक्कर येऊन खाली पडल्या होत्या. त्यात डोक्याला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्यांना मुलगा काशिनाथ माळगे याने बेशुद्धावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्यांचा उपचारादरम्यान आज सोमवारी दुपारी मृत्यू झाला.

---

### सर्पदंश झालेल्या सांगलीच्या बालिकेचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर, दि. ८ जून-**

घराबाहेर खेळताना सर्पदंश झालेल्या एका दहा वर्षाच्या बालिकेचा उपचारादरम्यान येथील शासकीय रुग्णालयात रविवारी सायंकाळी पाच वाजता मृत्यू झाला. आराध्या विजय मोहिते (वय १०, रा.कडेगाव, जि.सांगली) असे त्या मयत मुलीचे नाव आहे. ती शाळेला सुट्टी असल्याने आपल्या मामाकडे समाधाननगर येथे राहण्यासाठी आली होती. रविवारी संध्याकाळी आठ वाजता मामाच्या घराबाहेर खेळताना तिच्या उजव्या पायास सापाने चावा घेतला होता. त्यामुळे तिला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात मामा अजय मोहिते यांनी त्वरित दाखल केले असता तिचा उपचारादरम्यान रविवारी सायंकाळी मृत्यू झाला.

---

### पोगुल मळा येथे वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार जागीच ठार

**सोलापूर, दि. ८ जून-**

वाहनाच्या धडकेत एक ३८ वर्षीय दुचाकीस्वार जागीच ठार झाल्याची घटना अक्कलकोट रस्त्यावरील मल्लिकार्जुन पुलाजवळील पोगूल मळा येथे रविवारी रात्री नऊ वाजता घडली. मल्लिनाथ शरणप्पा गोडाळे (वय ३८, रा. मल्लिकार्जुन नगर , अक्कलकोट रस्ता, सोलापूर) असे त्या मयत दुचाकीस्वाराचे नाव आहे. रविवारी रात्री नवीन घरकुल येथून राहत्या घरी जाण्यासाठी दुचाकीवरून निघाला असताना मल्लिकार्जुन पुलाजवळील पोगुलमळा येथे वाहनाने त्याला धडक दिली. यात तो गंभीर जखमी होऊन पडल्याने त्याला वडील शरणप्पा यांनी येथील शासकीय रुग्णालयात रात्री साडेदहा वाजता दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले.

---

### अकलूजमध्ये प्रवाशाला दुचाकीवरून नेऊन मारहाण, लुट

**अकलूज, दि. ८ जून-**

अकलूज येथे हॉटेलमधून बाहेर पडलेल्या एका प्रवाशाला लिफ्ट देण्याच्या बहाण्याने दुचाकीवर बसवून निर्जनस्थळी नेऊन मारहाण केली. त्याच्या खिशातील ९९ हजार ३५० रुपयांची रोख रक्कम लुटण्यात आली. ही घटना ३ जून रोजी फिर्यादी हॉटेल डिवाइन मध्ये जेवण करून एसटी स्टँडकडे जात असताना घडली. ते एसटी स्टँडकडे जात असताना दोन अज्ञात इसमांनी त्यांना दुचाकीवर बसवून स्टँडवर सोडतो असे सांगून विश्वासात घेतले. मात्र, त्यांनी एसटी स्टँडवर न सोडता गिरमे वस्तीजवळ एका निर्जनस्थळी थांबवले. तेथे आरोपींनी फिर्यादीला दुचाकीवरून खाली उतरवून काठीने मारहाण केली आणि त्यांच्या खिशातील ९९,३५० रुपये जबरदस्तीने काढून पळ काढला. याप्रकरणी अकलूज पोलीस ठाण्यात दोन इसमांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे, तपास पोलिस उपनिरीक्षक कदम करत आहेत.

## श्री विठ्ठलमूर्तीला रासायनिक लेपनास मंदिर महासंघाचा विरोध

### धर्मशास्त्रानुसार लेपन करा, अन्यथा तीव्र जनक्षोभाचा इशारा





**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ८ जून-**

पंढरपूर येथील श्री विठ्ठलमूर्तीची झीज रोखण्यासाठी पुरातत्त्व विभागाकडून पुन्हा एकदा रासायनिक लेपन किंवा स्टोन पावडर पद्धतीचा घाट घातला जात आहे. त्याला महाराष्ट्र मंदिर महासंघाने तीव्र विरोध दर्शवला आहे. धर्मशास्त्रानुसार लेपन न केल्यास तीव्र जनक्षोभाला सामोरे जावे लागेल, असा इशारा दिला आहे.

मुर्तीस कोरोना काळात केलेले रासायनिक लेपन ८ ते १० वर्षे टिकेल असा दावा केला होता, मात्र अवघ्या ४-५ वर्षांतच मूर्तीला पुन्हा लेपनाची आवश्यकता भासल्याने ही प्रक्रिया सदोष आहे. कृत्रिम रसायनांमुळे पाषाणाचे नैसर्गिक श्वसन रोखले जाऊन मूर्ती आतून ठिसूळ होण्याचा धोका असतो. त्यामुळे अशा रासायनिक आणि विघातक प्रक्रियांना तातडीने स्थगिती देऊन वारकरी संत-महंत, जाणकार यांचे मार्गदर्शन घेऊन धर्मशास्त्रानुसार लेपन करावे, अन्यथा तीव्र जनक्षोभाला सामोरे जावे लागेल, असा इशारा महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घनवट यांनी दिला आहे. याविषयीचे निवेदन जिल्हाधिकारी, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांना दिले आहे.

घनवट म्हणाले की, मूर्ती संवर्धन हा कोट्यवधी भक्तांच्या श्रद्धेशी आणि आध्यात्मिक भावनेशी जोडलेला आहे. त्यामुळे संवर्धनासाठी कृत्रिम रसायने किंवा स्टोन पावडरमधील रासायनिक बाइंडर्स वापरण्याऐवजी, प्राचीन आगम ग्रंथ आणि हिंदु धर्मशास्त्रात नमूद उपाययोजनांचा विचार करावा. देहू येथील जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान आणि धुळे येथील राम मंदिरात अशाच नैसर्गिक प्रक्रियांनी मूर्तीचे यशस्वी संवर्धन झाले असल्याचा दाखलाही दिला आहे. मूर्तीची झीज होत असल्याचे कारण देत श्री विठ्ठलाचा 'चरणस्पर्श' किंवा 'अभिषेक' यांवर बंदी हा उपाय असू शकत नाही, असेही म्हटले आहे.

> **संत, मूर्तीशास्त्राच्या अभ्यासकांचे मार्गदर्शन घ्यावे**
>
> श्री विठ्ठल मूर्तीबाबतचा कोणताही निर्णय बंद खोलीत घाईगडबडीत न घेता, तो वारकरी संप्रदायातील संत-महंत, शंकराचार्य, मूर्तीशास्त्राचे अभ्यासक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील जाणकार यांच्या मार्गदर्शनाखालीच घेण्यात यावा.
>
> **- सुनील घनवट, राष्ट्रीय संघटक, महाराष्ट्र मंदिर महासंघ**

## नेहरू विद्यालयाच्या दोघींची विज्ञान कार्यशाळा, 'इस्रो' सहलीसाठी निवड





**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.८ जून-**

जनसेवा प्रतिष्ठान, अहिल्यानगर यांच्या वतीने आयोजित 'डॉ. सी. व्ही. रमन बालवैज्ञानिक परीक्षा २०२६' मध्ये पंडीत जवाहरलाल नेहरू विद्यालय, रावगाव (ता.करमाळा)च्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. ईश्वरी नलवडे व ऋतुजा भुजबळ यांची विज्ञान कार्यशाळा व इस्त्रो सहलीसाठी निवड झाली आहे.

परीक्षेसाठी विद्यालयातून ईश्वरी नलवडे, ऋतुजा भुजबळ, सार्थक शेळके, मनश्री करगळ, श्रीनाथ धगाटे, शिवतेज बरडे व इयत्ता आठवीमधून कीर्तीध्वज बरडे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उत्कृष्ट तयारी व मेहनतीच्या जोरावर उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. यापैकी इयत्ता सहावीच्या ईश्वरी नलवडे व ऋतुजा भुजबळ यांनी विशेष यश संपादन केले. दोघींची भारताची म नाची अवकाश संशोधन संस्था 'इस्त्रो' येथे आयोजित विशेष शैक्षणिक सहल तसेच विज्ञान कार्यशाळेसाठी निवड झाली आहे. त्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

विशेष म्हणजे या शैक्षणिक सहलीदरम्यान विद्यार्थिनींना विम नप्रवासाचा अनुभव घेण्याचीही संधी मिळणार असून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही एक अभिमानास्पद, प्रेरणादायी आणि अविस्मरणीय संधी ठरणार आहे.

विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण व्हावी, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित व्हावा आणि संशोधनाची प्रेरणा मिळावी या उद्देशाने या परीक्षेचे आयोजन करण्यात येते. ५ एप्रिल रोजी झालेल्या या परीक्षेत सर्व विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्ता, जिद्द आणि सातत्यपूर्ण परिश्रमांच्या बळावर यशस्वी कामगिरी करत विद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे.विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयासह संपूर्ण रावगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष एकनाथ काकडे, सचिव भैय्यासाहेब काकडे, मुख्याध्यापक विजय कोळेकर, शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.



## अधिक महिन्यानिमित्त निघणाऱ्या प्रभात दिंड्यातील वारकऱ्यांना अल्पोपहाराचे वाटप

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ८ जून-**

अधिक मासानिमित्त मंगळवेढा शहरातील प्रमुख मार्गावरून पहाटे अभंग, भजने म्हणत नगर प्रदक्षिणा घालणाऱ्या दोन्ही प्रभात दिंड्यातील वारकऱ्याना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

अधिक मासानिमित्त लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नगर येथून संपूर्ण एक महिना पहाटे ५ वाजता एकतारी भजनी मंडळाची मंगळवेढा शहरास नगरप्रदक्षिणा पूर्ण करीत दिंडी काढली जाते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी गायलेल्या विविध संत चरणाचे गायन दिंडीमध्ये केले जाते. तसेच शनिवार पेठ येथील गोविंदबुवा मंदिर येथून मंगळवेढा शहरास पहाटे पाच वाजता एक महिना नगरप्रदक्षिणा केली जाते.

यावेळी आयुर्वेदाभ्यासक रत्नाकर वेदपाठक, दत्तात्रय घोडके, अश्विन गायकवाड, सुनिल भगरे, महेश चव्हाण, सागर देशमाने, सखाराम जाधव, पप्पू कोताळे, गोपाळ भगरे, बागवान उपस्थित होते. शहराच्या मध्यवर्ती भागात असलेल्या चोखामेळा चौकात हा कार्यक्रम झाला.



## श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर कर्मचारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी देवकुळे

### व्हाईस चेअरमनपदी सविता रणदिवे

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि. ८ जून -**

श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर कर्मचाऱ्यांची सहकारी पतसंस्था पंढरपूरच्या संचालक मंडळाची विशेष सभा सोमवार दि. ८ जून पार पडली. सभेत चेअरमन पदी नारायण देवकुळे तर व्हाईस चेअरमन पदी सविता रणदिवे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

सहकारी निवडणूक अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर यांच्या कार्यालयात ही सभा झाली. अध्यक्षस्थानी एस. टी. तेलंगरे, अध्यासी अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, पंढरपूर हे होते. संस्थेचे संचालक बलभिम पावले, चंद्रकांत कोळी, तुकाराम कुलकर्णी, राजेंद्र सुभेदार, पांडूरंग कोले, सुनंदा देवकते, पांडूरंग बुरांडे, नारायण देवकुळे, सविता रणदिवे तसेच संस्थेचे सचिव सुरज तेली व सुशिलकुमार ढेकळे पाटील उपस्थित होते.

विद्यमान चेअरमन बलभिम पावले व व्हाईस चेअरमन चंद्रकांत कोळी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदांची निवड हा सभेचा विषय होता. चेअरमन पदासाठी नारायण देवकुळे यांचा तर व्हाईस चेअरमन पदासाठी सविता रणदिवे यांचा अर्ज प्राप्त झाला. दोन्ही पदांसाठी अन्य कोणताही उमेदवारी अर्ज प्राप्त न झाल्याने अध्यासी अधिकारी एस. टी. तेलंगरे यांनी नारायण देवकुळे यांची चेअरमनपदी तसेच सविता रणदिवे यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड झाल्याची घोषणा केली.

निवडीनंतर संचालक व सभासदांनी नूतन पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. नूतन चेअरमन नारायण देवकुळे यांनी संस्थेच्या आर्थिक प्रगतीसाठी, सभासदांच्या हितासाठी सर्व संचालकांना विश्वासात घेऊन कार्य करण्याची ग्वाही दिली.

नूतन व्हाईस चेअरमन सविता रणदिवे यांनी संस्थेची प्रगती व सभासदांच्या कल्याणासाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला. निवडीबद्दल मंदिर समितीचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, पतसंस्थेचे सभासद तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून नूतन पदाधिकाऱ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## बावी ग्रामस्थांचा वीज कपातीविरोधात एल्गार

### महावितरणच्या सबस्टेशनवर ठिय्या आंदोलन सुरु



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ जून -**

तालुक्यातील बावी (आ) गावात महावितरणच्या कथित दुजाभावपूर्ण वीज वितरण धोरणाविरोधात ग्रामस्थांनी तीव्र आंदोलन छेडले आहे. संतप्त ग्राम स्थांनी महावितरणच्या सबस्टेशनवर ठिय्या आंदोलन सुरु केले आहे.

परिसरातील इतर गावांना कृषीपंपांसाठी सुमारे आठ तास वीजपुरवठा केला जात असताना बावी गावाला केवळ दोन तास वीज दिली जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यामुळे गावातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून संतप्त ग्राम स्थांनी महावितरणच्या सबस्टेशनवर ठिय्या आंदोलन सुरु करत बेमुदत उपोषणाचा इशारा दिला आहे.

आंदोलक शेतकरी विशाल मि टे यांनी महावितरणच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त केली. गावचे सरपंच यांनीही परिस्थितीचे गांभीर्य स्पष्ट करताना सांगितले की, गावाची पाण्याची टाकी पूर्ण क्षमतेने भरण्यासाठी किमान साडेचार तास सलग वीज आवश्यक असते. त्यानंतर संपूर्ण गावात पाणीपुरवठा करण्यासाठी आणखी काही तास लागतात. अशा परिस्थितीत केवळ दोन तासांच्या वीजपुरवठ्यावर गावातील पाणी योजना चालविणे अशक्य होत असल्याचे त्यांनी सांगितले.

## हेगडे यांचे गायन, सिडाम यांच्या तबला वादनाने रसिक मंत्रमुग्ध

### नादब्रह्म कला फाऊंडेशन करकंब, आरती साऊंड सिस्टीम मनमाडकर परिवाराचे संयुक्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.८ जून -**

नादब्रह्म कला फाउंडेशन करकंब आणि आरती साऊंड सिस्टिम मनमाडकर परिवार यांच्या वतीने आयोजित अभिजात भारतीय शास्त्रीय संगीत मैफिलीने पंढरपूरातील कला रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

डॉ.अनिल जोशी, शुभांगी जोशी, डॉ. विनय भोपटकर, शुभांगी मनमाडकर, डॉ. प्रसाद कुलकर्णी, आप्पासाहेब चुंबळकर, आयोजक भगवान मनमाडकर आणि ज्ञानेश्वर दुधाणे यांच्याहस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.



सुरुवातीला आंतरराष्ट्रीय किर्तीचे तबला वादक नयन घोष यांचे शिष्य युवा तबला वादक पवन सिडाम मुंबई यांचे स्वतंत्र एकल तबलावादन झाले. तीनतालाम ध्ये अतिशय तयारीपूर्ण कायदे,रेले आणि पारंपरिक बंदिशी वाजवून सर्वांना मंत्रमुग्ध केले. त्यांना सुंदर साथ सतीश भट यांनी केली. दुसऱ्या सत्रात गायक विनायक हेगडे यांनी विलंबित एकतालात राग यमन त्याला जोडून बंदिश सादर करत अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताची मेजवानी दिली. त्यानंतर नाट्यगीत आणि अभंग त्यामध्ये तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल आणि शेवटी अगा वैकुंठीच्या राया भैरवीने गायनाची सांगता केली. त्यांना तितकीच सुंदर आणि समर्पकपणे तबला साथ पवन सिडाम, हार्मोनियम सतीश भट, पखवाज ज्ञानेश्वर दुधाणे, टाळ माऊली पिसे, स्वरसाथ सोमनाथ काशीद, गोपाळ अधटराव यांनी केली. कार्यक्रमाचे सुंदर सुत्रसंचालन संकेत कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाला अभिजात भारतीय शास्त्रीय संगीताचे रसिक आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमासाठी ज्ञानेश्वर दुधाणे, धनंजय मनमाडकर, भगवान मनमाडकर, शुभांगी मनमाडकर, माऊली खरात, वैभव केंगार आदींनी परिश्रम घेतले.